# संगीत
# संत भानुदास

हें नाटक

## नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एलएल. बी.

संपादक 'केसरी' व 'मराठा'

आणि

मराठे व इंग्रज ' ' आयर्लंदचा इतिहास ' ' सुभाषित आणि विनोद '
' ग्यारीबाल्डीचें चरित्र ' ' तोतयाचें बंड ' ' चंद्रगुप्त '
'कृष्णार्जुन युद्ध' 'अमात्य माधव' ' संगीत वीर-विडंबन '
' सरोजिनी ' ' नवरदेवाची जोडगोळी '

या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें

तें

श्रीयुत महादेव बाबाजीराव राणे, राजापूरकर नाटक
मंडळीचे मालक, यांनीं प्रसिद्ध केलें.

( आवृत्ति पहिली )

सन १९१९

किंमत १ रुपया.

मुद्रक
शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा प्रेस'
८१८, सदाशिव पेठ, पुणे शहर.
प्रकाशक
महादेव बाबाजी राणे ६१४ शुक्रवार, पुणे.

# प्रस्तावना.

प्रस्तुत नाटकास थोडासा आधार आहे. श्रीपांडुरंगाच्या मूर्ती अनागुंदीच्या राजानें नेल्या त्या भानुदासानें परत आणविल्या अशी दंतकथा आहे. पांडुरंग ही देवता कानडी कीं मराठी ? पांडुरंग ही देवता शैव कीं वैष्णव ? असे जे दोन मनोरंजक वाद आहेत त्यांचाहि या नाटकास उपयोग करून घेतला आहे. खुद्द क्षेत्राच्या रहिवाशांना स्थानिक दैवताचा फारसा अभिमान असत नाहीं; व देवस्थानें झालीं तरी देखील त्यांचें वैभव वाढतां वाढतांच दैवयोगानें फुगत जातें—मूळांत त्यांचें महत्व नदीच्या उगमाप्रमाणें अल्पप्रमाण असतें—ही अनुभवसिद्ध गोष्ट नाटकांत दाखविली आहे. भानुदास व अनागुंदीचा राजा यांशिवाय इतर सर्व पात्रें काल्पनिक आहेत.

या नाटकाचा प्रथम प्रयोग राजापूरकर नाटक मंडळीनें ता० १ मार्च १९१९ रोजीं ‘ नूतन आर्यभूषण थिएटरांत ’ करून दाखविला.

पुणें. }
ता० १६।३।१९१९ } न. चिं. केळकर.

# पात्रें.

| पुरुष. | स्त्रिया. |
| --- | --- |
| भानुदास | गुणवंताबाई |
| कृष्णदेवराय | गंडकी |
| भुलाजी पाटील | मंगळाजी |
| दगडुबुवा | वारकरीणी |
| बोधलेबुवा | |
| शंभुबुवा | |
| अपय्या दीक्षित | |
| तेनालीराम | |
| चक्रपाणी | |
| गाढव्या | |

वारकरी, नागरिक, शिपाई, वगैरे.

संगीत

# संत भानुदास

## अंक पहिला

### नांदी

पद १

नवम अवतारीं । नवम रसिं सुरुचि भारि ॥
तरि श्री विठ्ठल भक्त तारी ॥ धृ० ॥
जरि योग-पीठीं । बसतो हा जगजेठी ॥
दुष्टांसि कळिकाळ । होई प्रणत जना साठीं ॥ १ ॥

### प्रवेश पहिला

स्थळ:—पंढरपुर.

[ दगडुबुवाचें घर. दरवाजाशीं दगडूबुवा आणि बोधलेबुवा जवळ एक पेटी घेऊन बसले आहेत. ]

बोध०:—ठीक, पेटी मी जश्शी सांगितली तश्शी आहे खरी !

दग०:—आहे म्हणजे ? मुद्दाम मंगळवेढ्याला गेलो. सरकारी खाजिन्यांत प्रवेश करून घेतला. सराफाचा हात ओला केला. खजिन्याची पेटी चारी आंगांनी नीट पाहून पारखून घेतली. घरीं आलों आणि धोंड्या सुतारा कडून अगदीं तश्शी पेटी बनवून आणली. इला आतां सरकारी पेटी नव्हे असं म्हणण्याची कुणाची माय व्यायली आहे ? आतां सरकारी

खजिन्याची पेटी भरलेली असते, आणि ही आपली पेटी रिकामी आहे इतकाच फरक ! पण बाहेरून पाहाणाराला हें काय दिसणार ?

बोध०:—हें पहा, हा फरक सुध्धां लवकरच निघून जाईल. मी तुम्हाला सांगितलेली युक्ति तशीच आहे. पहा तर तिचा प्रभाव !

दग०:—सरकारी खजिन्याची पेटी दर आठा पंधरा दिवशीं भरते आणि रिकामी होते. माझी ही पेटी जरका निदान एकदा भरली तरी माझं जन्माचं कल्याण होईल !

बोध०:—वेडे अहांत तुम्हीं दगडूबुवा—अहो तुमची पेटी सुद्धां रिकामी करावी लागेल इतकी भरून जाईल. अहांत कुठे ? आणि नुसती एलदा हो काय म्हणून ? पेटी भरलेली आपली माझ्या कडनं वरचेवर घ्या ! तुम्हीं तर बुवा मला भारीच अल्प संतुष्ट दिसतां !

दग०:—अहो, अल्प संतुष्ट कसचा ! पण पेटींत अजून एकही पैसा पाहिला नाहीं पडलेला. तेंव्हां एकदा तरी पेटी भरेल का असं वाटतं झालं. दुसरं काय ?

बोध०:—पेटींत आणि पैसा ? दगडूबुवा पेटींत पैसा मावला तर मला विचारा ! मात्र पैसा जमेल त्यांतला निम्मा माझा हें आहेना कबूल ? नाहींतर मी तुम्हांला अल्प संतुष्ट म्हणतां म्हणतां पेटी भरलेली दिसली म्हणजे मग सुटेल अति लोभ. सगळीच मिळकत एकटे दाबून बसावंस वाटेल. मग तुमचा माझा होईल तंटा. आणि आपण बनविलेलं हें नवं संस्थान जाईल तुमच्या आमच्या भांडणांत बुडून लक्षांत ठेवा !

दग०:—छेः छेः भलतंच. असं कसं होईल ? श्रम न करितां तुमच्या युक्तीनं जर मला इतका पैसा मिळाला तर माझं हो काय जातं तुम्हाला त्यांतला निम्मा द्यायला ?

बोध०:—बरं कर वसूल करायची पेटी तर बनली बरोबर ! पण दारावर यात्रेकरूंना अडवून भरायला एक डगले पट्टेवाला शिपाई पाहिजे. त्याची व्यवस्था कशी काय केलीत ?

दग०:—थेट तुम्ही सांगितल्याप्रमाणें ! आमच्या शेतावरचा गाढव्या गडी कालच रानांत ढोरं राखीत होता. त्याला धड नांगरही हाकतां

येत नाहीं. पण रंगीत डगला घालून हातांत रुपेरी काठी घेतल्याबरोबर पहा तोच कसा दिसूं लागला अक्कडबाज. जसा कांहीं लष्करचा सुभेदारच. ( गाढव्यास हांक मारून ) गाढव्या अरे–गाढव्या ! [ गाढव्या शिपायाचा पोशाख घालून येतो. ]

गाढव्याः—जी धनीसाब !

बोध०:—दिसायला ऐट तर खूप आहे. पण कायरे, वारकऱ्यांनीं गर्दी केली तर बंदोबस्त कसा करशील ?

दग०:—तो मी त्याला नीट सांगून ठेवला आहे.

बोध०:—तो कसा काय ?

दग०:—तो असा कीं, आपण पंढरपूरचे बडवे. आपलं हें नवं संस्थान आहे बडव्यांचं. तेव्हां संस्थानच्या नोकराचं काम म्हटलं म्हणजे यात्रेकरुना बडवायचं !

गाढव्याः—त्ये माझ्याकडं लागलं बघा. टाळकुट्यांनीं गर्दी बिर्दी केली तर असं बडव बडव बडवून काढतो कीं जेचं नांव ते ! रानांत गाया म्हसरांनाबी नाही असं बडवीत.

बोध०:—बरोबर अगदीं बरोबर ! बडवा बडवी करणं हें अधिकाराचं चिन्हच आहे. हे यात्रेकरु जितके तडाके अधिक खातील, तितका त्यांच्या मनांत नव्या संस्थानच्या अधिकाराविषयीं अधिक आदर उत्पन्न होईल ! आणि कर कसा बसविला, कुणी बसविला असले प्रश्नच ते काढावयाचे नाहींत. हो, अधिकाराशिवाय उगीच कोण कुणाला मारील ? अशी मनाची एक खात्री झाली, म्हणजे अधिकाराशिवाय कोण कुणाकडून कर वसूल करील ? अशी दुसरी खात्रीही आपोआप त्यांची होईल. दुसरं कांहीं बोलायला नको आणि चालायला नको.

दग०:—बरं जोंवर गांव नांगरे आडमुठे वारकरी येतील तोंवर हें ठीक चालेल. पण समजा कीं एखादा पांढर पेशा कारकून वारकरी आला, आणि "तुम्हांला कर बसवायला कुणीं अधिकार दिला ?" असं विचारूं लागला तर त्याला काय सांगायचं ?

बोध०:—तें मीं सारं नीट ठरवून ठेवलं आहे. तुम्हींच जसे कांहीं कारकून वारकरी. मला विचारा म्हणजे सांगतों.

दग०:—( ऐटीनें ) सांगा, हा कर कुणीं बसविला ?

बोध०:—( आश्चर्य दाखवून ) कुणीं ? असला प्रश्न विचारतां याचं मला मोठं आश्चर्य वाटतं. कुणीं म्हणजे पंचांनीं ? यावर कुणी विचारील, कीं पंच कुणीं नेमले ? तर त्यालाही आहे माझं उत्तर ठरलेलं ! तें असं—पहिले पंच आपले पंढरपूरचे मुलाजीराव राजे पाटील देशमुख. देशमुखाना कुणीं पंच नेमून द्यावे लागतात असं नाहीं. देशमूख असाम्या म्हणजे आपल्या देशांत डोंगरा पहाडा बरोबर जन्माला आलेल्या ! साऱ्या गांवचे राजे ते ! गांव वसवायचा देशमुखांनीं, आणि गांव मोडून उठून गेला तर गांवातल्या ओसाड घरांतलीं जातीं मडकीं आणि गावाबाहेरच्या मारुतीच्या देवळाचे दगड यांचे धनी देशमुखच ! गावांत असतील नसतलि त्या देवस्थानांचे पंच देशमूख. आगदीं स्वयंभू.

दग०:—बरं देशमुख हे पहिले पंच झाले. पण तुमची माझी वाट काय ? तुम्हाला आणि मला पंच कुणीं नेमले ?

बोध०—हां असं सोईसोइन घ्या. म्हणजे सगळं कांहीं होईल. हे देशमूख ठरले पाहिले पंच ? झालं, तुम्हीं नेमलं पंच मला. एका पंचाला दुसरा पंच नेमायला आधिकार असतोच असतो. तो देतो कोण आणि घेतो कोण ? बोला आतां ठरलाकीं नाहीं तुम्ही पंच ! आणि मी सुद्धां ! आणि तुम्हीं आम्हीं पंच म्हणूनच विठोबाच्या दर्शनावर कर वसवायला आला तुम्हाला आणि मला आधिकार ! [ कर वसूल करण्याचा बहाणा करून ] टाका राव, कर टाका आधी ? नाहींतर विठोबाच्या दर्शनाला नाहीं सोडीत आंत मंदी. आणि बाहेरूनहि दर्शन होऊं नये म्हणून घेणार अशीं कवाडं लावून ? [ देवळाची कवाडं लावतो ]

दग०—वाहवा, हें तर ठीक झालं. येऊं द्या आतां वारकरी लोक ?

बोध०:—गाढव्या, असा नीट आदबीनं पण ऐटींत उभा रहा, आणि कर घेतल्या शिवाय एक वारकरी आंत आला तर खबरदार ! वारकऱ्यांना तोंडान नुसत्या शिव्या सुरु ठेव, दुसरी गोष्ट नाहीं. आणि

तोंडाबरोबर हातही सुरु ठेव. आपलं हें स्वयंभू नवं संस्थान कसं अगदीं जागृत असल्या सारखं गरजलं पाहिजे. [ पडद्यांत वारकऱ्यांची टाळ ऐकू येते.]

दग०:—आले वाटंत वारकरी आले. [ पडद्यांत–पुंडलीकवरदे हारी विठ्ठल श्री नामदेव तुकाराम ] गाढव्या संभाळ बरं ? सारे एकदम आंत घुसतलि बरं बघ ! [ गाढव्या सरसावून उभा राहतो. दगडूबोवा व बोधलेबुवा आधिकाऱ्याप्रमाणें पेटीजवळ आढ्यतेने जाऊन बसतात वारकरी प्रवेश करतात व दरवाऱ्यापर्यंत येतात ]

वार०:—

पद २ भजन

दावि तुझे मज पाय देवा भवहारी ॥ धृ० ॥
सांडुनि सर्वहि काम कल्पना ॥
आलों धांवत मोक्ष मंदिरीं ॥ १ ॥
भवभयनाशन इतर न कोणी ॥
तुज विण संकट कोण निवारी ॥ २ ॥

गाढव्या:—ए वारकऱ्यानो ! पुढं कुठं निघाला ? व्हा मागं !

१ ला वार०:—त्ये कारं बाबा ? आम्हीं दर्शनाला चाललोना ?

गाढव्या:—त्ये हाय मला ठावं. म्हणूनच म्हनतोना थांबा म्हणून !

२ रा वार०:—थांबलो बाबा. सांग आता काय म्हणतोस त्ये !

गाढव्या:—सांगायचं काय ? त्ये पेटींत चार चार आन्याचं पैसं टाका आन मंग जा आत मंदी.

१ ला वार०:—देवा पुढं काय ठेवायचं त्ये ठेवूना आम्हीं देवाच्या पायरीवर. आन् हात कशाला ?

गाढव्या:—अर त्ये पैस देवाच देवाला मिळत्याल. पण कराच पैस इत पेटीवर द्याव लागतात.

२ रा वार०:—कर– अन कसला कर ?

गाढव्या:—कसला कर ? दावतो तुला म्हंजी कळून येईल आपाप.

[ वारकऱ्यास तांब्यानं तडाखे देतो. दुसरे वारकरी तडाक्या गणीक
पुंडलीक वरदे हारि विठ्ठल. असं म्हणतात. ]

दग०:—बोधलेबुवा, बघा आमचा गाढव्या कसे तडाखे देऊन वारकऱ्यांना बडवून काढतो तो. आतां आमचं बडव्यांचं संस्थान खरं झालं.

बोध०:—आणि कराचे पैसे पेटींत येऊं लागतील तेव्हां तें संस्थान आणखी खरं ठरेल !

१ ला वार०:—अर बाबा गरीब वारकऱ्यांना कां उगीच बडवतोस ?

गाढव्या:—तें गरीब म्हणून ?

२ रा वार०:—हा तर खूप अन्याव झाला.

गाढव्या:—न्याव अन् अन्याव तुला टाळकुट्याला कशाला त्येची पंचाईत ? देवळांत दर्शनाला जायच असल तर चार आण पेटींत टाक, आणि हो पुढ. नाहींतर मागच्या पायानं माग हो कसा—हत गर्दी बिर्दी करायजी नाही असा हुकूम हाय.

३ रा वार०:—हुकूम ? अन् ये इठुबाच्या दारांत हुकूम कवा पासन चालू लागला ?

गाढव्या:—सांगुका तुला कवा पासून त्यो ? हा बघ [ त्यास तडाखे देतो. बाकीचे वारकरी पताका वर करून पुंडलीक वरदे हारी विठ्ठल म्हणतात. ]

१ ला वार०:—देवा पांडुरंगा न्हाई तुझं दर्शन होत ? तुझी मर्जी.
[ रडत जातो. ]

दग०:—गाढव्यानं एक वारकरी तर मागं लावला.

बोध०:—झालं तर, आता पुरं कामच झालं. बोलायला नको. हे वारकरी म्हणजे शुद्ध मेंढरासारखे आहेत. एक मागं परतला म्हणजे सगळे आपोआप परततील ?

दग०:—[ भिऊन ] काय सारे परतणार मागं ? मग पेटी कशी भरणार स्वयंभू संस्थानची ? पेटी करायला बारा रुपये आणि गाढव्याच्या डगल्या पट्ट्याला आठ रुपये मिळून वसि रुपयाचा तरी खर्च निघायला हवाना हो !

बोध०:—दगडूबुवा भारींच बुवा तुम्हीं उतावळे ? ज्याच्या जवळ पैसे नाहींत ते मागं परततील. पण मागं फिरण्यानं ते कर बसवायचा अधिकार तरी कबूल करतील कीं नाहीं ? तो तरी फायदाच ! बरं ज्या वारकऱ्यांजवळ पैसे असतील ते पैसे देऊन आंत जातील. कधीही बाहेर राहायचे नाहींत. इतकच नव्हे तर पैसे मागाल तितके देतील.

२ रा वार०:—बरं बुवा चार आणे हवेतर घे ! पण बुवा कसंही करून आंत जाऊं दे ? आज आषाढी एकादशी ? पांडुरंगाच्या दर्शनापुढें चार आण्याची कथा काय ? [ पैसे टांकून आंत जातो ]

३ रा वार०:—शिपाईबुवा माझ्या गाठीं चार आण बी न्हाइती बगा. काल दोन दीस बामणाच्या घरीं काम केलं त्याच दोन आण मिळाल त्ये हायती पदरांत बांधलेल ? त्येवढ घ्या आन् सोडा आंत मंदी दर्शनाला !

दग०:—मोठा आला लेकाचा भगवत्‌भक्त. तुला नाही तुझ्या काकाला सुद्धां नाही कराचे पैसे कमी व्हायचे. पंचांनी चार आणे ठरविले ते दिलेच पाहिजेत समजलास ?

४ थी वार० स्त्री०:—शिपाईदादा ? जाऊद्याकी मला आंत दर्शनाला. मी रंडकी मुंडकी बाई माणूस ? पन्नास कोसावरनं आले. कराकी मला कराची माफी ?

बोध०:—कसं काय दगडूबुवा ? माणूस बरं दिसतय. मला वाटतं जाऊं द्यावं आंत. फिरुन दर्शनाला येईलच. तोंवर विचार करायला सांपडेल तिच्या विषयींचा ?

दग०:—बरं आहे. बाई—जा पंचांनीं तुला कराची तूर्त माफी उर्फ तहकुबी केली आहे. जाबरं आंत. आणि देवाजवळ बसायचं असेल तर बैस कांहीं वेळ. तुझ्या पासून कर कसा वसूल करायचा ते पाहतां येईल.

[ त्या नंतर पुष्कळसे वारवरी येतात गर्दी होते. कोणी कर देऊन आंत जातात कुणी रडत बसतात. गाढव्या वारकऱ्यांची गर्दी मोडण्याकरितां आडवे उभे तडाके देतो तेव्हां सर्व जण पताका उचलून पुंडलीक वरदे हारी विठ्ठल असा गजर करतात. ]

**बोध०:**—कां दगडूबुवा, बसलाकीं नाहीं कर आतां निमूट पणें ! झालं. संस्थानची स्थापना झाली आतां नाही पंचाईत कंसली.

[ भानुदास, गुणवंताबाई, चक्रपाणी, प्र. क. ]

**भानु०:**—पाहिलीस कां ही वारकऱ्यांची गर्दी ? आंत पाय ठेवायला रीघ मिळत नसेल म्हणून बसले असतील वाट पहात ? धन्य धन्य हे साधू संत. यांच्यामुळें रुक्मिणीपांडुरंगाचा अवतार सफळ झाला. भक्तिमार्गावरचे हे शीतळ छायावृक्ष. यांच्या संन्निध जो उभा राहील त्याची तहान भूक भागल्या शिवाय कधीही राहाणार नाहीं. श्रीविठ्ठल ! श्रीविठ्ठल.

पद ३

मज गमती हे संत मनुज जरि ॥
कल्पतरु जणुं भक्त पथावरी ॥ धृ० ॥
भवरवि कर धरुनी निज पल्लविं ॥
शीतल छाया करिति पाथिक शिरि ॥
मधुर फळातें अर्पिति तत् करी ॥ १ ॥

**गुण०:**—आपणां बरोबर मी येण्याचा हट्ट धरिला त्याचं आज सार्थक झालं ! एरवी हा असा देखावा माझ्या दृष्टीस कसा पडणार ?

पद ४

चिर चिंतित आजि पुरले । नाथ मनोरथ ॥
बघुनि पंढरी संतखचित हीं । वांछित मनिं नुरले ॥ धृ० ॥
हटवादी जरि स्त्रियांस म्हणती । आम्हीं शुभ कार्यी ॥
धरितां रति । होत न अवमति पति वचनीं ती ॥
भगवद्भजनीं अघ तें विरलें ॥ १ ॥

आम्हीं बायकांनी हट्ट धरूं नये हें खरं पण पुण्य कर्माच्या पायीं हट्ट धरावासा वाटतो. राहवत नाही. पण हट्ट धरल्या बद्दल आपण मला क्षमा केलींना ?

**भानु०:**—हें पहा तुला येऊं नको म्हणत होतों, याचं कारण इतकंच की—कुठे पैठण आणि कुठे पंढरी ! इतक्या लांब या मुलाला घेऊन चालत यायचं. आणि त्यातूनही आपणाला निघायला उशीर झाला. तातडीन मोठ्या मजला मारीत यावं लागणार म्हणून तुला नको म्हणत होतें. दुसरं काय ? एरवीं माझ्याप्रमाणं तुलाही पांडुरंगाचं दर्शन व्हावं अशीच माझी इच्छा होती. तूं पुण्यवती आहेस म्हणूनच तुझा हट्ट पुरला. आणि तुला घेऊन येण्याची बुद्धी मला झाली. पहा पहा हा साधूसंताचा मेळा ! मोक्ष मंदिराची कवाड उघडण्याची वाट पहात बसला आहे तो ? चला आपण त्यांच्यातच जाऊन मिसळूं.

**चक्र०:**—बाबा, मला होईल कांहो विठोबाच्या मूर्तीचं दर्शन ? नाहीं-तर मी लहान म्हणून ठेवाल मला बाहेर आणि तुम्हीं दोघंच आंत जाऊन दर्शन घेऊन याल ? पण मीही येणार बरं आंत, सांगून ठेवतों. लहान मुलाला कुणी वारकरी गर्दी करून चिरडायचे नाहींत.

**भानु०:**—[ चक्रपाणीस वर उचलून घेऊन त्याचं चुंबन घेतो. ] नाहींरे बाळ, तुला बाहेर ठेऊन आम्हीं आंत काय म्हणून जाऊं ? माझ्या विठ्ठलाला सर्वच आवडती आहेत ? आणि त्याच्या पुढें मोठं तरी कोण आहे ? आम्हीं सर्वच त्याचीं मुलं ? माझ्या विठ्ठलाला लहान मुलंच फार आवडतात. लहान मुलांच्या हातून कधींच पाप होत नाहीं. ते पुण्यात्मे असतात. स्वर्गद्वार आणि मोक्षमंदिर हीं लहान मुलांना जितकीं जवळ असतात तितकीं आम्हां थोरांनाही नसतात. दीन, अनाथ, अज्ञान, पंगू यांची त्याला फार काळजी असते. मोठ्यांच्या आधीं तो लहनांचाच परामर्ष घेतो. प्रत्यक्ष इंद्र—देवेंद्र—जरी आपल्या यक्षगंधर्वांनिशीं, आणि स्वर्गाच्या राज्याचं सगळं वैभव घेऊन, भेटीला आला तरी त्याला बाजूला बसवून, तुझ्यासारख्या अज्ञान मुलाला, आणि तुझ्या आईसारख्या दुबळ्या स्त्रीला, माझा पांडुरंग आधीं दर्शन देईल.

**बोध०:**—कायहो दगडूबुवा, तो पलीकडे श्रीमंतासारखा पोषाख केलेला, बरोबर बायको आणि मुलगा घेतलेला वारकरी येतो आहे तो आहे कां तुमच्या ओळखीचा ?

दग०:—नाहींबुवा, आपल्या नाहीं ओळखीचा. तो पंढरीचा रहिवाशीच नसावा.

बोध०:—तुमचा तर्क बरोबर आहे. अहो तो माझ्या गांवचा म्हणजे पैठणचाच आहे. कसा दिसतो आहे संभावीत वरनं. पण असला महाठक पाजी आहे कीं काय सांगू ?

भानु०:—हें पहा तो पाण्याचा तांब्या आणि पूजा साहित्य इकडे घे बर जरा.

गुण०:—देवाजवळ गेल्यावर हातामध्यें देतें. तोंवर राहूं द्या माझ्या हातांत. उगीच आपला हात अवघडेल.

भानु०:—तसं नव्हे. देवळाबाहेर जमलेल्या या साधुसंतां पैकीं चारपांच मूर्तींचे पाय धूवून मग आंत जाऊं.

गुण०:—पांडुरंगाचे पाय धुवायला ना हें पाणी आणि पूजासाहित्य आपण बरोबर घेतलंत ?

भानु०:—होय तें खरं. पण खुद्द पांडुरंग आणि हे साधुसंत यांत भेद का कांहीं आहे ? त्यांचे पाय धुवूनच मग आपण आंत जाऊं. त्यांच्या पायांचा अव्हेर करून जर आपण आंत गेलों तर माझ्या भक्तवत्सल पांडुरंगाला तें आवणार नाहीं. साधुसंतांच्या रूपानं मी बाहेर उभा होतों तो तुम्हाला दिसलों नाहीं काय ? असं म्हणून श्रीपांडुरंग आपणाला दूषण देईल ! आण पुजासाहित्य इकडे. मला धुवूं दे या सज्जनांचे पाय ?

गुण०:—आपली तशी इच्छा असली तर माझी तरी कुठें नाहीं ?

भानु०:—[ जवळच्या वारकऱ्यांस ] महाराज, आपण दमून भागून आला असाल. द्या आपले पाय इकडे. मी धुतों. आपल्या पायाच्या पाण्यापेक्षां आधिक पवित्र असं तीर्थ मला दुसरं कोणतंच नाहीं.

वार०:—नको बाबा, तूं ब्राह्मण आम्हीं तुझ्याकडून पाय कसे धुवून घ्यावें ? ब्राह्मण हेच आमचे गुरु ?

भानु०:—छेः महाराज, असा भेदभाव या विठ्ठलाच्या समोर आपण मनांतही आणूं नये. भक्तिरसाच्या आकाशगंगेतल्या आपण सर्वच

सतेज तारका आहांत. पांडुरंगाच्या भक्तीनं आपल्याला देवत्व प्राप्त झालं आहे, असंच मी समजतों. माझा पांडुरंग जर असला भेदभाव मनांत बाळगीत नाही, तर तुम्हीं आम्हीं तो कसा बाळगावा ? या क्षेत्रभूमीवर उच्चनीचभाव मनांत आणणं हेंच पाप आहे ! आपण शूद्र या नम्र भावनेनं माघार घेतां हा आपला थोरपणा आहे. पण मी त्याला संमती देईन तर महापातकी ठरेन. आपले पाय धुवून त्या तीर्थानं मी आपले हात पवित्र करीन तेव्हांच श्रीविठ्ठलाच्या चरणांवर ठेवण्याइतके ते हात योग्य होतील. हें बघ, घे तो गडवा आणि घाल पाणी [ पांच वारकरी एकामागून एक आपले पाय देतात. तो पाय धुतो, स्त्री पाणी घालते, चक्रपाणी पाय पुसतो. ]

दग०:--[ वरील कृत्य सुरूं असतां ] बोधले बुवा, तुमच्या गांवचा तो वारकरी पाहिलात कां काय करतो आहे ? वारकऱ्यांचे पाय आपल्या हातानं धुतो आहे.

बोध०:—धुवील, धुवील, आणि तें घाणेरडें पाणी तीर्थ म्हणून पिईल सुद्धां. तो आहे तसाच ठक !

दग०:—कां, असं काय केलं त्यानं कुणाचं ?

बोध०:--कुणाचं ? स्वतः त्यानं माझंच तर वाटोळं केलं. माझा सारा धंदा बसविला. आणि मला गांव सोडण्याची पाळी आणली. म्हणून तर वैतागानं आलों पंढरीला. नाहींतर काय ठेवलं आहे एवढं पुरून माझं इथं पंढरपूरला ! गावासारखीं गावं काय थोडीं आहेत ?

दग:--त्यानं तुमचं काय केलं सांगा तर खरं ?

बोध०:--अहो काय सांगू आपलं कपाळ ? हा जातीचा ब्राह्मण, कुणी सांगितला होता त्याला शिंप्याचा धंदा करायला ? बरं केलान पोटा-करतां, तर शिंप्याच्या रीतीनं तरी करायचा होताना ?

दग०:—म्हणजे ? ब्राह्मणानं शिंप्याचा धंदा शिंप्यासारखा न करतां ब्राह्मणासारखा केलान ?

बोध०:—होय, तसाच !

दग०:—तो कसा ? बोधलेबुवा, आपणाला नाहीं बुवा कांहीं तुमच्या बोलण्याचा बोध झाला.

बोध०:—सांगतों ऐका. दुकानचा धंदा करायचा, त्यांत आपली खरेदी आणि आपला नफा आपला आपल्यालाच माहीत असावा. म्हणजे अधीक उणा फायदा घेऊन हात मारायला सापडतो. पण याचं पाहावं तों आपलं वेगळंच. खरेदीचा आणि नफ्याचा आंकडा जगजाहीर. याच्या दुकानांत आंधळ्यानं, पोरानं, बायकोनं, वेड्यानं सुद्धां येऊन माल विकत घेऊन जावा. अंगूळभर कापड कमी द्यायचं नाहीं, कीं पैसा आडका ठरल्यापेक्षां जास्त घ्यायचा नाहीं. कोण हा दुष्टपणा ? कारण अशा गुणांनीं यानं माझ्या दुकानचा सगळा व्यापार धंदा बसविला आणि आपल्याकडे ओढला. झालं. मला दिवाळं काढून घर सोडावं लागलं, आणि वैतागानं निघून इकडे आलों.

दग०:—ठीक आहे. बोधलेबुवा आपण आतां त्याचा सूड उगवूं तुमच्या करतां. त्याला आंत देवदर्शनालाच सोडूं नये म्हणजे झालं. तेवढं तरी आहे कीं नाहीं आपल्या हातीं ?

[ सगळे द्वारापर्यंत येतात. ]

गाढव्या:—ये संताड्यांनो, ए टाळकुट्यांनो, अर मुसंडी मारून कुठं निघाला आतमंदी ? कराचे पैसे आदुगर टाका पेटींत अन मग जा व्हांवं तर आंत !

भानु०:—काय शिपाई दादा काय म्हणतोस तूं ?

गाढव्या:—काय म्हंतो ? मग म्या इकता येळ बोललों त्ये कां म्हराठींत कां कानडींत ? कां बामन बुवा तुमच्या कानांत गुड्या चोंदून भरल्या कुनी ?

भानु०:—नाहीं बाबा तसं नव्हे. तूं बोललास मराठींतच; पण कराचे पैसे देऊन देवदर्शनाला जा असं तूं बोललास त्याचा अर्थ मला कळला नाहीं म्हणून विचारलं.

गाढव्या:—वः बामनबुवा लईच भोळ दिसतासा. पन तुम्हीं भोळ

असा कां गोळ असा. दर डोई माग कराच चार आण त्या पेटींत टाका तर म्होर देवदर्शनाला जा.

भानु०:—देवदर्शनाला कर ? हा कांहीं नवाच प्रकार दिसतो. हा कर कुणीं बसविला ? आणि कुणाच्या हुकमानं ?

गाढव्याः—[ अस्तन्या सारून ] सांगूका कुनी आन् कसा कर बसवला तो. [ मारायला पुढें होतो ]

दग०:—गाढव्या—नाहीं चुकलो—शिपाई बुवा तुम्हीं नका त्यांच्याशीं हुजत घालूं [ भानुदासास ] कायहो वारकरी बुवा ? तुम्हाला काय सरकारी माहिती पाहिजे ती आम्हीं देतो. इकडे या !

[ भानुदास, स्त्री, पुत्र, व वारकरी पुढं जातात. ]

भानु०:—[ बोधलेबुवास पाहून ] काय हो बोधलेबुवा ? तुम्हीं कधीं आला पंढरीला ?

बोध०:— तुम्ही आमचं दिवाळं काढायला लावलं तेव्हां !

भानु०:—तुम्हाला तसं वाटत आसलं तर माझा नाइलाज आहे. पण पुन्हा दुकान घालण्याकरतां मी तुम्हाला भांडवल देत होतों. असं असून तुम्हीं तें घेतलं नाहीं त्याला मी वरं काय करूं ?

बोध०:—खरं आहे भानुदासा. हा मानभावीपणा तुझा तुलाच शोभतो. भल्या गृहस्था ! माझी चे अब्रू ज्या गांवात तूं केलीस त्याच गावांत तुझं भांडवल घेऊन काळं तोंड लोकाला दाखवीत रहावं हा खासा उपदेश ! केवढी ही तुझी माझ्याविषयीं कळकळ ! पण जाऊं दे. मी सर्वसंगपरित्याग करुन विठ्ठलाच्या सेवेला येऊन राहिलों. आतां कशाला जुन्या गोष्टींची आठवण ? संस्थानची नोकरी करून पोट भरावं झालं. स्वार्थही साधला परमार्थही साधला.

भानु०:—तुमच्या पुढच्या पेटविरून, तुम्हीं कर वसूल करायला बसला आहां असं वाटतं ! हा कर कुणीं बसविला आणि कुणाच्या हुकमानं ? गेल्या आषाढीला तर हा कर कांहीं नव्हता !

बोध०:—तुमच्या माझ्या मध्यें कशाला तंटा ? या संस्थानच्या मह-

त्याच्या गुप्त गोष्टी आहेत. हे दुसरे संस्थानचे पंच आहेत वाटेल तर सांग-तील विचारा त्यानां.

भानु०:—[ आश्चर्यानें ] चमत्कार आहे ! पंढरीनाथाच्या दर्शना-वर कर बसविणारं हें नवं संस्थान कधीं निर्माण झालं ? [ दगडुबुवास ] काय हो हा कर तुम्हीं कुणाच्या हुकमानं वसूल करतां ?

दग०:—संस्थानच्या !

भानु०:—संस्थान कुणीं स्थापलं ?

दग०:—पंचानीं ?

भानु०:—आणि पंच कुणीं नेमले ?

दग०:—संस्थानानं ! " सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवियला " असा अभंगच आहे. कट म्हणजे दाराजवळची तिठ्याची माऱ्याची जागा !

भानु०:—वः हा तर मोठा सोईचाच घोटाळा दिसतो. तें कांहीं नाहीं, या गरीब वारकऱ्यांच्या देवदर्शनाच्या मार्गांत येण्याचा तुम्हाला अधिकार नाहीं. कर वसूल केल्याशिवाय यानां तुम्हीं देवदर्शनाला सोडलंच पाहिजे !

दग०:—वः हा तर संस्थानावर जुलूमच झाला. पण आम्हीं तो चालूं देणार नाहीं. आम्हीं कर वसूल करणारच ! शिपाई, या वारकऱ्यांना धक्के मारा !

वार०:—पुंडलीक वरदा हारि विठ्ठल [ भिऊन मागें सरतात. ]

भानु०:—[ पुढें होऊन ] मी यांना धक्के मारूं देणार नाहीं.

दग०:—धक्का बुक्की करायला तुम्हाला नको असली तर तुम्हींच त्यांचे पैसे मुकाट्यानं द्या कसे ?

भानु०:—एवढंच ना. मी देतों त्यांच्या वाट्याचे पैसे.

गुण०:—गरीब बिचारे वारकरी. त्याना धक्का बुक्की होण्यापेक्षां आपण आपले त्यांचे पैसेच भरूं म्हणजे झालं ! आम्हाला कराचे पैसे देतां आले म्हणून आपण आंत जाऊं. पण या संत सज्जनांना बाहेर सोडून आपण आंत जाणं बरं नव्हे.



भानुदास०—मी यांना धक्के मारूं देणार नाहीं. [ पृ० ३४

भानु०:—बोला किती किती पैसे द्यायचे दर डोईला ? [ पैसे काढूं लागतो. ]

बोध०:—[ दगडुबुवाच्या कानांत ] दगडूबुवा, ही वेळ आहे साधून घ्या. हा गृहस्थ या वेळीं तुम्हीं काय मागाल तें देईल असा धाडशी आहे !

दग०:—पण आम्हीं कर काय वाटेल तो घेऊं ! अमुकच घ्या असं म्हणणार तुम्हीं हो कोण ? आम्हीं चार पैसे घेऊं ! नाहीं तर चार रुपये घेऊं, नाहींतर चारशें रुपये घेऊं ! आम्हीं संस्थानचे पंच आहों. कर किती घ्यावा हा संस्थानची इच्छा. तुम्हीं कोण बोलणार ?

भानु०—ठीक आहे. हें संस्थान कुणीं स्थापलं, हा आधिकार कुणीं दिला हें मी मागाहून पाहून घेईन, पण आतां या घटकेला आधिं या भगवत्भक्तांना पांडुरंगाचं दर्शन करवीन. मग त्याला कितीही खर्च येवो.

बोध०:—[ दगडूबुवाच्या कानांत ] दगडूबुवा, वाहवा. नशीब अनुकूल दिसतं. वेळ आहे साधून घ्या सोडूं नका.

भानु०:—ठीक आहे. मला पंढरीनाथानं चार पैसे दिले ते त्याच्याच करतां खर्च झाले तर त्यांत काय वावगं ? हें घ्या पंचवीस रुपयांच्या किमतीचं सुवर्ण. [ मोजून पांच वारकरी आंत जातात.] [ इतर वारकऱ्यांस उद्देशून ] या भगवद्भक्त मंडळी या ! ज्यांना आज श्रीपंढरीनाथाचं दर्शन घेण्याची इच्छा असून पदरीं द्रव्य नसल्यामुळें तें घेतां आलं नाहीं ते सर्व या. विन्मुख जऊं नका ! या अधमाना कर बसाविण्याची स्फूर्ती कोणीही देवो. पण त्यामुळें या वारकरी मंडळीच्या दर्शनसुखांत अंतराय होतो तो होऊं देऊं नये. त्यानां पांडुरंगाचं दर्शन घडावं अशी श्रीपांडुरंगानंच मला स्फूर्ती दिली आहे. तर या आणि पांडुरंगाचं दर्शन घ्या.

पद ५

संत या हो सकल या । करा सफळ काया ॥
शांकित न व्हा मनि ॥ धृ० ॥
देव रखुमापती । बाहि तुम्हां प्रती ॥
कारित मी ही विनती । दर्शन करा या ॥ १ ॥

हेम मौक्तिक मदें । झालि दूषित तनू ।।
शुद्धता वितरण्या । द्या मज सहाया ।। २ ।।

[ वारकरी लोकांच्या झुंडीच्या झुंडी येतात. ]

बोध०:—भानुदास, अशा हट्टाला पेटण्यांत काय अर्थ आहे ? माझ्यासारखं दिवाळं काढून घ्यायच आहे कीं काय ?

भानु०:—निघेल, दिवाळंही निघेल. पण तुझ्यासारखं मात्र नाहीं. पदरचा सर्व पैसा गेला तरी मला वाईट वाटणार नाहीं. उलट तो सत्कारणीं खर्च झाला अशा विचारानं मला आनंदच होईल.

बोध०:—दगडूबुवा, वेळ आहे साधून घ्या ! एक वर्षाचं काम एका दिवसांत होणार असा रंग दिसतो.

वार०:—शाबास, भानुदासा शाबास ! श्रीपांडुरंग तुझं कल्याण करो. आजन्मांत गोष्ट घडली नाही ती आज घडणार होती. पांडुरंगाचं दर्शन जर आज झालं नसतं तर आम्हां वारकऱ्यांना चंद्रभागेंत जाऊन जीव देण्या पलीकडे दुसरं कांहीं साधन नव्हतं.

भानु०:—महाराज, मला शाबासकी कसली देता ? तुमच्या पांडुरंग-दर्शनाच्या उत्कट इच्छेचंच हें फळ आहे ! दुसरं तिसरं कांहीं नाहीं. या. अहो पंच बोला यांच्याकरितां किती कर द्यायचा ?

दग०:—हें पहा भानुदास, तुमच्या या कृत्यानं पंचांच्या अधिकाराचा उपमर्द होत आहे. त्याअर्थी आम्हालाही आपल्या अधिकाराचं महत्व राखण्याकरतां जास्त जास्त कर घेत गेलं पाहिजे. यापुढं दर्शनाला जाणारां करतां पांचशें रुपये कर पडेल !

भानु०:—ठीक आहे. रक्कम मोजायला मज जवळ नाहींच. पण अंगावर जे चार मौल्यवान जिन्नस आहेत ते मी देतों. बोला या जिनसांच्या किंमतीत किती वारकरी सोडतां येतील ते !

दग०:—आणखी चार वारकरी आंत सोडीन [ मोजून चार सोडतो ]

गुण०:—आपल्या आंगावरचे जिन्नस संपले असले तर माझ्या आंगावरचे आहेत ! ते घ्या मीं काढून देतें.

चक्र०:—बाबा हें पहा मी आपल्याही आंगावरचे दागिने देतो.

पद ६

का चिंता । कारितसां सदय ताता ॥
सुख बहु मज मनिं गमे देह असा सकल कारितां रिता ॥धृ०॥
भूषणें सकल माझीं । अर्पिता संत काजीं ॥
धन्य मी होत आजी ॥
मम जड तनु तनु तरी ती हि वरी ॥
विकिन भरी, जरि कार्य हो आतां ॥ १ ॥

दग०:—हें पहा भानुदास, तुमच्या आंगावरच्या जिनसांत जितके वारकरी आंत सुटले तितके तुमच्या स्त्रीच्या दागिन्यांत सुटणार नाहींत. वारकरी सोडण्यासंबंधानं आम्हीं पंच त्याची किंमत चौथाई धरणार ! बोलून चालून बायकोच्या आंगावरचे दागिने. ते आम्हीं संस्थानच्या पवित्र पेटींत टाकूं सुद्धां देऊं नयेत. पण आतां तुमचा आग्रहच आहे म्हणून घेतों. आणि या तुमच्या मुलाच्या आंगावरच्या दागिन्यांत फारच झालं तर त्याच्याच वयाचा एखादा अर्धा मुलगा वारकरी आंत सोडूं.

भानु०:—हें पहा, तुमचा हा कावा न समजण्या इतका कांहीं मी मंद-बुद्धीचा नाहीं खास. पण एकदां शब्द केला तो मी परत घेणार नाहीं. आम्हा सर्वांच्या आंगावरचे सर्व दागीने घेऊन जितके वारकरी तुम्हाला आंत सोडण्याची बुद्धी देव देईल तितक्यांना तरी मी आज देवदर्शन घडविलं याचं मला समाधान वाटेल. हे घ्या सर्व दागिने. संतकार्याला खर्ची पडण्याचं त्यांचं दैव आज उगवलं. ते आज धन्य झाले ! [ दागिने काढून पेटीवर ठेवतो ]

बोध०:—वः आम्हालाही कांहीं वारकऱ्यांची दया येतच नसेल जशी कांहीं. शिपाई, जाऊं द्या या पांच वारकऱ्यांना आंत [ मोजून पांच सोडतो ]

भानु०:—पांडुरंगा, तुझ्या दर्शनाला येण्याला विलंब लागला याची क्षमा कर. प्रिये, चल. बाळ चक्रपाणी, चल. आतां आपणांहि पंढरीनाथाचं दर्शन घेऊं [ आंत जाऊं लागतात तोंच दगडूबुवा त्यास प्रतिबंध करतो. ]

बोध०:—वः, हा उदारपणाचा मासला अपूर्वच म्हणायचा ! दागिन्याच्या मोबदला वारकऱ्यांना दर्शन घडविल्याचं पुण्य घेऊन वरती बटाई मनोती म्हणून आपण बायकापोरांसुद्धां कर न देतां आंत जाणार वाटतं ! तुमचा असेल हा भोळा भाव, पण आम्हीं पंचांनीं तो सिद्धिला जाऊं द्यायला पाहिजे ना ? चला फिरा मागं. मी तुम्हाला आंत जाऊं देणार नाहीं.

भानु०:—हा कावेबाजपणा तुमचा तुम्हालाच शोभेल. बोला हें संस्थान कुणी स्थापलं ?

दग०:—कुणीं म्हणजे? बिन अधिकारानच जसं काय स्थापलं असेल ! संस्थान स्थापलं गांवच्या पंचानीं.

भानु०:—आणि पंच कुणी निवडले ?

बोध०:—[ जलदीनं ] मला यांनी. यांना मी. आम्हीं दोघांनी मिळून भुलाजी राजे पाटील देशमूख, याना निवडले. आणि पाटलांनी आम्हां दोघांची नेमणूक कायम केली. समजलं आतां तरी !

भानु०:—समजलों सर्व समजलों. ठाण्याच्या अधिकाऱ्याकडे आतां असाच जातों. आणि सार्वजनीक देवस्थान अशा रीतीनं ताब्यांत घेऊन वारकऱ्यांकडून पैसे उकळल्याबद्दल फिर्याद देतों.

दगः—वारे वा ! म्हणजे वारकऱ्यांना दर्शन करविल्याचं पुण्य पदरांत पाडून घेऊन शिवाय अधिकाऱ्यांच्या मदतीनं संस्थानाकडून दागिनेही परत घेणार वाटतं ! पण म्हटलं साधूबुवा, हा तुमचा प्रयत्न व्यर्थ आहे समजला. हें देवस्थान सार्वजनीक आहे म्हणून तुम्हाला सांगितलं कुणीं ? कोण लेक या देवळावर आणि या मूर्तीवर हक्क सांगतो पाहू. येऊं दे तर पुढें, म्हणजे पायच मोडून हातांत देईन. ठाऊक नाहीं अजून. अहो भानुदास, चला चालते व्हा इथून. हें देवस्थान सार्वजनीक म्हणण्याचा तुमचा कावा आहे असं जर मला आधिं कळतं तर कराचे पैसे मिळत असतांही मी हे वारकरी सुद्धां आंत सोडून दिले नसते असं समजा ! श्रीपंढरीनाथाच्या मनांत माझं कल्याण करावं असं आलं म्हणून मूर्ती आपल्या एक दिवस स्वयंभू माझ्या देवघरांत येऊन बसल्या. लोकांना

पुण्य घडावं म्हणून मी मेहेरबानगीनं दर्शनाला आंत सोडतो. त्याचा फायदा घेऊन ते आतां माझ्या मूर्तीवरच हक्क सांगू पहाणार ! आणि मूर्ती घरांत आहे म्हणून घरावर ! आणि माझं घर म्हणून माझ्यावर ! आणि माझी बायको म्हणून माझ्या बायकोवर ही हक्क सांगू लागाल !

भानु०:—दगडूबुवा, श्रीपांडुरंग तुमच्या एकट्याचीच खाजगी मिळकत झाला तर त्यांत मला काय, आणि कुणाला काय, वाईट वाटायचं काय कारण ? उलट तुम्हीं सर्व संतांतले संत, साधुश्रेष्ठ भक्तशिरोमणी म्हणून तुमच्या पायांची धूळ आम्हीं डोक्यावर उचलून ठेऊं. देवभक्तांच्या घरीं पूर्वी राबला तसा तो तुमच्या घरीं जर उद्यां राबूं लागला तर तो प्रभूच्या भक्तवात्सल्याचा अपूर्व सोहळा पाहयला जग लोटेल. दगडूबुवा, श्रीविठ्ठलाला आपला एकट्याचा करा, त्यांत जगाचं कांहीं बिघडत नाहीं.

पद ७

पूर्ण करा अपुलासा भोळा रखुमापती ॥ धृ० ॥
विश्व अखिल जो व्यापुनि राहे ॥
राहो तो प्रभु मनुजा हातीं ॥ रखुमापती ॥ १ ॥
अंत न लागे ज्या ब्रम्हाचा ॥
पावो संकोचातें तव चित्तीं ॥ रखुमापती ॥ २ ॥
चाकर करुनी देव आपुला ॥
सुखें करा मोक्षाची खंती ॥ रखुमापती ॥ ३ ॥

दग०:—देव माझ्या घरीं आणखी राबायचा तो काय राहयला आहे ? तो माझा आहे म्हणून तर असे पेटी भरभरून दागिने आणि पैसे मला देतो. आणि तुमच्या सारख्याच्या आंगावरून लुबाडून घेतो.

भानु०:—दगडूबुवा, अरेरे तुमच्या पाखांड वादाची मला खंती येते. परमेश्वर अनेक भक्तांच्या घरीं राबला आहे खरा. पण तो त्यांचा द्रव्यलोभ पुरविण्याकरतां नव्हे. आणि अजून तरी काय झालं आहे ? मीही तुमच्या घरीं श्रीपांडुरंग किती दिवस राबतो हें पाहण्यास पंढरपुरा-सच राहणार ! प्रभूची भक्तवत्सला मला माहीत आहे. पण ती अशा

कामी खर्च पडत नसते. असो; मला श्रीपांडुरंगाच्या मूर्तीचं दर्शन घडणार नाहीं इतकंच ना ? ऊः त्यांत काय आहे ? ज्याच्या हृदयांत पांडुरंग वसत नसेल त्यानं त्याच्या प्रत्यक्ष दर्शनाचा हट्ट धरावा.

दग०:—जा जा. तुमचं समाधान कितपत खरं आहे हें मी ओळखतों आणि तुमच्या दटावणीला मी भीक घालत नाहीं ! चोपून वाटेल तितका कर घेतल्या शिवाय मी कुणाही वारकऱ्याला माझ्या घरांतल्या मूर्तीचं दर्शन करूं देणारच नाहीं.

भानु०:—ठीक आहे, जशी श्रीपांडुरंगाची मर्जी ! चल प्रिये बाळा चक्रपाणी आपण आतां चंद्रभागेवर स्नानाला जाऊं, आणि निर्धन वारकऱ्यांवर या आधम स्वार्थी मंडळींनीं स्वार्थ—परायणतेमुळं आणलेलं संकट चंद्रभागेला साक्षी ठेऊन प्रभुचरणीं निवेदन करूं. आणखी उरलेले हे वारकरीही मी आंत सोडले असते, पण आतां आमच्या जवळ याचा हा जबर कर भागविण्याइतकं द्रव्य किंवा दागिने कुठें राहिले आहेत ?

गुण०:—खचीत यांची ही दशा पाहून पंढरीरायाला दया आल्यावांचून राहणार नाहीं.

चक्र०:—बाबा, ती वारकऱ्यांचीं मुलं पहा माझ्या सारखीच देवदर्शन घ्यायला टपून बसलीं आहेत. पण मलाही नाही आणि त्यांनाही नाहीं दर्शन घडत आज.

भानु०:—देवा,

पद ८

खल कुळा लागला चाळा । घालीं आळा गोपाळा ॥ धृ० ॥
गंगा लोटुनि आली द्वारीं । मानीं तीतें नागझरी ॥
दर्शन प्रभुचें निशिदिनिं होतां । खंति तयाची करि भारी ॥
परमार्थाचें सुवर्ण उज्वल । दैवें पडलें जरि पदरीं ॥
भक्ति निकष तो न मिळे म्हणुनीं । पाषाणासम दूर करी ॥ २ ॥
संत चालुनी घरासि येतां । रागें भरुनि झिडकारी ॥
नरकवास तो स्वयें मिळवुनी । करि इतरां पीडा भारी ॥ ३ ॥

[ भानुदास, गुणवंता, चक्रपाणी जातात. ]

दग०:—मोठा आला होता वारकऱ्यांचा कैवारी ?

बोध०:—पण सगळ्यांचे दागिने लुबाडून घेऊन दिला की नाही आपण धुडकावून त्याला ?

दग०:—हा सगळ्या वारकऱ्यांचा म्होरक्या. त्याची जर आपण डाळ शिजूं दिली नाहीं तर हे बाकीचे टाळकुटे काय करणार आपलं ?

१ ला वार०:—गेला बिचारा भानुदास ! आम्हां वारकऱ्यांकरितां सर्व दागिने गमावून गेला. त्याच्यासारख्या श्रीमान आणि जाणत्या वारकऱ्याची डाळ शिजली नाहीं मग आम्हाला कोण विचारतो ? चला, आतां परत. उगीच दर्शनाची आशा धरून तिष्ठत बसण्यांत काय अर्थ ? झालं, दुरुन मूर्तीच्या जागेचं दर्शन घडलं तितकंच आपलं पुण्य.

२ रा वार०:—तें काय म्हणून ? जर आम्हां वारकऱ्यांची पांडुरंगाच्या मूर्तीच्या दर्शनाची इच्छा खरी असेल तर आम्हाला तो या घरांतून बाहेर पडून सुद्धां दर्शन देईल. हिरण्यकश्यपूच्या राजवाड्याचे प्रचंड स्तंभ ज्यानं विदारण केले, त्याला या दगड्या वडव्यांचं घर फोडून बाहेर पडायचं काय कठीण ?

दग०:—अहाहा, देव तुम्हां चोरट्या लोकांसारखाच घर फोडायचं करीत असेल जणूं कांहीं ? अशा त्रासानं कर द्यायचा सुटणार नाहीं.

वार०:—चला, या नीच मनुष्याशीं हुजत घालीत बसण्यांत काय अर्थ ? म्हणा पुंडलीक वरदे हारि विठ्ठल.

[ भजन करीत जातात. ]

अंक पहिला समाप्त.

---

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ:—पंढरपूर [ मंगळवेढ्याचा ठाणेदार व भुलाजी पाटील बोलत बोलत प्रवेश करतात. ]

ठाणेदार:—पाटील, मग कसं काय ? येवढ्या मोठ्या राजाची स्वारी पंढरपुरीं येणार, त्याची बरदास्त राहिली पाहिजे.

भुलाजी:—कसं म्हटलंत ठाणेदारसाहेब ? मोठी राजाची स्वारी येणार ? येऊं दे. आपण समदी बरदास्त ठेऊं. ती फुकट जायची नाहीं. पण कोण राजा म्हणालांत त्यो ? त्याचं नांव गांव तुम्हीं सांगितलं पण मी भुलून गेलों बघा.

ठाणे०:—तुमचं नांवच भुलाजीराव तेव्हां तुम्हीं भुलायचेच. राजाचं नांव कृष्णदेवराय, आणि येणार अनागुंदीहून. आतां नीट ध्यानांत ठेवा विसरूं नका.

भुलाजी:—( आठवलंसं करून ) कृष्णदेवराय—अनागुंदी कृष्णदेवराय—अनागुंदी. कांहो ठाणेदारसाहेब हीं नांवं परकी लागतात कानाला. आपल्या-इकडचीं नाहींत कांहीं.

ठाणे०:—खरं आहे तुम्हीं म्हणतां तें. राजा कानडी मुलुखाचा आहे.

भुलाजी:—मग पंचाईत होणार. कारण ही हेंगाडी कानडी भाषा कुणा लेकाला कळती पंढरपुरांत ?

ठाणे:०—कळती थोड्या थोड्या लोकांना. शिवाय राजाबरोबरही आहेत कांहीं कांहीं मराठी जाणणारे पंडीत. आणि स्वत: राजा तर कानडी असून उत्तम मराठी बोलतो.

भुलाजी:—आणि कायहो, येवढा मोठा राजा कशाला हो येणार या आमच्या पंढरपूरला ?

ठाणे०:—राजाला काय ? इकडे कुणा पाळेगारांवर स्वारी व्हायची असेल झालं. तेंही पुंडच. पालेगार पुंड आणि त्यांच्यावर स्वारी करणारे राजेही पुंडच. पण वाटेत पंढरपुरला स्वारी येणार ती मात्र पंढरीनाथाच्या दर्शनाला.

भुलाजी:—आणि कानडी मुलखांतलीं देवस्थानं ओसच पडलीं असतील जशीं कांहीं ! ठाणेदारसाहेब, काय सांगू तुम्हाला ? आमच्या या दगडोबा बडव्याच्या घरच्या विठोबाच्या मूर्तीचं इतकं देव्हारं माजलेलं पाहून मला तर हंसायला येतं.

ठाणे०:—तें कां ?

भुलाजी:—काय त्या हेंगाड्या मूर्ती ? कांहीं तरी रूप किंवा तेज त्यांच्या तोंडावर ? कुणी नवाशिक्या पाथरवटानं दारूच्या निशेंत घडल्या असाव्या टांकीचं काम शिकायला झालं ! दगडोबाच्या कुणा आजा-पणजाच्या हातीं त्या पडल्या असतील कर्ज फेडीच्या वेळीं व्याजमुद्दलाच्या हिशोबांत ! त्यानं त्या ठेवल्या माजघरांत पुढं मागं पाल्यावरवंट्याचे दगड करायला उपयोगी पडतील म्हणून ! आणि अडगळ मोडतांना त्या ज्या गेल्या देवघरांत चुकून त्या तेव्हांपासून तिथंच बसल्या ठाणं देऊन झालं. एकानं गंध लावलं, दुसऱ्यानं फूल वाह्यलं, तिसऱ्यानं नैवेद्य दाख-विला, चवथ्यानं नवस केला, पांचव्यानं दुसऱ्या एका देवाचा नवस फेडतांना टाकलं यालाही एक खोबऱ्याचं भक्कल. असं होतां होतां बनलं देवस्थान आणि काय ? झालं, एक वारकरी आला, दुसरा आला, माजली गर्दी ! बाकी जसे हे पुजारी तसा त्यांचा हा देव. नुसते मैंद. बरी गुलामांची पोळी पिकली आहे आणि काय ? आणि आतां हा अनागुंदीचा राजा आला दर्शनाला म्हणजे मग तर बोलायलाच नको ! मला तर ह्या विठोबाच्या मूर्ती इथून कोणी घेऊन जाईल तर बरं वाटेल !

ठाणे०:—[ आश्चर्यानं ] तें कां बरं ?

भुलाजी:—वारकरी आले पंढरपूरला म्हणजे बामण पुजाऱ्यांची उडती चंगाळी. आणि गांवचा देशमूख पाटील म्हणून मला यात्रेची

सगळी घाण स्वत: उभं राहून काढावी लागते. यांचा होतो देवधर्म पण माझं उभं राहतं साता जन्माचं कर्म !

ठाणे०:—पण तुमच्या गावाला महत्व तर आलं आहे की नाहीं या देवस्थानामुळं! श्रीविठ्ठलाची ही पंढरी आणि पंढरीचे तुम्हीं पाटील. केवढा तुमचा मोठेपणा!

भुलाजी:—कुणा लेकाला हवं असलं कोरडं महत्व! या वारकऱ्यां-कडनं उकळायला काय सांपडणार? घ्या त्यांची लंगोटी, आणि तीहि धड असली तर!

ठाणे०:—पण आतां ह्या अनागुंदीचा राजा येतो आहेना आपल्या पायानं! तेव्हां घ्या त्याच्या सरबराईत हात साधून!

भुलाजी:—हें बघा जसा राजा असेल तसं होईल. असेल एखादा वेडा भोळा आणि उधळ्या तर साधेल कांहीं तरी. नाहीं तर एवढसं कांहीं बिघडलं त्याच्या सरबराईत तर नेईल मुसक्या बांधून आणि देईल मिरच्याची धुरी झाडाला टांगून. काय घ्या त्याचं! पाटलाचं कामच लई खराब.

ठाणे०:—बरं. काय हो पाटील, काल वारकरी लोकांना मूर्तीचं दर्शन घडलं नाहीं, त्यांच्यावर कर बसविला, अशी तक्रार आली आहे माझ्याकडं त्याचं कसं काय? आणि ज्या पंचांच्या नांवानं कर वसूल करतात त्यांत तुम्हीं ही एक आहांत म्हणे? ( किंचित रागावून ) हें काय प्रकर्ण आहे?

भुलाजी:—आली का कागाळी आपल्या कानापावतर? सांगूच तर त्येतलं इंगीत. हे बगा ठाणेदारसाब, मी गांवचा पाटील आहे नव्हं! झालं तर समध्या बऱ्या वाईट कामांत माझं अंग आपलं नसून असायचंच आणि असून नसायचंच? कोपऱ्यावरच्या दगडाला कुणी जातां जातां शेंदूर फासून देव बनवायचं मनांत आलं, तरी पहिल्यानं शेंदराचा टिळा मला लावायला हवा ना! बारशाला पाटील आणि बाराव्यालाबी पाटीलच! समध्याची वर्दी माझ्या कानावर यायला व्हावी. ये विठूबाच्या पंचामधी माझं नांव असं गेलया गुंतून झालें! दुसरं काय?

ठाणे०:—पण पंचांचं हें काम बरोबर कायदेशीर नाहीं, असं ठरलं तर ?

भुलाजीः—तसं झालं तर त्ये गांवच अपुन नव्हं असंच सांगून देनार आपून ! बरं भावलं तर काम आपलं, बुरं भावलं तर काम लोकांचं ! अस केल्याशिवाय पाटिलकी कशी निभावती अन कशी गाजती ?

ठाणे०:—पण दगडूबुवांनीं पंचांचं नांव करून नवा कर बसवून खूप पैसे मिळविले म्हणतात. मग त्यांत आमचाही हिस्सा असला पाहिजे थोडा ?

भुलाजीः—वः तुमचा तर हिस्सा पहिल्यानं ! पण ठाणेदार, हा दगडूबुवा आहे मोठा लोभी. त्याच्या हातातून पैसा सुटायाचा लई कठीण. चला बघतों कसं काय जुळतं त्ये. त्यानं तुमची माझी गपचीप समजी केली तर बरी गोष्ट. नाहीं तर आपणच पडू त्याच्यावर उलटून. कुठल पंच ? कुणीं नेमले ? कर घेण्याचा अधिकार कुणीं दिलता ? कुणाचं देवस्थान ? कुणाच्या विठोबाच्या मूर्ती ? असं करून देऊं त्याचं संस्थान उधळून.

ठाणे०:—अहो मी सांगतों त्याला आणखी एक युक्ती. तो बऱ्या बोलानं वळत नसला तर द्या तुम्हीं माझ्याकडं एक अर्ज आणि त्यांत लिहा कीं " मला दृष्टांत झाला. वारकऱ्यांकडून जितके पैसे दगडूबुवांनीं घेतले तितके तापलेल्या उलथन्याचे डाग माझ्या अंगावर बसले. मला आतां येथून उचलून न्या. त्याशिवाय माझ्या अंगाचा दाह शांत होणार नाहीं, " असं विठोबानं मला स्वप्नांत सांगितलं असं त्या अर्जांत लिहा. म्हणजे मी तुमचा अर्ज मंजूर करतों. गांवच्या पाटलाला दृष्टांत झाला, तेव्हां तो खरा असलाच पाहिजे असं ठरवून मूर्ती दगडूबुवाच्या घरून उचलून नेण्याचा हुकूम मी देतों आणि पाटील म्हणून हुकमाची अंमलबजावणी करण्याचं काम तुमच्याकडेच येणार. घ्या हवं तसं साधून. बरं आहे. मी जातों आतां. गांवच्या शिवेचे उलथे आणि पालथे दगड तपासायला मला जायचं आहे. [ जातो. ]

भुलाजीः—आज लई दिस या विठोबाच्या मूर्तीच दुःख माझ्या पोटांत दुखत होतं; पण चांगलीशी युगत गवसना ! दगडूबुवांनीं पंच नेमून कर

बसवायची गोष्ट काढली तेव्हां आयता आपला हात शिरेल म्हणून होय म्हटलं. कर बसल्यानं कर कुनी देणार नाहीं आन वारकऱ्यांचा टाळकूट मात्र थांबेल असं वाटलं; पण हें पहावं तों भलतच झालं. टाळकुटीची कटकट तर थांबली नाहींच; पण दगडूवाला गेला बाजार पांच हजार रुपये मिळाले. त्याच्याकडं जातो आतां चौकशीला ! पंचाच्या मिळकतीतला तिसरा हिस्सा आपला. [ मंगळाजी येते. ]

मंग०:—अव पाटीलबुवा !

भुलजीः—[ घाईघाईनें ] या मंगळाजी ! आज इकडे कोणीकडे ? आज आळशावर गंगाच लोटली म्हणायची !

मंग०:—जळली तुमची ती गंगा आणि जळली तुमची ती पाटीलकी.

भुलाजीः—आज स्वारी लई रागांतशी आहे ?

मंग०:—जळला मेला माझा राग. तुह्माला काय झालं लांबून लांबून राहून माझ्या रागाची थट्टा करायला ? आज चार महिन्यांत फिरकलांत तरी कां घरीं ? आला असतां म्हणजे या दगडूबुवाच्या शेजारानं माझे कसे हाल चालविले आहेत ते कळविले तरी असते.

भुलाजीः—काय ? दगडूबुवा वडवे तुह्मांला त्रास देतो कीं काय ? तसं असलं तर सांगा ह्मणजे दाखवितों त्याला गांवच्या पाटलाचा हिस्का कसा काय असतो तो. बोला लवकर बोला !

मंग०:—त्रास नाहींतर काय ? मेले रात्रंदिवस जमतात त्याच्या घरीं रिकाम-टेकडे लोक ! आणि बसतात टाळ कुटीत. मग त्रास न होईल तर कसं होईल ? बरं मी तरी अशी कांहीं लांब राहातें ? दगडूबुवाची आणि माझी अगदीं पाठीला पाठ लागलेली. एक पडकं भिंताड तेवढं मध्यें ! या टाळकुट्यानीं अगदीं भंडावून सोडलं. जरा कधीं तंबोरा सोडून गायला बसेन म्हटलं तर झाला मेला यांच्या टाळांचा खणखणाट सुरू. सूर नाहीं आणि ताल नाहीं. गातात काय गाढवावाणी आन् नाचून उड्या मारतात काय माकडावाणी ? बारा आणि बारा चोवीस तास बसलेले असतात त्या दगडापुढं ! जसा कांहीं पाहाराच ठेवला आहे पगारी नोकरांचा माझ्याकडं कोण येतं जातं ते पहायला.

पद ९

किति कुटाळ टाळकुटे, ताळ तंत कांहिं न या ॥
करिति सदा छल हे माझा, त्यांसि येत मुळिं न दया ॥ धृ० ॥
रात्रि करुनि हरिजागर, घर माझें जागविती ॥
चोरुनि जे धनिक धर्नी भेटाया मज येती ॥
भिववुनि त्यां पोटावरि आणिति हे खल पाया ॥ १ ॥

यांच्या या गोंगाटांत माझ्या एक मेलीच्या गाण्याची तालीम राहो. पण कोणी गोंधळी, भराडी, मुरळी, वाघ्या, तमासगीर आला आणि त्यांच्याकडून गाववीन म्हटलं तर यांच्या टाळ मृदंगाच्या कटकटीपुढें कसलं त्यांचं गाणं ऐकायला येणार ? पाटीलबुवा बोला, ही मेलं टाळकुटयांची कटकट बंद करता कीं नाहीं ? फेकून द्याना त्या मूर्ती दगडूबुवाच्या घरांतून काढून ! आणि ठाणेदाराकडं फिर्यादच गेली तर घेऊन या त्याना एक दिवस माझ्या घरीं पट्टी खायला आणि गाणं ऐकायला म्हणजे झालं. मी काढीन त्यांची समजूत कशी तरी.

भुलाजीः—अरे हो, पण मंगळाजी बोलूं तरी द्याल कीं नाहीं मला योडसं ? तुमच्या मागचा हा टाळकुटयांचा त्रास चुकावा म्हणून मी यापूर्वीच प्रयत्नाला लागलों आहें; पण तुह्मांला हें कसं कळणार ? ही टाळकूट कायमची थांबली म्हणजे तर होय म्हणाल ! मी अगदीं पक्का बंदोबस्त करतों त्याचा. असा पक्का बंदोबस्त कीं तुम्हीं आपल्या आंगणांत दिवसाढवळ्या जरी तमाशा उभा केलात तरि तिकडे ढुंकून सुद्धां कुणीं पाहूं नये. बरं तुह्मांला एक बातमी सांगायला येणार होतों तुमच्या हिताची.

मंग०:—ती कशाबद्दल ?

भुलाजीः—हें पहा. ठाणेदार साहेबांनीं मला अशी बातमी नुकतीच सांगितली कीं, अनागुंदीचे राजे कृष्णदेवराय यांची स्वारी लौकरच या आपल्या पंढरपुरास येणार आहे.

मंग०— असं कां ?

भुलाजीः—होय असंच, अगदीं खरं. स्वारी पंढरिनाथाच्या दर्शनाला येणार आहे म्हणतात !

मंग०:—काय ? आमच्या या दगडूबुवा बडव्याच्या घरचे दगड पाहायला ? कायहो पाटीलबुवा, राजेलोक इतके कां मूर्ख असतात ?

भुलाजी:—राजेलोकांना मूर्ख कुणी म्हणावं ? फारच झालं तर असं म्हणावं कीं, दगडूबुवाच्या घरच्या दगडांची सद्दी मात्र विलक्षण. कारण एवढा मोठा परदेशाचा राजा त्याच्या घरच्या दगडांच्या दर्शनाला येतो !

मंग०:—तो राजा मूर्ख असो, नाहींतर त्या दगडांची सद्दी मोठी असो; कांहीं झालं तरी राजा यात्रेला येणार. पण त्यांत माझ्यासारखीला कसला लाभ आणि कसला आनंद ?

भुला०:—तसं कां म्हणता ? राजेलोक यात्रेला गेले तरी नायाकिणींचीं गाणीं ऐकायला कमी करतात कीं काय ? धर्माच्या वेळीं धर्मकृत्य आणि आनंदाच्या वेळीं आनंद. राजेलोकांनीं करावं तें तें त्यानां शोभतं. शिवाय हा राजा यात्रेला येणार असला तरी त्याच्या बरोबरचे अमीर-उमराव थोडेच असणार त्याच्यासारखे भावीक ! पापापुण्याचे जितके प्रकार या जगांत असतील, जितके सर्व असतात राजेलोकांच्या स्वारीत. हे राजेसाहेब येऊन जाईपर्यंत तुमचीं घरीं आणि बाहेर मिळून पांच गाणीं न झालीं तर मला विचारा !

मंगळा०:—पण या टाळकुट्यांची गर्दी आधीं थांबवा बाई ! नाहींतर कसलीं गाणीं घेऊन बसलां आणि काय ? बरं मी जातें तर ! पण मी सांगितलेलं नीट ध्यानांत राहूं दे बरं का ? [ जाते ]

भुला०:—चला एक काम झालं. ठाणेदार आपल्याला पुरे वश होणार ! दगडूबुवांनीं कर वसूल केलेल्यांतले पैसे बरेचसे दिले, तर ठीकच झालं. आपण दगडूबुवाच्या बाजूनं भांडू. आणि तसं न झालं तर दगडूबुवाच्या घरांतल्या मूर्ती काढून नेण्यापर्यंत मजल जायला हरकत नाहीं. कारण खुद्द ठाणेदारांची या कामाला संमती. पण कसंही असलं तरी ही आनागुंदीच्या राजाची स्वारी येऊन जाईपर्यंत मूर्ती हालवूं नये. कारण राजाचा विरस झाला तर एरवीं थोडाबहुत लाभ व्हायचा तो बुडेल.

[ शंभुबुवा प्रवेश करतो ]

शंभु०:—राम राम पाटीलबुवा राम राम !

भुला०:—राम राम शंभुबुवा राम राम. कां आज कुणीकडे ?

शंभु०:—आपणा कडेच आलों. पाटीलबुवा, हा माझा अर्ज घ्या आणि गांवची पंचाईत बोलवा लौकर !

भुला०:—कसला अर्ज ? आणि पंचाईत कशाला बोलवायची ? कांहीं सांगाल कीं नाहीं शंभुबुवा ?

शंभु०:—अर्ज भाऊपणाच्या वांटणीचा. पंचाईत बोलवायची ती वांटणी करण्याकरतां ?

भुला०:—कसली वांटणी ?

शंभु०:—हे दगडूबुवा आणि मी आहोंत चुलत चुलत चुलत भाऊ. आमच्या घरांदारांची आणि उत्पन्नाची वांटणी व्हायची आहे आजून.

भुला०:—( हंसून ) दगडूबुवाला देवदर्शनावर कर बसवून पैसा मिळाला म्हणून आठवली वाटत ही वांटणी ?

शंभु०:—तसं नाही कांहीं. पण आमच्या पूर्वींच्या वांटण्याबरोबर झाल्या नाहींत अशा पुराव्याचे कागद सांपडले आहेत मला.

भुला०:—मग आतां तुम्हीं वाटणीं कशांत मागणार ?

शंभु०:—देवस्थानांत ?

भुला०:—आलं माझ्या लक्षांत. पण देवस्थान म्हणजे नुसतं उत्पन्न कीं—

शंभु०:—सर्व कांहीं. देव घराची जागा, देवापुढचं उत्पन्न, देवाच्या मूर्ती, सगळ्यांत निम्मा हिस्सा मला मिळालाच पाहिजे.

भुला०:—ठीक आहे. द्या अर्ज इकडे. मी बोलावतों गांव पंचाईत लवकरच. पण काम तुमच्यासारखं झालं तर मला काय द्याल !

शंभु०:—पाटीलबुवा, तें काय सांगायला हवं ? काय मिळेल ती मीठभाकर आपण पाहून घेऊं. वर आहे येतों मी. [ जातो ]

भुला०:—ठीक झालं. दगडूबुवाला धाक दाखवायला हेंही एक साधन बरं आलं हातांत. कराची वाटणी निमूटपणानं मला दिली

तर ठीक. नाहीं तर हेंही एक भूत त्याच्यावर उलटून घालायला बरं आहे. भाऊबंदकीचं भांडण ! हा शंभुबुवा विठोबा रखुमाबाईच्या मूर्ती फोडून सारखे तुकडे करून मागायचा ! मागो ! बरंच झालं. कराचा हिस्सा न मिळाला तर देवाच्या मूर्ती फुटतील. फुटल्या तर फुटल्या ! आपलं काय गेलं ? बरं आतां हा कानडा राजा येणार आपल्या गावीं त्याची कशी काय बडदास्त ठेवायची याच्या विचाराला लागलं पाहिजे.

[ जातो ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळः—पंढरपूर, चंद्रभागेचें वाळवंट.

[ भानुदास कीर्तन करीत उभा आहे. त्याच्या मागें त्याची स्त्री गुणवंताबाई व मुलगा चक्रपाणी हीं उभीं आहेत. वारकरी श्रोते कांहीं उभे व कांहीं बसले आहेत. त्याच गर्दीत विजयनगरच्या राजाचे आश्रित—आपय्या व तेनालीराम हे कीर्तनश्रवण करीत बसले आहेत. ]

**भानु०**:—[ पद म्हणून झाल्यावर ] पुंडलीक वरदा हारि विठ्ठल ! अहाहा या पंढरीचा महिमा काय वर्णावा ?

**अभंग**

तें हे जाणा पंढरपूर । मोक्ष मुक्तिचे माहेर घर ॥
करिति सर्व जयजयकार । वैष्णव तेथे भक्तीने ॥
टाळ घोळ चिपळ्या नाद । दिंड्या पताका मकरंद ॥
गाति विठ्ठलनाम आल्हाद । अट्टाहास करुनी ॥
देखोनिया पंढरपुर । जिवा आनंद आपार ॥
टाळ मृदंग वाजती । रामकृष्ण उच्चारती ॥
काशी आदि असती सत्य । परि पवित्र पंढरी ॥

आप०:—बघितलाका तेनालीराम ! कसा काशीची निंदा करतो. तो काशी अपवित्र आणि ही पंढरपूर पवित्र ! कशी उलटा बोलतो देख तेनालीराम—

तेना०:—अरे उलटा बोलते तोच सुलटा बोलते ! काशीला देवानं पवित्रपणा आंदण दिले काय ? अरे पवित्रपणा मनावर असते नव्हे काय ? जिथे मांडी घालून बसले जिथे मनानें क्षेत्र पुण्यभूमी म्हटले की पुण्यभूमी झाले. आपय्या, ही सर्व मनाचा खेळ असती.

भानु०:—पण पंढरपूर हें क्षेत्र झालं, पुण्याचं माहेरघर झालं तें कशामुळं ? तर या पंढरीनाथाच्या मूर्तीमुळं. आपल्या या पंढरीवर केवढे त्या दयाघन परमेश्वराचे उपकार !

न मागतां कांहीं । न करितां सेवा ॥
आलासीगा देवा । पंढरीये ॥

आप०:—ऐक ऐक तेनालीराम. ही हरदास कीर्तनकार काय म्हणते ते. देवा तूं पंढरीला आलास म्हणते. पूर्वी पंढरींत या मूर्ती नव्हत्या असं मी म्हणतो नाहीं ? बघ त्याचा प्रत्यंतर ?

तेना०:—अरे ते देवाला म्हणते. मूर्तीला कुठं म्हणते ?

भानु०:—

परलोकीची वस्तू पंढरीसी आली । ती दैवें भावली पुंडलीका ।।
घेतां देतां लाभ बहुतांसी झाला । विसावा जोडला पांडुरंग ।।

आप०:—ऐक ऐक तेनाली. तू आपली कानउघाडणी कर. परलोकची वस्तू पंढरीला आला म्हणते ? वस्तू म्हणजे काय देव कायरे— तेनाली ? परलोक म्हणजे दुसऱ्याचा देश नव्हे काय ? झालं तर, आणखी काय म्हणते बघ ! घेता देतां लाभ बहुतासी झाला. बोलना तेनाली, या मूर्ती देणारानं पैसा घेऊन दिल्या आणि त्या घेणारानं पंढरपूरला आणून विकल्या अशी आख्यायिका कानावर येतोना आपल्या अनागुंदीत ? ऐकतर, ही कीर्तनकार न कळतासवरता तोच गोष्टी बोलतो !

**तेना०**—अरे तुला परमार्थाची भाषा कळतो नाहीं! जेचा कीर्तन करतो जेचा गुण वर्णितो, तेचा खरेदी विक्री झाला अशी कीर्तनकार कधींही म्हणतो नाहीं. अरे परलोक म्हणजे आपला कानडी देश म्हणतो काय? तूं येडा आहेस आपय्या. तूं शास्त्री रे शास्त्री! मूर्ख. पुरा मूर्ख आहेस तूं.

**भानु०**:—अहाहा! भक्तवत्सल परमात्म्याचं तुम्हां पंढरीच्या लोकांवर केवढं तरी हें प्रेम!

**चंद्रभागे तीरीं उभा विटेवरी। विठ्ठल राज्य करी पंढरीगे ॥**

**आप०**:—ऐक तेनाली. काय म्हणते ही कीर्तनकार? पंडरीगे ही शब्द कानडी कीं मराठी? बोलना तूं तेनालीराम? आम्हीं आपली शास्त्री मूर्ख शास्त्री झाले. पण तूं तो शाहाणी पंडित ना? मग बोलकी पंढरीगे अशी शब्द मराठींत कशीं येते?

**भानु०**:—

**ऋद्धि सिद्धि धृती वोळंगती परिवार। न साहती**
**आवसर ब्रह्मादीका ॥ सांडोनी तेथूले यथाबीजे**
**केले। कवणें चाळविले कानडीयासी ॥**

**आप०**:—ऐक तेनालीराम आतां कां झोंप घेते कीं काय? "कवणें चाळविलें कानडीयासी?" काय म्हणते ही कीर्तनकार? या कानडी विठो-बाच्या मूर्तीला कुणीं चाळविली? तिला कोण घेऊन आली? असंच म्हणते नाहीं? चल तेनाली, आपणाला या कीर्तनांत आणखी कांहीं नको. आपण तो कृष्णदेवरायाला सांगते कीं, कीर्तनकार सुद्धां कबूल करते मूर्ती कानडी म्हणून? आपली मुलखांतली मूर्ती आपण घेऊन जाणार. राजा देश जिंकून नेतां, आपण आपली देवाची मूर्ती परत नेली तर तो काय थोडी देशकार्य झाली?

**तेना०**:—अरे आपय्या, तू मोठी दुराग्रही. राजाला मूर्ती न्यायची तर उचलून न्यावाना? त्याला कोण रांडलेक आडवती? पण तुझ्यासारख्या शास्त्रीलोकांनीं असला शब्दछल करु नव्हेरे! बरं चल तर चल. आप-

णाला लई आवडती हे कीर्तनकार ! पण आतां तू जाती तर आम्हीं बी येती तुझ्या संग.

[ आपय्या व तेनाली जातात. ]

भानु०:—असो; परमात्म्यानं कृपाकरून अशा मूर्ती भूलोकावर पाठविल्या, पुंडलीकासारख्या महात्म्यानं त्या पंढरीला आणल्या, पण अखेर त्या पडल्या मैंदाच्या हातीं. त्यांना कसली भक्ती ? त्यांना कसलं मूर्तींचं कौतुक ? त्यांना कसला मूर्तींचा जिव्हाळा ! त्यांना वोटभर पोटाच्या खळगीपुढं परमार्थ कसला दिसणार ? म्हणून बसविला त्यांनीं मूर्तींच्या दर्शनावर कर. पहा जगाचा कसा उलटा न्याय आहे तो. ज्याच्या संग्रहीं मूर्ती त्याला त्यांची किंमत नाहीं; आणि ज्यांचा मूर्तीशीं कांहीं-एक संबंध नाहीं, ते काय वाटेल ती किंमत देऊन मूर्तींचं नुसतं दर्शन व्हावं म्हणून धडपडतात. ईश्वराचं चरित्र अतर्क्य असतं असं म्हणतात; पण दुर्जनाचं चरित्र ईश्वरचरित्राहूनही अधिक अतर्क्य असंच झालं नाहीं काय ? ज्यांनीं देवदर्शनाची विक्री मांडली त्यांना या जगांत पवित्र असं काय असणार ? त्यांच्या धनलोभाला उपमा तरी कशाची द्यावी ?

लोभाचिया सोसें पडसी पतनीं । यमाची जाचणीं बहू असे ॥
भानुदास म्हणे सांडुनीयां सोस । होईरे उदास सर्व भावें ॥

नामदेव महाराजांनीं आपणांकडून संसारिकांना पुष्कळ बोध केला आहे. पण काय उपयोग ? ते म्हणतात—

परब्रम्हाची ती गोडी नेणती बापुडीं । संसार सांकडी
विषयभरीत ॥ जवळीं असतांचि क्षीर नव्हेरे वरपडा
रुधिर सेवितां गोचिडा जन्म गेला ॥
दर्दुरा कमलिनी एकेठायीं बिढार। वास तो मधुकर घेवोनि गेला ।
शेळिस घातली उसाची वैरणीं । घेऊं नये धणीं त्या रसाची॥

पण पंढरीनाथाच्या दर्शनावर कर बसवून पुण्याचा रुपाया मोडून पापाचा खुर्दा पदरांत घेणारे हे अधम यांच्या चरित्राच्या निषेधाला नामदेव

महाराज तरी कसे पुरे पडणार ? पण म्हणावं संभाळा देवदर्शनांवर कर बसवणारांनो संभाळा.

मधुमक्षिका मोहोळ रचिती रात्रंदिस । भाग्यवंत रस
घेवोनि गेला ।। गारुड्याचा खेळ दिसे क्षणभर ।
तैसा हा संसार दिसे खरा ।। नामा म्हणें तेथें कांहीं नसे
बरें । क्षणाचें हें खरें सर्व आहे ।।

मधमाशा जन्मभर मध गोळा करतात पण वेळ आली म्हणजे मोहोळासकट मध दुसराच घेऊन जातो. आणि मधमाशांना मिरच्याची धुरी खावी लागते. तसं होईल बरं सांभाळा. बाहेर वारकरी शेंकडों कोसांवरून आपल्या दर्शनाला आले पण या बडव्यांच्या धनलोभामुळें ते दर्शनसुखाला मुकले आणि दुःखी कष्टी निराश होऊन डोळ्यांतून पाणी काढीत परत गेले ही गोष्ट माझ्या पंढरी नाथानं पाहिली नसेल असं कां तुम्हांला वाटतं ? देवळाची कवाडं लावून विठोबाला आंधळा करूं पाहातात काय हे ? अरेरेरेरे. कोण हा भ्रम ? अशा घोर अपराधानं मिळविलली संपत्ती एक दिवस तरी कुणाच्या हातीं राहील काय ? फार काय, असल्या अधम नीचांच्या राहण्यानं दूषित झालेल्या जागेंत पंढरीनाथ राहील तरी कसा ? सात वीरावतारांतली शूर अवतारकृत्य ज्यानं केलीं, त्या परमेश्वराला या कवडिचुंबकांची फजीती आणि त्याना शिक्षा करणं कठीण जाईल काय ? हे वारकरी लोकहो, हे संतसज्जन हो, पदरीं द्रव्य नाहीं म्हणून खंती करूं नका ! तुमच्यासारखे श्रीमान तुम्हीच अहांत. कारण तुम्हांला जर घरांत प्रवेश करून मूर्तीचं दर्शन घेतां आलं नाहीं तर माझ्या पंढरीनाथाच्या मूर्ती च घराबाहेर येऊन तुम्हांला दर्शन देतील. असो, परमेश्वरा परनिंदेचे शब्द तोंडून गेले त्याची क्षमा कर. बाळ चक्रपाणी, तूं एखादें ईश्वरगुणवर्णनपर पद म्हण बरं [ गुणवताबाईकडे पाहून ] तूंही चक्रपाणीला थोडी मदत कर [ गुणवंता व चक्रपाणी पद म्हणतात व शेवटीं पुंडलीकवरदा हारिविठ्ठल असा घोष होतो. व पडदा पडतो. ]

पद १०

प्रभु वांछित कथिन तुझ्या पदीं ॥
दूषित न करो मजसि कुधी ॥
पर-मत्सर-निंदा-व्याधी ॥ धृ० ॥
कटु मधु जिव्हा वदेल जरि वदनीं ॥
ओष्ठाग्रीं परि विकार दोन्हीं ॥
मना नसो, मना नसो, स्पर्श कधीं ॥ प्रभु ॥ १ ॥

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ:--पंढरपूर. दगडूबुवाचं घर.

[ दगडूबुवा व त्याची स्त्री गंडकीबाई प्रवेश करते. ]

दग०:—[ हळूंच ] आतां दार उघडूं ना ? झालं ना तुझं काम पुरं !

गंड०:—[ बाहेर येऊन ] उघडा आतां दार खुशाल ! त्या पैशांचा आणि दागिन्यांचा अगदीं मागमूस सुद्धां नाहिसा केला आहे. आणि कुठं पुरुन ठेवलं आहे याचा पत्ता म्हणून कुणाला लागायचा नाही.

दग०:—हें बघ, एवढ्यानंही भागायचं नाही. बोधलेबुवा स्नानाला गेला आहे चंद्रभागेवर. तो परत येण्याच्या आधीं मी जातों स्नानाला. आणि तो आलेला दिसला न दिसला कीं, 'रात्रीं चोरी झाली, कर म्हणून वसूल केलेले सर्व दागिने आणि पैसे चोरट्यांनीं नेले' असं म्हणून रडत ऊठ. आणि तुमचं हें सुरूं आहे तंवर मी येतों स्नान करून. आणि मग मी तुला मदत करतों—रडायला. दिवसभर गोंधळ घालून रात्रीं पुरलेलं सारं उकरून काढूं. आणि पहाटेच्या प्रहरीं तें सारं घेऊन तूं चार दिवस माहेरीं निघून जा. मग बसू दे बोधल्याला हाका मारीत !

गंडकी:—जा तुम्हीं; मी करतें ती तजवीज सगळी बिनचुक पहा तरी !

दग०:—नाहीं. तूं आहेसच तशी हुषार. कांगावा करायला तुला कुणीं शिकवावं लागत नाहीं. पण बोधलेबुवा आहे जरा चौकस म्हणून आपलं तुला सांगून ठेवलं.

गंड०:—[ हसून ] असं कां ? मलाच एकटीला कांगावा करायला येतो वाटतं ? बरं पण त्याचा तंटा आतां कशाला ? जा तुम्हीं स्नानाला लवकर. बोधलेबुवा यायची वेळ झाली ! [ दगडूबुवा जातो. ] देवदर्शनावर कर बसवावयाची युक्ति यंदा चांगलीच निघाली म्हणावयाची ! परवांची मिळकत बरीच झाली. आणि जर कां असंच चाललं दर वर्षी तर बाई मला दागिन्याचं ओझं उचलायला सुद्धां यायचं नाहीं. परवां कराबद्दल त्या भानुदासाच्या बायकोनं दागिने दिले ते कसे पण छानदार आहेत. मीं हळूंच रात्रीं घालून सुद्धां पाहिले आंगावर ! वाटलं जसे कांहीं माझ्या आंगचेच केले आहेत. घरच्या विठोबाच्या मूर्तीचा अलीकडे मला मनांतनं अगदीं कंटाळा आला होता. वाटे कीं ह्या हेंगाड्या मूर्ती कुणाला तरी देऊन टाकाव्या. कशाला ही रिकामी अडगळ घरांत ? या मूर्तींनं जागा आडविल्यामुळं, जातं आणि उखळ घालण्याची माझी जागा सारी आडून गेली. झालं दर्शनाला येणाऱ्या आल्यागेल्याची उगीच मागं भुणभुण ! मेलं उत्पन्न नाहीं पैचं, आणि रिकामा नैवेद्य मात्र दररोज दाखवावा लागतो. पण हे वारकरी म्हणजे शुद्ध वेडं पीक आहे. (हंसून) त्यांना तेंच ध्यान हवं. तेंच ध्यान पाहयला हे इतके दागिने आणि पैसे देणार असतील तर राहिनांत कां त्याच मूर्ती देवघरांत ! मला थोडंच घालायचं आहे पाणी त्यांना ? आणि वाहयचं आहे गंधफूल ?

पद ११

हा धननिकर मज लाधला । नवस न करिता काशि
पावलि ही । अवचित कुलदेवी मजला ।। धृ० ।।
घालुनि अंगावरति दागिने । मिरवित जाइन माहेरीं ।।
दिपावित शेजाऱ्यांचे डोळे । होइल तोष तदा मजला ।। १ ।।
गोट पाटल्या तोडे वाकी । झबका नथ ऐशी नाकीं ।।
धरुनि पुढें आरसा सुबकसा । पाहिन थाट कसा सजला ।।२।।

[ बाहेर दूर पाहून ] अगबाई, हे बोघलेबुवा आलेच वाटतं स्नान करून. या म्हणावं. तुम्हांला या दागिन्यांतला आणि करांच्या पैशातला निम्मा हिस्सा पाहिजे नाहीं का ? घ्या म्हणावं देतें हिस्सा. [ बोघलेबुवा आंत येतोसा पाहून गंडकी पाय पसरून बसते व ओकसाबोकशी रडूं लागते. ]

गंडकीः—अहो बोघलेबुवा, अहो बोघलेबुवा, धावाहो धावा ! चंद्रभागेवर जा आणि आमचे घरधनी स्नानाला गेले असतील तर त्यांना हाकामारून घेऊन या लवकर, जाहो जा.

बोध०:—[ आश्चर्यानें ] आं ? गंडकीबाई काय झालं असं इतक्यांत?

गंडकीः—[ रडत ] काय सांगू ? माझ्यानं सांगवतसुद्धां नाहीं हो. बोघलेबुवा घात झाला हो घात झाला !

बोध०:—होय. पण झालं काय ? तुमच्या मुलग्याला कांहीं बरंवाईट झालं कीं काय ?

गंडकीः—[ रडत ] तसं झालं असतं तरी पुरवतं हो. ती पांडुरंगाची कृपा समजून गप्प बसलें असतें हो. पण हा घात त्याहून मोठा आहे हो. धांवा लौकर हाका मारून आणा त्यांना.

बोध०:—होय. पण दगडूबुवांना मी घाबऱ्या घाबऱ्या बोलवायला गेलों म्हणजे ते मला विचारतील त्यांना सांगायला पाहिजे ना कांहीं तरी ? म्हणून सांगा म्हणतों काय घात झाला तो.

गंडकीः—[ रडत ] असं का ? मग सांगा त्यांना म्हणावं लवकर घरीं चला. आपल्या घरीं म्हणावं रात्रीं चोरी झाली. सगळे दागिनें आणि रोकडबीकड जी काय जमलेली ठेविली होती ती म्हणावं चोरट्यांनीं नेली ! जळलं मेल्याचं तोंड ते. आमच्याच घरावर दरोडा घालायला गांवात श्रीमंतांची घरं काय थोडीं गेलीं होतीं ? पण दुसऱ्याच्या घरांवर जायची बुद्धी त्याना कशानं होणार आमच्या मागं दैव हात धुवून लागलं आहे तोंपर्यंत ?

बोध०:—पण गंडकीबाई, भिंत बिंत कुठं पडलेली दिसत नाहीं ती.

गंडकीः—[ रडत ] नाहीं हो, बोघलेबुवा हीच तर त्यांची शहामत.

बोध०:—कुठं दार बीर मोडलेलं किंवा कुलूप बिलूप तुटलेलं दिसत नाहीं तें ?

गंडकी:—[ रडत ] नाहीं हो बोधलेबुवा, हीच तर चोराची शहामत म्हणतें ना ? भिंत न फोडतां दार न मोडतां कुलुप न तोडतां दागिने आणि पैसे मात्र सगले पळवून नेले. मोठे अट्टल चोर खरे बोधलेबुवा. धांवा हो धांवा नदीवर आणि त्यांना म्हणावं जळली तुमची ती स्नानसंध्या राहूं द्या. घरीं परत या लौकर. माझं एखादं पोर अपघातानं गमावलं असतं तरीही मीं नसतें आलें तुमच्या स्नानसंध्येच्या आड ! पण पांडुरंगानं दिलेल्या प्रसादाचे पैसे आणि दागिने गेले म्हणून मेलं राहवत नाहीं.

पद १२

जळेना माझें जीवित हें हतभागी ।
दैवा न सहत इतुका थोडा द्रव्यलाभ मजलागीं ॥ ध्रु० ॥
जरि मम गेला आजवरी । जन्म दरिद्री सदा ॥
कधिं खंत न मनिं केली । सोशिल्या बहुत आपदा ॥
अजि परमेशानें फेंकितां लव कृपादृष्टी ॥
घर भरलें द्रव्यानें परि दैव होत कष्टी ॥ जळेना ॥ १ ॥

प्रत्यक्ष देवाचा कीं हो प्रसाद ! वारकरी लोकांनीं इतक्या प्रेमानं दागिने आणि पैसे देवाला दिले, ते देवानं प्रसाद म्हणून आमच्या पेटींत टाकले, ते न घ्यावे तर त्याचा अपमान नाहीं कां होणार ? म्हणून बाई मी कबुली दिली आणि जपून ठेवले हो; पण चोरांनीच कां उठू नये आमच्यावर ? काय बाई कसब तरी त्यांचं ? भिंत फोडली नाहीं, दार मोडलं नाहीं, कुलुप तोडलं नाहीं, असं असून मेल्यांनीं दागिने आणि पैसे लांबविले. बाकी इकडची काडी इकडे केली नाहीं. पण देवाचा प्रसाद तेवढा मात्र माहितगार माणसासारखा चोरून नेला. बोधलेबुवा धांवाहो धांवा.

बोध०:—खरंच ही चोरी चांगल्या माहितगार माणसाकडूनच झाली असावी असं मलाही वाटतं;

गंडकी:—[ रडत ] होय ना बोधलेबुवा, तुम्हांलाही असंच वाटतं ना माझ्यासारखं? पहावरं कोण दुष्ट लोक हे; आमचं पुण्यसुद्धां यांना पाहवत नाहीं. आमच्या पुण्यावरच या चोरांनीं घाला घातला म्हणायचा.

बोध०:—गंडकीबाई पुण्यावरच दरोडा यायचा कोणाचाही! पापावर दरोडा कुणी थोडाच घालणार? पण मी सांगतों कीं, तुमचं पुण्य कांहीं अजून गेल नाहीं कुणाच्या हातीं; नीट जतन करून ठेवा आं! मी जातो दगडूबुवाला बोलवायला. आणि त्यांची माझी जर चुकामूक पडली तर त्याना सांगा म्हणावं बोधलेबुवा भुलाजीराव पाटलाकडे गेले आहेत.

गंडकी:—[ मनांत ] हा पाटलाकडे कशाला बरं जातो? [ उघड ] पाटलाकडं कां जाणार तुम्हीं? ते कां?

बोध०:—अहो कां म्हणजे काय? झाल्याप्रकाराची वर्दी त्यांना लौकर दिलीच पाहिजे. ते पाटील आहेत शिवाय पंच आहेत. कराच्या ऐवजाची चोरी झाली या कामांत त्यांना लक्ष घातलंच पाहिजे. तुम्हीं घर नीट सांभाळा बरं मी जातो.

गंडकी:—[ रडत ] चोरी होऊन होतं नव्हतं ते गेलं. आता संभाळायचं ते काय घर?

बोध०:—अहो चोरी तर झालीच. कुणाची तरी कुणीं तरी चोरी ही केलीच. पण आपलं अजूनही घरांत काय आहे काय नाहीं तें संभाळा दुसरं काय!

गंडकी:—बरं तर क्षणभर थांबा तुम्हीं मी परसाची दारं बिरं नीट लागलेली आहेत कीं नाहींत पाहून येतेच. [ जाते. ]

बोध०:—दगडूबुवांनी असा डाव केला काय माझ्यावर? चोरी झाली असं नुसत एका शब्दानं म्हटलं म्हणजे दुसरं तिसरं कांहीं बोलायला नको आणि चालायला नको. कराची वाटणी होय नाहीं म्हणण्याचं कारण नाहीं उरलं! आणि याची बायको तरी किती कांगावखोर पहा! काय सटवीनं बतावणी केली पण! भिंत फोडली नाहीं कुलूप तोडलं नाहीं, इकडची काडी इकडे झाली नाहीं. आणि असं असून म्हणे चोरी झाली. आणि काय म्हणे चोराची शहामत! यांत शहामत कसली!

घरच्या चोराला भिंत फोडायला कशाला हवी ? आणि दार मोडायचंच काय पण दाराची कडी तरी काढायचं काय कारण ? आणि ज्याच्या कमरेलाच किल्ली त्याला कुलूप तोडायच तरी काय कारण ? [ इकडे तिकडे फिरून ] ही पहा या विठोबाच्या मूर्तीच्या पायाजवळची जमीन उरकल्या-सारखी दिसते आहे. शंकाच नको. मी नदीवरून स्नान करून येण्याच्या अवधींत यांनी सगळं डबोलं इथं पुरून ठेवलं वाटतं ! बरं जातें कुठे ? [ दाराकडे पाहून ] अरे ही गंडकीबाई आलीच वाटत. चला आतां आपण पाटलाकडे जाऊन ही कांगावखोराची मात यांची यांच्यावर कशी परतवायची याचा दोघे मिळून विचार करावा. या दगडूबुवाकडं जाऊन काय करायचं ? त्याला चोरीची बातमी सांगितल्याबरोबर तोही गंडकीसारखा नाटकच करणार की नाही ? बरं तर मीही नाटकच करून दाखवितो यांना ? [ जातो. ]

**गंडकी:**— [ परत येऊन ] बोधलेबुवा गेला वाटतं एकदाचा ? पाटलाकडं जाऊन हा काय करणार ? आपला हिस्सा गेला अस समजून हा रडणार तसा पाटीलही रडेल झालं ! येऊन जाऊन काय कायती आजची रात्र मधे. ती उजाडायच्या आंत हें सारं डबोलं घेऊन मी पोंहोचलेच माहेरीं ! मग त्यातला पैसा तरी दिसेल कां या बोधल्याच्या किंवा पाटलाच्या डोळ्याला ? आतां हे नदीवरनं स्नान करून आले म्हणजे त्याना लागलीच पाठविते पाटलाकडं. बोधलेबुवाच्या आधींच हे पाटलाकडं गेले तर बरे. निदान त्यांच्या मागोमाग तरी जाऊं देत.

पद १३

खलवंचन करण्या मति ही दिधली
परमेश्वरे । सुचलें बरें ॥ धृ० ॥
लोभ ठेऊनी द्रव्यावरि मम । अंतरदृष्टी बसला
बकसम । अधम तया वाराया समजा ॥
कपटपटुता । हीच उचिता ॥ सुचले बरें ॥ १ ॥

[ जाते. ]

## प्रवेश चवथा.

स्थळ—पंढरपूर.

[ चंद्रभागा नदीकांठच्या वनांत तंबू मारलेले आहेत. राजा कृष्णदेवराय उच्चासनावर बसला आहे. जवळ आपय्या व तेनालीराम उभे आहेत. समोर ठाणेदार, भुलाजीराव पाटील आणि दगडुबुवा हात जोडून उभे आहेत. ]

आपय्याः—ही ठाणेदार. मंगळवेढ्याची ठाणेदार. पंढरपूर मंगळवेढ्याखालीं येतो म्हणून हे पंढरपूरचीही ठाणेदार आहेत.

ठाणे०:—[ मुजरा करून ] महाराजांची स्वारी दौलताबादेहून अनागुंदीला परत जातांना पंढरपुराहून जाणार असं कळलं तेंव्हा सेवकाला फार आनंद झाला. व्यवस्था ठेवायची आज्ञा राजधानीहून आलीच होती. पण अशा कामीं आज्ञेचं तरी काय कारण ? आजवर लौकीक ऐकत होतो, आज प्रत्यक्ष दर्शनच घडलं. [ पाटलाकडे बोट दाखवून ] हे भुलाजीराव राजे पाटील देशमूख इनामदार.

कृष्ण०:—अस्सं हे पंढरपूरचे पाटील !

भुला०:—जी महाराज ! कशाचा पाटील आणि कशाचा काय ? आपल्या पंचवीस पिढ्या या पंढरपुरांत राहून चंद्राभगेचं स्नान करून पांडुरंगाचं दर्शन घेऊन काय हातून होईल ती गांवची चाकरी करतो बरी वाईट !

कृष्ण०:—काय आपय्या दीक्षित, पंढरपूर हें गांव पंचवीस पिढ्या इतकं जुनं असेल ? पंचवीस पिढ्या म्हणजे सात साडेसातशें वर्षे झाली ! चंद्रभागा नदी याहूनही जुनी यांत शंका नाहीं. पण गांव इतका जुना असेल ? नसेल !

भुलाजी०—जी सरकार लई लई जुना आहे हा गांव ! अयोध्येच राम वनवासाला गेल न्हाई ? तवा चंद्रभागेवर त्यांचा एक मुक्काम पडला व्हता असं सांगत्यांत. आणि पांडवानीं यज्ञाचा घोडा सोडला व्हता त्यो

माझ्या एका घराण्यातल्या पाटलानं या आमराईतल्या त्या झाडाला बांधला होता म्हणतात !

कृष्ण०:—[ मनांत ] घ्या. तीन युगापर्यंत तर मजल गेली ! [उघड] असेल पाटील. तसंही कां नसेल ? कारण तुमच्या इतकी जुनीं घराणीं आतां पाहायला मिळतात कुठं ?

आपग्या:—नदी होता तवा नदीच्या कांठीं एखादी गांवही असलच. त्याची नांव पंढरपूर असेल न्हाईतर नसेल इतकाच झाली !

कृष्ण०:—बरं हे दुसरे गृहस्थ कोण ?

ठाणे०:—हेच ते दगडूबुवा बडवे ! ज्यांच्याकडे श्रीपांडुरंगाची पूजा असते ते हेच !

कृष्ण०:—वाहवा धन्य आहेत ! पुण्यवान आहेत ! बडवे महाराज आपली वस्ती किती दिवसाची आहे या पंढरपुरांत ?

दग०:—फार जुनी आहे महाराज. मला वाटतं दोन तीन हजार पिढ्या झाल्या असतील आमच्या या पंढरीत !

कृष्ण०:—[ थट्टेनें हंसून ] म्हणजे जवळ जवळ ब्रह्मदेवानं सृष्टी उत्पन्न केल्यानंतर दहा पांच वर्षे किंवा त्याच्या आधीं दहा पांच वर्षे.

दग०:—हां असंच म्हणायला कांहीं हरकत नाही !

ठाणे०:—[ मनांत ] काय गाढव आहे हा बडव्या. महाराजानीं थट्टा केली ती सुद्धां याला कळली नाहीं !

भुला०:—म्हंजी या बडव्याचं घराणं माझ्याहून ही आधीचं असं हा म्हणतो कीं काय ?

कृष्ण०:—असं होतं खरं पाटील ! पण सांगताना तुम्हींच यांच्या पेक्षां दहा पांच पिढ्या अधिक सांगितल्या असत्या म्हणजे काम झालं होतं.

दग०:—होय महाराज पाटलाच्या आधींचं माझं घराणं आहे !

कृष्ण०:—आणि या पांडुरंगाच्या मूर्तीचा काय इतिहास आहे ?

दग०:—या मूर्ती आमच्या घराण्यांतल्या पाहिल्या पुरुषाबरोबर जन्माला आल्या ! शंकरानी आपल्या आंगाच्या मळापासून त्या तयार केल्या. त्या आपण केल्या असं दाखवायला श्रीशंकरानी मूर्तीच्या डोक्यावर

लिंगाचं चिन्ह केलं आणि त्या ब्रह्मदेवाच्या हातीं दिल्या. ब्रह्मदेवांनी त्या श्रीविष्णूच्या हातीं दिल्या. श्रीविष्णूंनीं त्या भूलोकावर पाठविण्याकरिता नारदमुनींच्या हाती दिल्या. त्यानी त्या आणून माझा पाहिला पूर्वज धोंडुबुवा वडवे याच्या हातीं नेमक्या दिल्या. आणि त्यांची स्थापना माझ्याच देवघरांत झाली महाराज.

तेना०:—(हंसून) या पुजाऱ्याची आद्य पूर्वज धोंडुबुवा आणि आजची त्याची वंशज दगडूबुवा ! शाबास, धोंड्या दगडांची हे पिढीजाद घराणं पृथ्वीच्या उत्पत्तीपासूनच आहे असं दगडूबुवा म्हणाली ते कांहीं खोटं नसल !

आपय्या:—महाराजांनीं मूर्तीं समक्ष पाहाव्या, आणि मग त्यांच्या डोक्यावर शिवलिंग आहे कीं नाहीं हे ठरवावं. हे लोक विठ्ठलाला शैव म्हणते तो आगदी खोटी गोष्ट महाराज. विठ्ठलमूर्ती मूळची वैष्णव आहे, कानडी आहे. ती शैव न्हाई महाराज, हे पुजारी खोटं बोलतो महाराज.

कृष्ण०:—असो. तो वाद राहूं दे तूर्त. जा ठाणेदार, पाटील, पुजारीबुवा जा आतां तुम्हीं घरोघर. आमची सर्व व्यवस्था उत्तम आहे. कांहीं एक न्यून नाहीं.

दग०:—मग महाराज दर्शनाला कधीं येणार पांडुरंगाच्या ? म्हणजे त्याप्रमाणं तयारी ठेविते.

कृष्ण०:—त्यांत तयारी कसली ठेवायची ? मी केव्हाही येऊन दर्शन घेऊन जाईन.

तेना०:—[ स्वगत ] पुजाऱ्याला दर्शनाचा तयारी ठेवायचा म्हणजे हात पसरून बसायचा. तो तयारी याचा नेहमीं ठेवलेलाच आहे, त्यांत नवीन तो काय करायचा ?

कृष्ण०:—बरं तुमच्या गावांत कथा कीर्तन पुराण वगैरे कोण कोण करतं ? एखादं चांगलसं कीर्तन पुराण होत असेल तर मला ऐकायचं आहे.

ठाणे०:—नेहमीचा गांवांतला असा चांगला म्हणण्यासारखा कोणी पुराणिक हरिदास नाहीं. मात्र हल्ली यात्रेला आलेल्या यात्रेकरूंपैकीं

भानुदास पैठणकर म्हणून एक हरिदास चांगला आहे. त्याचं कीर्तन ऐकण्यासारखं असतं. एरवी दिंड्यांची भजनही चांगलीं पाहण्यासारखीं होतात !

कृष्ण०:—ठीक आहे, जा तुम्हीं पंढरपूरकर मंडळी. मी तुम्हांला पुन्हा बोलावणं पाठवीन तेव्हां या ! [ ठाणेदार, पाटील दगडूबुवा मुजरा करून जातात ] कां आपय्या दीक्षित ! बोला काय म्हणणं आहे तुमचं ?

आपय्याः—माझा काय म्हणणं असायचा ? विठलाच्या मूर्ती कानडी आहेत आपल्या मुलुखांतल्या त्या महाराजांनी परत न्याव्या ?

कृष्ण०:—हें आपण म्हणून काय उपयोग ? ते सिद्ध हाण्यासारखा पुरावा पाहिजे. बळजबरी करून मी मूर्ती नेण्याचं मनांत आणलं तर ते मला सहज करतां येईल; पण तसं करण्याची माझी इच्छा नाहीं. आम्हीं राजे लोक अधिकार असतां नसतां दुसरे देश जिंकून त्यांतली मनुष्य प्रजा आमच्या दास्यांत आणतो तें एक असो. पण देवाच्या मूर्ती उचलून नेण्यापर्यंत आमच्या जुलुमाची मजल जाऊं देणं बरोबर नाहीं.

पद १४

विजय वसे जरिं मम करिं, बहु आंकित सेना ॥
तरि 'नृपाळ' भूषा ही उचित खचित अभिधाना ॥
हरिपदनत साधु संत, कां त्याते पीडावें ॥
दाक्षिण पथ सुलभ सुगम तरि कां जावें डावें ॥ १ ॥

आतां, मूर्ती मला खुषीनं अगर संतोषानं मिळाल्या तर त्या मी घेईन; आणि त्याकरतां लागेल तितका पैसाही वाटेल तर खर्च करीन. हें पंढरपूर पूर्वी आमच्या कानडी यादव राजाच्या अमलाखालीं होतं. पुढं ते मराठी राजाच्या अमलाखालीं गेलं, म्हणून पंढरपूर वाटेल तर जिंकून आपल्या राज्याला जोडायला मी तयार होईन. भाऊबंदकीचं भांडण, त्याला राजकारणाची जोड देऊन, इतक्या पल्यापर्यंत न्यायला मी तयार आहे. पण धार्मिक बाबतींत अत्याचार करायला मी तयार नाहीं.

आपय्या:—पण महाराज, हे लोक मूर्ती आपल्या इच्छेनं आपल्या संतोषानं दिले तर महाराज विकत घेतील नां ?

कृष्ण०:—हो, कां नाही घेणार ? काय मागतील तितके पैसे देईन. मागतील तेवढं इनाम अगर जाहागीर देईन.

आपय्या:—आणि हे मूर्ती कानडी मुलखांतन आणले असा त्यानी कबुली दिली तर मग ?

कृष्ण०:—मग काय ? मग मला त्या मूर्ती घेऊन जाण्याला हक्कच उत्पन्न होईल. आतां हक्क असला तरि पुष्कळ दिवसांचा त्यांचा भोगवटा आहे. एकदम त्यांच्या हातून त्या न्यायच्या तर त्यानां वाईट वाटेल, नुकसानीही होईल. याकरतां त्याना पैसे देऊन खूष करीन हें निराळं पण मूर्ती नेण्याचा आग्रह मला धरतां येईल आणि तो मीं धरीनही. ठीक आहे जा तुम्ही आतां [ आपय्या व तेनाली जातात ] या मूर्ती न्याव्या असं माझ्या मनांत येतं. पण पंढरपूरसारख्या क्षेत्रांत येऊन मीं उन्मत्त-पणा केला असा दुर्लौकीक होईल, याचं मला फार भय वाटतं. असो या मूर्तींच आधीं दर्शन तरी घ्यावं आणि या क्षेत्रांत जमलेल्या साधुसंताचं चरित्र तरी डोळेभरून पहावं. मग परमेश्वर बुद्धी देईल त्याप्रमाणें करतां येईल.

पद १५

पंढरि ही पुण्यखनी ॥
विठ्ठलपदिं भीमा नदि जणु स्वर्धुनि ॥ ध्रु० ॥
पुंडलीक । पुण्यवंत । ब्रह्मलोक । भुविं आणित ॥
जग वानित ॥ पंढरि ही ॥ १ ॥

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश पांचवा.

स्थळः—पंढरपुराजवळ एक कोसावरचा ओढा.

[ पाटील व बोधलेबुवा भयंकर वेष
घेऊन प्रवेश करितात. ]

बोध०:—पाटील हाच कां तो ओढा तुम्ही सांगितला तो ?

पाटा०:—हाच तो ओढा ! यांतनच वारकरी गांवाला जाण्याची वाट आहे. काल दगडुबुवाचा आणि त्याच्या बायकोचा जो बेत झालेला आपण ऐकला त्यावरून ते याच सुमाराला इकडे येतील असं वाटतं. तोंवर आपण झाडाशीं बसूं या !

बोध०:—काय पण हीं नवराबायको वस्ताद ! पण म्हणावं आम्ही तुमच्या बारशाला जेवलो आहांत गुलामांनो ! पाटील तुम्हाला चाहूल नाहीं ऐकूं आली ?

पाटी०:—[ कानोसा घेऊन ] होयहो बोधलेबुवा. चला चला आपल्या जागेवर. एकमेकानी काय काय म्हणायचं ते आहेनां लक्षांत ?

बोध०:—वः काय बोलायचं ते तुम्हाला मी सांगितलं. आणि माझ्या ध्यानांत आहे कां असं मलाच विचारतां उलट ? पण पाटील नुसतं ठरल्यासारखं बोलून भागायचं नाही. आवाज काढला पाहिजे बरं बेमालूम बदलून ! मी आहे विष्णूदूत, माझा आवाज गोड साफ हलका असला तरी चालेल. पण तुम्ही अहात यमदूत. तुमचा आवाज पाहिजे मोठा कर्कश आणि मधून मधून किंचाळल्या सारखा ! वेळ असती तर तुमच्याकडून यमदूतासारखं बोलवून घेतलं असतं. पण हीं नवराबायको आलींच पहा.

पाटी०:—अहो, म्हणवून घ्यायला कशाला पाहिजे ? यमदूतानं ओरडून बोललं आणि दटावलं कीं निम काम झालं. ते मी पाहिल्या तडाक्याला करतो. म्हणजे मग मी काय बोलतो आणि काय नाहीं हें ऐकायला

ती भेंकड नवराबायको शुद्धीवर राहातात कशाला ? [ दगडूबुवा आणि गंडकी येतात. ]

**दग०:**—या ओढ्या पलिकडें पोचवलं म्हणजे मग नकोना मला तुझ्या बरोबर यायला ? कारण मला उजाडायच्या आंत पंढरपूरला आपल्या घरीं पोहोचलं पाहिजे. मी आणि तूं दोघंही घरीं नाहीं असं समजलं म्हणजे संशय यायचा एखादा.

**गंडकी:**—जा की. या ओढ्या पलीकडं आपण पोहोचलो म्हणजे तुम्ही खुशाल परत जा. इथपर्यंत सुद्धां मला कांहीं सोबतीचं कारण नव्हतं. वाट काय रोजचीच पाया खालची आहे ! पण म्हटलं अंधारी वेळ आणि शिवाय [ हलका आवाज काढून ] जड जोखीम बरोबर. बरं परत गेलां आणि मी घरीं नाहीं असं पाहून कुठं गेली असं कुणीं विचारलं तर काय सांगाल ?

**दग:**—सांगेन की तिच्या माहेरघरीं अवचित लग्न निघालं म्हणून गेली रातोरात.

**गंडकी:**—इश्श ! भलतंच कांहीं तरी ? आषाढी एकादशीच्या पुढं लग्नाचे मुहूर्त असतात कां कधीं ? खोटं सांगायचं सांगून आपलं हसं मात्र करून घ्याल झालं.

**दग०:**—मग तूंच सांग बर काय थाप देऊं ती ?

**गंडकी:**—मी सांगते. असं सांगा, म्हणावं विठोबारखमाईच्या मूर्तीचीं वस्त्रं शिवायला दिलीं होतीं तिच्या गांवच्या शिंप्याकडं तीं आणायला गेली.

**दग०:**—हें नाहीं कुणाला खरं वाटणार ! आपल्या देवघरच्या मूर्तीकरतां तूं आणि मी इतकी काळजी घेणार ? मूर्तींना तू व मी कधीं हातसुद्धां लावीत नाहीं हें साऱ्या गांवाला ठाऊक आहे. आणि तूं तर मूर्तीवरचा केर लांबून केरसुणीनं काढतीस. पण जाऊं दे मला काय सुचेल तें आणि तुला काय शोभेल तें सांगेन झालं.( हंसून ) सांगेन की घरीं भाजणीचं

खमंग थालिपठि केलं असा आईनं निरोप पाठविला म्हणून ही रातोरात गेली. तें मात्र लोकांना खरं वाटेल ! बरं हा ओढा आला. दागिन्यांचं गाठोडं नीट खांकेत ठेवलं आहेस ना घट्ट ? नाहींतर दगडावरून पाय घसरून ठोकर खाल्ल्याबरोबर केव्हांच पडून जाईल आणि तुला कळायचं सुद्धां नाहीं. म्हणून सांगतों.

**गंडकी:**—असं पडायला मी तें मोकळंच ठेवलं आहे जसं कांहीं ! जिवाची वस्तू म्हणून अगदीं जखडून बांधून ठेविली आहे काळजाशीं.

**दग०:**—ठीक. बरं ओढ्यापलीकडे गेलीस म्हणजे तोंडानं पुटपुटत जा कांहीं तरी वारकऱ्यासारखी. अग हो चुकलं. पण ए तूं एखादी पताक आणली असतीस बरोबर तर बरं झालं असतं. वारकऱ्याची खूणच्या खूण आणि एखादं कुत्र वित्र आलं आंगावर तर त्याला मारायला बरी उपयोगी पडती.

**गंडकी:**—काल मी पाहात होतें एखाद्या वारकऱ्याची पताका चोरायला सांपडते कां ती ? पण मेले वारकरी तरी काय ? आमच्या इथं देवदर्शनाला येतात, पण जोड्याचीं फाटकीं लक्तरं आणि लंगोटीएवढं फडकं बांधलेलं दांडकं यानां कसं अगदीं जपत असतात जिवापलिकडं.

**दग०:**—बरं पताक नसेना कां ? तोंडानं हरिपाठ नाहींतर नामदेवाचा एखादा अभंग म्हणत जा निदान !

**गंडकी:**—तर तर, जन्मांत तरी आला आहे का तोंडातनं हरिपाठ. माझ्याच काय पण तुमच्या तरी ? अभंग पुष्कळ कानावरन गेले, पण लक्षांत राहील तर शपथ ! हदग्याचीं गाणीं मात्र मला पाठ येतात हवीं तितकीं. खरंच लहानपणीं माणसाची बुद्धी कशी असते पण तरतरीत. पण आपणाला तरी येतो का एखादा अभंग पाठ ?

**दग०:**—हो येतो म्हणजे ? हा बघ. ' पुण्यमार्ग करा कांहीं हातोहात । ना तरि यमदूत पाठी उभा ॥ '

**पाटी०:**—[ पुढे होऊन ] अरे पाप्या चांडाळा, तूं यमदूताची आठवण काढलीस नव्हे का ? हा पहा मी यमदूत आलों आहे तुला न्यायला.




दगडुबुवा०—ना तरि यमदूत पाठी उभा.

[ पृ० ४८

जन्मभर पातकं केलींस, ईश्वरभजन केलं नाहींस, आणि यात्रेकरूं कडनं कर घेऊन त्यांचा छळ केलास ! चल यमाजी भास्कराच्या दरबारीं [ दग-डूबुवाच्या मानगुटीस धरतो ]

दग०:—[ घाबऱ्या घाबऱ्या ] अगाई ग मेलों !

गंडकीः—[ घाबरून ] कोण तें ?

पाटी०:—[ ओरडून ] सांगतों कोण तें ! तुझा नवरा एक पापी तर तूं सात पापी. काखेंत डबोलं कसलं घेऊन चालली आहेस ?

गंडकीः—कांहीं नाहीं हो चोर दादा. मी आईच्या घरीं जातें आहें. घरीं भाजणीच्या पिठाचं खमंग थालीपीट केलं म्हणून आईनं निरोप पाठविला होता म्हणून चाललें होतें.

पाटी०:—या यमदूताला चोर म्हणतीस काय ? आणि खोटं बोल-तीस ? वारकऱ्यांना देवदर्शन करवायला त्यांच्या कडनं कर घेतला ते पैसे आणि भानुदासानं दिलेले दागिने घेऊन पंचांना फसवून माहेरी चाललीस काय ? थांब तुला आणि तुझ्या नवऱ्याला उचलून घेऊन एकदम यमलो-काला नेतों.

गंडकीः—नाही हो मजजवळ कांहीं नाहीं. होतं नव्हतं तें सगळ पंढरपूरच्या त्या मेल्या पाटलानं आणि त्या बोधलेबुवानं घेतलं हो. आम्हाला नाडून घेतलं. सोडा आम्हाला आणि कर घेतल्याबद्दल यमलोकाला न्यायचं तर त्यानांच न्या !

पाटी०:—अस्सं काय ? प्रत्यक्ष यमदूताच्या तोंडावर खोटं बोलतीस काय ? थांब तर तुला आणि तुझ्या नवऱ्याला इथल्याइथंच भयंकर चाप लावतों. यमलोकाला नेण्याची सुद्धां वाट पाहात नाहीं.

दग०:—नको ग नको. नको ते चाप नकोत ! ऐकलस कां ? काय असेल नसेल तुझ्या जवळ तें त्यांना देऊन टाक कशी. पण आप-ल्याला छळ नाहीं सोसवणार !

गंडकीः—[ रडत ] घ्या तर मग हें गांटोडं आणि सोडा आम्हाला ! [ गाठोडं पाटलाच्या हातीं देते ]

**पाटी०:**—पहा आतां कशी आली वटणीवर ! पण गाठोडं देऊन सुद्धां यमलोक सुटणार नाहीं. गाठोड दिल्याबद्दल शिक्षा थोडी कमी होईल; पण खोटं बोलल्याच्या पापाकरतां तुम्हांला दोघांनाही यमलोकाला आलंच पाहिजे. चला यमलोकाला.

[ आंगावर ओरडतो ]

**बोध०:**—[ पुढें येऊन ] हां तूं यमदूत असलास तर मी विष्णुदूत आहें. या नवराबायकोनीं वारकऱ्यांपासून कराचे पैसे घेतल्याचं पाप केलं होतं; पण तें पाप त्यांनीं तुझ्या स्वाधीन केलं आहे. आतां त्यांना मी यमलोकाला नेऊं देणार नाहीं. श्रीपांडुरंगाच्या मूर्ती त्यांच्या घरीं आहेत. त्या मूर्तींची जरी त्यांनी कधीं पूजा केली नाहीं तरी मूर्ती घरीं राहिल्यानंच त्यांना पुष्कळ पुण्य लागलं आहे. तीं विष्णुलोकची प्रजा आहे, मीं त्याना यमलोकाला नेऊं देणार नाहीं.

**पाटी०:**—घरीं मूर्ती राहिल्यानं जर त्यांना विष्णुलोक मिळणार, तर पंढरपुरांत मूर्ती असल्यामुळें पंढरपूरचे सर्व लोक विष्णुलोकाला गेलेच पाहिजेत. इतके सगळे लोक सांठवायला आहे कां तुझ्या विष्णुलोकांत जागा ?

**बोध०:**—हो. हो. आहे म्हणजे ? आणखी जास्त किती बोलतोस ? मी विष्णुदूत आहें. सांभाळून बोल, नाहीतर शापून जाळून भस्म करीन.

**पाटी०:**—कर. कर कसा भस्म करतोस तो !

**बोध०:**—पाहायचं असेल तर पहा. माझी तयारी आहे. दगडूबुवा गंडकीबाई जा मी या यमदूताला पाहून घेतों. जा तुम्हीं आपल्या घरीं. मात्र फिरून देवदर्शनांवर कर घेऊं नका संभाळा. कायरे ए यमदूता माजलास काय ?

[ भांडू लागतात ]

**दग०:** —[ हळूच ] ऐकलस कां ? चल. धांव माझा हात धरून. आयती आपली मोकळीक झाली या विष्णुदूताच्या कृपेनें. बसूं देत भांडत त्यांना ! [ दगडूबुवा व गंडकी जातात ]

बोध०:—[ टाळी देऊन हांसून ] पाटीलबुवा, गेलीं तीं दोघं पळून ! अतां आपलं भांडण पुरं करूं या. आणि तुमच्या हातांत काय काय पडलं तें पाहून घेऊं.

पाटी०:—खूप झाली या दगड्याची ! आम्हांला फसवीत होता नाहीं कां ? पण मला वाटतं इथं या आंधारांत हें गांठाडं सोडण्याच्या भानगडींत पडलों तर हातातनं जिन्नस खालीं पडतील आणि तुम्हाला नाहीं व मलाही नाहीं असं होईल. तर आतां दोघं मिळून गांवाकडे जाऊं, आणि सकाळीं दिवस उगवला म्हणजे घेऊं सगळं कांहीं वांटून.

बोध०:—हो. हाच विचार बरा दिसतो चला तर.

[ दोघेहि जातात ]

अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

स्थळः—विठ्ठलमंदिरासमोरचें पटांगण.

[ भानुदास व वारकरी येतात ]

भानु०:—चला गड्याहो आपण सर्व मंडळी विठ्ठलाच्या दर्शनाला जाऊं या.

१ ला. वार०:—आणि परवासारखं दगडूबुवांनी आणि पंचानी कर घेतल्याशिवाय सोडीत नाहीं म्हटलं तर ?

भानु०:—तर–आपण बाहेरच उभे राहून भजन करूं. आणि " आम्हांला तरी आंत घे नाहींतर तूं तरी बाहेर ये " असं म्हणून विठ्ठलाची प्रार्थना करूं !

२ रा वार०:—अशा भजनानं काय होणार ?

भानु०:—मग काय करावं असं तुमचं म्हणणं ?

३ रा वार०:—मीतर असा निश्चय केला आहे कीं, देवाच्या दारावर आज कर मागितला तर कर न देतां आंत घुसायचं. फार तर थोडीशी मारामारी करावी लागेल.

१ ला वार०:—आणि मारामारी केल्याबद्दल ठाणेदारानं कैद केलं तर ?

२ रा वार०:—तर तुरुंगांत राहावं लागेल ! पण या द्रव्यलोभी बडव्यांच्या जुलमाला आळा आतां घातलाच पाहिजे.

भानु०:—संतजनहो, असा अविचार करूं नका. मी आज दोन दिवस या कराचा विचार रात्रंदिवस करतो आहे. आणि काल रात्रीं मला श्रीविठ्ठलाचा दृष्टांतहि झाला.

१ ला वार०:—काय दृष्टांत झाला ? सांगा बरं आम्हांला. आम्हां वारकऱ्यांचा कैवारी काय बरं म्हणाला ?

भानु०:—ऐका,

पद १६

स्वप्निं घडला मजासि दिव्य सुखसोहळा ॥
केविं वर्णन करूं मोद तो आगळा ॥ धृ० ॥
रुक्मिणीचा कांत । मज दिसला नखशिखांत ॥
स्मित धरि मुखिं शांत । वैजयंती गळां ॥ १ ॥
म्हणत रखुमापती । न्या येथुनि संप्रती ॥
अधम गृहवास आंत । हो दुःखद अति मला ॥ २ ॥

पहाटेच्या प्रहरीं मी काकड आरतीच्या वेळीं भजनाला उठून बसण्याच्या सुमाराला श्रीरुक्मिणीपांडुरंग माझ्या समोर उभा राहिला [ वारकरी लोक नमस्कार करून श्रीपुंडलीक वरदे० असा गजर करतात ] आणि म्हणाला ' भानुदासा, मी या हल्लीच्या कैदेला कंटाळलो आहे. तूं मला बाहेर घेऊन जा ! आणि कोठेतरी सार्वजनीक अशा जागेंत माझी स्थापना कर म्हणजे वाटेल त्या वारकऱ्याला मला भेटतां येईल. '

१ ला वार०:—अहाहा ! आम्हां वारकरी मंडळीवर श्रीविठ्ठलाची कोण ही प्रीती !

२ रा वार०:—म्हणूनच मी म्हणतो कीं आज वाटेल ते झालं तरी आंत घुसूं आणि वाटलं तर मूर्ती बाहेर उचलून आणूं.

भानु०:—नाही. गडेहो आपण असं अनाधिकाराचं कृत्य करतां कामा नये ! श्रीविठ्ठलाची जर खरोखरींच हल्लीचं हे स्थान सोडण्याची इच्छा असेल तर तो बाहेर पडण्याची वेगळी युक्ती काढील ! आपणां वारकरी लोकांच ब्रीद सात्विकपणाचं आहे असं जें लोक आजवर मानीत आले आहेत तें खोटं करतां कामा नये. चला आपणाला दगडूबुवांनी आंत जाऊं दिलं नाहीं तर आपण घरा बाहेरच उभे राहूं. आणि तेथून श्रीविठ्ठलरुखमाईच्या मूर्तीचं दर्शन घेऊं.

**१ ला वार**:—आणि परवा सारखीं दगडूबुवानीं देवघराचीं कवाडं लावून घेतलीं तर ?

**२ रा वार**०:—हो. तेंही तो करील. कारण बाहेरच्या बाहेर दर्शन घडलं तर मग आंत जाण्याकरितां रिकामा कर कोण देईल ?

**भानु**०:—संतजनहो, तुमचं म्हणणं बरोबर आहे. कर घेण्याला लालचावलेला दगडूबुवा असंही करील. पण देवघराचीं कवाडं लावून घेतलेलीं असलीं तरी काय हरकत ? आपला भाव जर दृढ असेल तर कवाडं आपोआप उघडतील ! कवाडाकडं दृष्टी देऊन आपण नाम गजर चालू ठेवावा एवढंच आपलं काम. [ सर्व जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळः—पाटलाची चावडी.

[ पाटील व बोधलेबुवा बोलत बसले आहेत. ]

**बोध**०:—आतां येतील पहा तीं नवराबायको तुमच्या कडं फिर्याद घेऊन. तुमच्याकडे यायला सुचविलं मीच आणि पुढं इकडं निघून आलो.

**पाटी**०:—येऊं द्या तर खरे ! गंमत होईल जरा. पण कायहो बोधले बुवा, हें आपलं पंचाचं संस्थान मोडायचं कां चालू ठेवायचं ? तुम्हीं सांगाल तसं करूं. हे आपलं संस्थान म्हणजे गाजराची पुंगी आहे. वाजली तर वाजवीली नाहींतर खाऊन टाकली.

**बोध**०:—अहो वाजली नाहींतर असं कां म्हणता ? आधीं वाजाविली आणि मग खाल्ली असं म्हणा. ही पुंगी आपल्याला दोन्हीं रीतीनं चांगली उपयोगी पडली आहे असं नाहीका वाटत तुम्हांला ? पेटींत वारकऱ्यांच्या कराचे पैसे खणखण वाजतांना या गाजराच्या पुंगीतनं कसा पण सुरेख

गोड आवाज निघत होता म्हणून सांगू ? आतां तो ऐकायला तुम्ही नव्हता ती गोष्ट वेगळी. आणि कराचे हे सगळे पैसे व दागिने आतां तुमच्या माझ्या हातीं लागले तेव्हां ती पुंगी आपण खाऊन टाकली असं नाहीं कां झालं ? वेडा दगडूबुवा मात्र आमच्या गाजराच्या पुंगीच्या नादानं भुलून छान खड्यांत पडला.

पाटी०:—पण तो अजून पुरा खड्यांत पडायचाच आहे हें कुठं तुम्हाला माहीत आहे ?

बोध०:—तो कसा पडणार ?

पाटी०:—हें संस्थान मोडून टाकून.

बोध०:—पण आज संस्थान मोडून टाकलं तर फिरून कर वसूल करतां नाहींना यायचा ?

पाटी०:—अहो काय कर वसूल करून करतां ? भानुदासासारखा भोळा आणि पैसेवाला वारकरी सहज अटीला पडला म्हणून तर इतके पैसे मिळाले. पण हें असं नेहमी कसचं टिकतं ? नेहमी भानुदास थोडेच मिळणार लोकांकरता पैसे भरायला ? ठाणेदारानं तर हळूंच खुसपट काढलंही आहे. वारकऱ्यानां थापा देऊन गप्प बसवितां आलं; पण ठाणे-दाराला गप्प कसं बसविणार ? तो मला म्हणाला सुद्धां आपलं हळूंच कीं कोणाच्या हुकमानं कर बसविला म्हणून ?

बोध०:—ठाणेदाराला गप बसवायचं झालं तर सोन्याचं कुलूप करून घाला त्याच्या तोंडाला. तळहाताएवढ्या लोखंडी कुलपापेक्षां टिकली एवढं सोन्याचं कुलूप अधीक भक्कम असतं हें तुम्हांला माहीत नाहीं वाटतं ?

पाटी०:—पण ठाणेदाराच्या वरचेही आहेतनां विचारणारे ! त्यांची तोंडं इतकी उंच आहेत कीं त्यानां सोन्याचं कुलूप घालायला हातच पुरत नाही. अधिकाऱ्यांचं हे एक असो. पण उद्या वारकरीच बिथरले तर काय करा ? हो समजा, उद्यां हजार पांचशे वारकरी जुळला आणि घुसला आंत आमची पेटी लाथाडून तर ?

बोध०:—ती गोष्ट सांगु नका. असली हुल्लड वारकऱ्यांच्या हातून मुळींच व्हायची नाहीं. हजार वारकरी जमले तरी एक धारकरी पाहिल्याबरोबर पळून जाणार. हजार मेंढ्यांच्या कळपाला एक खवीस कुत्रं पुरे होतं.

पार्टी०:—तेही कबूल केलं. पण उद्यां वारकऱ्यांनीं कटच केला आणि घातला देवस्थानावर बहिष्कार तर ? पेटींत कांहीं एक पडायचं नाहीं, आणि तुम्हाला आणि दगडूबुवाला मुरदुंगासारखी पेटी दोहो आंगानी बडवीत करमणूक करीत बसावं लागेल. अहो, श्रीमंत वारकरी हट्टाला पेटला तर एक असो. बारा सालचा दुष्काळ आणि एक सालचा सुकाळ बरोबर होऊन जाईल; पण या घोंगड्या पताक्या वारकऱ्यांना तोंड फिरवून परत जाण्याशिवाय दुसरा इलाजच नाहीं. मी तुम्हांला सांगतो बोधलेबुवा, थोडी तितकी गोडी. एक वर्ष आपलं कराचं साधलं तेवढं बस झालं. या संस्थानचं आतां सत्व पाहण्यांत अर्थ नाहीं.

बोध०:—मग काय करावं म्हणतां ?

पार्टी०:—मी सांगू ? अनायासानं या पंढरपुरीं कानडा राजा आपल्या पायानं आला आहे. आणि त्याची इच्छा या विठोबाच्या मूर्ती इथून उचलून आपल्या राजधानीला न्याव्या अशी आहे. आपली गुणगुण ऐकली ती तुम्हांला सांगितली.

बोध०:—बरं मग ? तसं असलं तरी काय ?

पार्टी०:—द्या हे संस्थान मोडून या मूर्तीसकट राजाच्याच गळ्यांत घालून. राजा खूष होईल आणि पुष्कळसे पैसे देईल. एकदम आपला तळीराम गार करून टाकूं. उगाच दर वर्षी उठाठेव कोण करतो वारकऱ्यांना सतावून पैसे काढायची ?

बोध०:—मग दगडूबुवाचं आयतं बरंच झालं ? मूर्तीची किंमत त्यालाच मिळणार ?

पार्टी०:—त्याला मिळाली तरी शेवटीं ती आपलीच ! हे कराचे पैसे आणि भानुदासाचे दागिने नाही का आपल्या हातीं आले ? ते मिळवायला आपल्याला झोंप मोडून पहाटेच्या प्रहरीं ओढ्यावर तरी जावं लागलं.




गंडकी०—कंबर अझून नीटच होत नाहीं. [ पृ० ५७

या राजाकडून मिळणारे पैसे अगदी परस्पर आपल्या हाती येतील अशी मी व्यवस्था करतो. तुम्हीं नका त्याची काळजी करूं. मूर्तीच्या परी मूर्ती जाऊन वर जर का हात हालवीत रडत न बसविला या दगडूबुवाला तर नांवाचा पाटीलच नव्हे !

[ दगडूबुवा व गंडकी येतात ]

दग०:—( इवळत ) काय पाटील, सांगितली ना तुम्हांला या बोघलेबुवानी माझी हकीकत ? काय करावं ? भारी मार खाल्ला. अजून अंग दुखतय पहा.

गंड०:—मला कांहीं फारसा मार बसला नाहीं; पण भीतीनं माझी जी एकदां कंबर बसली ती अजूनही मला नीट उभं राहूं देत नाहीं. [ मटकन बसते ]

पाटी०:—अरेरे ! फार वाईट झालं ! वाखरीचा ओढा असाच घातक आहे. तिथं दर आठ चार दिशीं आपला दगा फटका असतोच. पण तुम्हीं कुठं इतक्या पहाटे तिकडे गेलांत ? तुम्हाला मार द्यायला इतकं लांब त्यांनाच नल कीं काय ?

बोध०:—होय. असेलही बुवा तसंच. घरांत मार हाण केली म्हणजे लोक आरडा ओरड करून धांवत यायचे म्हणून नेलं असेल ओढून ओढ्याकडं झालं ! खरंच वाखरीचा ओढा मोठा भयंकर खरा !

गंड०:—[ इवळत ] नाहीं हो. ओढून कोण नेतं ? आम्हीं आपल्या पायानींच गेलो.

पाटी०:—काय ? इतक्या पहाटे ओढ्यावर ? चंद्रभागेवर जायचं सोडून इतके लांब ओढ्याकडं कुठे गेलांत ?

दग०:—अहो ही जात होती आपल्या माहेरी. आणि तिला पोंचवायला मी जात होतो.

बोध०:—पण इतक्या पाहाटे उठून माहेरी कशाला या चालल्या होत्या ? दिवसां नसतं कां जातां आलं ?

दग०:—अहो कशाला अन काय ? इनं आपला हट्ट धरला अन मी तो पुरवला दुसरं काय ?

गंड०:--[ स्वगत ] हे खोद खोदूनसं विचारतात माहेरी जायचं कारण ? [ उघड ] अहो काय सांगू तुम्हांला ? लाज वाटते सांगायला पण सांगतेच.

पद १७

मज हसाल खुशाल हसा तरी ॥
तुम्हां न ठाउक ममत्व कैसे मुलीवरी ।
माय माझी जें करी ॥ धृ० ॥
खमंग झालें बघोनि धिरडें चुलीवरी ।
स्मरण माझें ती करी ॥ १ ॥
अशी न भेटे जगांत कोठेहि माउली ॥
कोड पुरवी परोपरी ॥ २ ॥

आईनं घरीं खमंगस थालिपिठ केलं होतं ते खायला बोलावलं म्हणून निघालें होतें जरा लवकरच.

बोध०:--हो बरोबरच आहे. उशीर झाला असता आणि थालीपीट वाळून गेलं असतं मग काय उपयोग ? पाटीलबुवा, हौसेची आणि मायेची गोष्ट सांगून का येते ? मी सांगतो, गंडकीबाईच्या आईनं थालीपीट खमंग झालेलं पाहताच तसंच ते बाजूला ठेऊन दिलं असेल. जास्ती एक तुकडाही तोडला नसेल मुलीच्या आठवणीनं. म्हणून या इतक्या पाहाटे निघाल्या दुसरं काय ?

दग०:—कसलं खमंग थालिपीट ? आपलं नशीब. ह्याच्या तोंडाला खमंग थालिपीठ लागायच्या आधी माझ्या पाठीचं मात्र खुसखुशीत धिरडं झालं हो ! [ पाठीवर हात चोळतो पाटील आणि बोधलेबुवा मोठमोठ्यानं हासतात ]

पाटी०:—[ गंभीरपणानं ] जाऊं द्या, दगडूबुवा जाऊ द्या, मी पाठवितो एसकर या वाटमाऱ्यांच्या तपासाला. पण काय हो, तीं खरोखरीची माणसं होती कीं, आपली भुतं बितं होती ?

बोध०:—होय बुवा. वाखरीचा ओढा घातक आहे खराच. चोरा-प्रमाणं तिथं भुतंही राहतात असं म्हणतात.

दग०:—मी काय सांगूं बुवा? एक म्हणाला मी विष्णुदूत आहे. आणि एक म्हणाला मी यमदूत आहे.

पाटी०:—छे: लुच्चे नाहींतर! यमाचे दूत आणि विष्णूचे दूत सगळ ब्रम्हांड सोडून इथं वाखरीच्या ओढ्यावर येत आहेत! मी सांगूं दगडू बुवा, त्या चोरट्यानींच हीं नावं घेतलीं असावीत; पण मी करतो त्यांची सगळी चौकशी.

बोध०:—दगडूबुवा, मार खावा लागला हें तर ठीकच आहे, पण पैसे बियसे जवळचे गेले नाहींत ना?

पाटी०:—हो तसं नसलं म्हणजे झालं. अहो माराचं काय? आंग आज ठणकलं तर उद्यां बरं होईल, पण पैसा गेला असला तर तो कसा मिळणार? मी पाटीलकी पंचवीस वर्षे केली; पण चोरीचा माल मालकाला कधीं मिळाला हे मी ऐकलंच नाहीं! पण तुमचे पैसे बियसे तर नाहि ना गेले?

दग०:—[ चाचपडत ] नाहीं—होय—नाहीं

पाटी०:—कराचे पैसे तर चोरीला गेले नाहींत हें मी खात्रीनं सांगतो.

पाटी०:—हो. ते तर पूर्वीच घरच्याघरीं चोरीला गेले होते. मी तर तें विसरलोच.

बोध०:—अहो कराचे झाले काय आणि घरचे काय? कसंही असलं तरी दगडूबुवाचा तोटाच झाला कीं नाहीं?

पाटी०:—हो तेंही खरंच. पण जाऊं दे. दगडूबुवा आता दुःख करून काय उपयोग? तुमचे पैसे गेले तरी ते आहेत तेथें सुखी आहेत. गेले ते आपले नव्हतेच असं समजावं म्हणजे झालं. आणि तसं समजलांत तरच श्रीपांडुरंग इकडचा वचपा इकडं काढून देत असतो. अरे पण हें इकडे कोण येत आहे? आपल्या दिक्षीत वाटतं? वः छान झालं. वेळेचा गूण नामी खरा. दगडूबुवा, तुम्हाला आताच नाही का म्हणाले

इकडचा वचपा देव इकडं काढून देतो म्हणून ? आपय्या दिक्षीत राजा-कडून आले ते कशाला आले आहे कां तुम्हाला माहीत ?

दग०:—कशाला ?

बोध०:—अहो कशाला काय ? राजे साहेबांची स्वारी देवदर्शनाला यायची आहे ना ? झालं तर. कसंही करा आणि मूर्तीची महापूजा बांधा-यची दगडूबुवाकडून तजवीज करा असं हे सांगायला आले आहेत. तुमचा सगळा तोटा मी एकदम भरून काढून देतों. गंडकी बाईना जाऊं द्या घरीं. त्याना कशाला तिष्टत बसवितां उगीच चावडींवर ? [ गंडकी जाते व आपय्या प्र. क. ]

पाटी०:—[ दगडूबुवाला हळूंच ] तुम्हीं आतां गप बसा आं ? मोठ-मोठ्या रकमांची मी नांव घेईन. त्यानं तोंडाला पाणी सुटून अल्प संतुष्टा-सारखे मधेंच ' पुरेत इतके पैसे ' असं म्हणाल. आमचं आपलं चालू द्या [ आपय्या दिक्षीतास ] या दिक्षीत या, हे पहा दगडूबुवा आलेच आहेत. विठ्ठलाच्या मूर्तीची महापूजा कशी बांधायची ते आपण याना विचारून ठरवूं. मी त्यानां मुद्दाम बोलवून आणलं आहे.

आपय्या:—वाहवा, आमच्या राजावरी मोठा उपकार झाले. महापुजेला ताटभर रुपये लागले तरी आमची महाराज देते. बोला आपली खुशी कसा आहे ती दगडूबुवा ! [ पाटील खूण करतो, सगळं काय ते बोधलेबुवाकडे सोपवा असं दगडुबुवा सांगतो ]

दग०:—मी काय बोलणार ? ते सर्व यानांच विचारा म्हणजे झालं.

आपय्या:—हे सांगू देत हवं तर. आम्हांला काय कुणीकडून एकच.

बोध०:—घ्या तर. काकडआरतीपासून घ्या. जो महापुजा बांध-विणार त्यानं काकडआरतीकरतां जडावाचे निदान सोन्याचे तरी काकडे करून द्यावे. दगडूबुवा त्यांत आपली पदरची तेलाची वात घालतील तेलाचे पैसे नाहीं मागणार !

आपय्या:—कबूल.

बोध०:—नंतर विठोबारखुमाईला तोंड धुवायला हिन्याच्या लवंगा लागतात. चूळ भरून टाकायला तस्त सोन्याचं नसून रुप्याचं असलं तरी चालेल.

पाटी०:—हो! आपल्या देवस्थानचा शिरस्ताच आहे तसा.

आपय्या:—[ मनांत ] काय लेकाचा शिरस्ता सांगती पहा, जसे कांही राजेलोक रोजच्या रोज पंढरपुरला येऊन देवाची महापूजा बांधतात. सोन्याजडावाचे कांकडे मागितल्याबद्दल यांच्या आंगाला पेटलेल्या तेलाचे काकडे लावावे असं मला वाटतं. पण करा काय?

बोध०:—विठोबाची नाडी पाहायला वैद्य जाईल त्याला द्या एक शे-पन्नास रुपये म्हणजे झालं.

आपय्या:—[ मनांत ] शेपन्नास रुपये देऊन वैद्य न्यायला विठो-बाची नाडी फारच ठणकत असली पाहिजे.

बोध०—झालं. देवाच्या स्नानाला रुप्याचं घंगाळ आणि सोन्याचा तांब्या हा काय सांगायला नकोच.

आपय्या:—[ मनांत ] राजा देणार झाल्यावर अघळ पघळ मागायला हो काय गेलं? एरवीं या दगडूबुवाच्या घरीं ठोक्याचा राजा-पुरी तांब्याही कां नसे ना?

बोध०:—देवाचं आंग पुसायला जरीकाठी वस्त्र आणि नेसायला दोघांना दोन जरीकांठीं पितांबर म्हणजे ते भागलं.

पाटी०:—हो. पण वस्त्र नेसवायच्या आधीं केशराची उटी सांगायची राहिलाच. उटीचा शिरस्ता सव्वाशेर केशराचा आहे.

आपय्या:—हो. तें देता येईल त्यांत कांहीं कठीण नाहीं.

बोध०:—आतां नैवेद्यापर्यंत मजल येऊन ठेपली. त्याचं काय? आपली नजर चालेल तसं. महाराजांनी सगळा गांव जेवायला घातला तरी हवाच आहे. पण तुम्हीं पाहुणे आपल्या घरून उठून आलेले, तेव्हां गावजेवणाचा शिधा नाहीं तर तितक्याचे पैसे द्या म्हणजे झालं. पंच-पक्वान्नाचा नैवेद्य वेळवर हजर राहील.

पाटी०:—[ मनांत ] बाकीचं वर्णन ऐकून दगडूबुवाच्या डोळ्यांत कांहीं तेज चमकलं नाहीं, पण ही नैवेद्याची गोष्ट ऐकून त्याच्या जिभेला पाणी सुटलं खास. महापुजेच्या बाकीच्या जिनसा त्याच्या हातीं मी थोडाच लागू देणार? पण नैवेद्याचं ताट मात्र त्याच्या हातनं काढून कुणालाही घेता यायचं नाहीं. कारण हा पडला ब्राम्हण. असो खा म्हणावं लेका पंचपक्वान्न एक दिवस मिळतील तीं.

बोध०:—झालं, आतां काय? संध्याकाळची धूपारती उरली. त्याला दहापांच सोन्याची निरांजनं आणि बुधली भरून अत्तराचं तेल झालं कीं ते संपल. दिव्यातून वाती सोन्याच्या घालायच्या असतात. पण त्याच्या बरोबर कापसाच्या वातीही थोड्या असूं द्या हो, कारण सोन्याच्या वाती पेटत नाहींत.

आपय्या:—[ मनांत ] वाती न पेटोत पण पुजाऱ्याचा लोभ पेटतो ना सोन्याच्या वाती पाहून!

बोध०:—धूपारतीच्या वेळीं खिपारत वाटावी लागते, त्याला एक गोणी नारळ आणि मणभर साखर पुष्कळ झाली. बरं, रात्री आमचा देव कांहीं खात नाहीं–

आपय्या:—आणि आमचा देव तरी रात्रीं कुठं खातो? आणि दिवसा तरी?

बोध०:—तेव्हां नुसतं एक मण अटीव दूध सांगा म्हणजे भागलं. आतां शेजारतीच्या वेळीं –

पाटी०:—[ बोधले बुवाच्या हळूंच कानांत कुजबुजतो ]

बोध०:— शेजारतीच्या वेळीं थोडं गाणं बिणं असावं असं आहे. आमच्या गांवच्या भुलाजी मोठ्या संभावीत आहेत. देवाच्या महापुजेंत त्यांचं एक गाणं होत असतंच, तेव्हां तेही करून टाकूं. म्हणजे सगळंच सांग सशास्त्र झालं.

आपय्या:—[ मनांत ] खरंच नायकीणीच्या गाण्याशिवाय महापूजा सांग होणार कशी? श्रीविष्णुजवळ नारदतुंबरुसारखे गाण्याला

असतातच. आतां वैराग्यशील ब्रह्मचाऱ्या ऐवजीं सगळ्या जगाची मैत्री करणाऱ्या विश्वयोषिता इतकाच फरक. असो.

बोध०:—आवरलंच माझं. देवांना निजण्याकरितां शिसवीच्या लांकडाचा रुप्याच्या फुल्या लावलेला एक पलंग द्या म्हणजे झालं. कारण–[ आपय्या आश्चर्यानं बघतो ] समजलो, समजलो, एका दिवसांत पलंग कसा तयार होणार असंच ना तुमचं म्हणणं ? ठीक आहे. पलंग न झाला तरी तितक्याचे पैसे द्या म्हणजे झालं.

दग०:—मी मधे कशाला बोलूं ? पण एक राहिलं.

आप०:—तें काय ?

दग०:—सगळी महापुजा झाली म्हणजे मला बडव्याला पोषाख द्यायचा असतो इतकच.

पाटी०:—अहो तें कशाला सांगायला पाहिजे ? राजेलोकांच्या घरची चालच तशी असते. उठल्या बसल्या पोषाखाची देणगी !

आप०:—तें खरं. महापूजा देवाला पोहोचली, तुम्हांला त्यांत काय ? तुम्हाला व तुमच्या बायकाला उत्कृष्ट पोषाख मिळेल ! मग तर झालं ? बरं आहे मी येतो आतां ? हे सगळं कबूल झालं. सामान कुणाकडे पोहोचतं करायचा ते सांगा म्हणजे झाली.

[ पाटील व बोधलेबुवा आपआपसांत खुणावातात दगडू-
बुवा त्यांच्याकडे आशाळभूतपणानं पाहतो. ]

पाटी०:—समजलों, समजलों, दगडूबुवा कांहीं काळजी करूं नका. पंचपक्वानाच्या नैवेद्याचं सामान तुमच्याकडेच पोहोचतं करतो. नैवेद्याचे पदार्थ मात्र अगदीं सुंदर बनले पाहिजेत. पुजाऱ्याला वाटावं कीं देवाला नैवेद्य दाखवायच्या आधीं आपणच दोन घास उचलून तोंडात टाकावेत. [ दगडूबुवास ] दगडूबुवा. जा, जा तुम्हीं आतां जा, भाषा कसे. महापुजेच्या तयारीला एकदम लागा.

बोध०:—[ स्वगत ] ही तयारी म्हणजे विठोबारखमाईच्या मूर्तीवर सांचलेला बोटभर धुरळा काढण्यापासूनच होणार आहे. बिचाऱ्या विठोबा रखमाईची महापूजा मग काय बांधली जाईल ती जावो, आधीं

गंडकीबाईच्या हातचे केरसुणीचे तडाके तिला खावे लागणार एवढं मात्र खरं.

दग०:—बरं आहे मी होतो तर पुढं [ जातो ]

आप०:—बोला आता पाटील पुढं काय करायचं तें ?

पाटी०:—हे बोधलेबुवा काय सांगतील ते.

बोध०:—छे, छे, असं कुठं झालं की काय ? मी बोलून चालून उपरी माणूस बाहेर गांवचा आलेला. देवस्थान तुमच्या गांवचं. तुम्हीं ठरवाल त्यांत मी आहे.

पाटी०:—खरंच सांगू आपय्या दिक्षीत ? मूर्ती उचलून न्यायचं हे काम मोठं जड आहे. मोठ कठीण आहे.

आप०:—कां त्या फार जड आहेत कीं काय ? जड असतील तर खांद्यावरनं न नेतां गाड्यावर घालून नेऊं, नाहीं तर हत्तीच्या आंबारींत घालून नेऊं.

पाटी०:—जाग्यावरनं एकदां हालल्या म्हणजे मग तुम्ही खांद्यावरनं ही न्याल. पण त्या जागेवरनं हालायलाच जड आहेत. कारण पुष्कळ लोकांचं ममत्व आाणि पुष्कळ लोकांचे हितसंबंध यांनीं त्या लोखंडी साखळ-दंडासारख्या आहेत त्या जागेला जखडून गेल्या आहेत. त्या हालवायला मोठा प्रयत्न करावा लागेल.

आप०:—प्रयत्न हवा तेवढा मोटा करा. आणि असं मी तुम्हाला निक्षून सांगतो याचं कारण हवा तितका पैसा या कामी खर्च करायला महाराजानी मला आज्ञा केली असतो.

पाटी०:—हं. तसं असलं तर मात्र गोष्ट वेगळी. हे पहा दिक्षीत मी कांहीं स्वतःला मोठासा व्यवहार चतुर म्हणवून घेत नाहीं. पण खर्चा-यला हवा तितका पैसा असला म्हणजे हव ते काम होऊन जात इतकं मात्र मला कळत.

बोध०:—हो. हो. म्हणच आहे कीं नाही " दाम करी काम बिब्बी करी सलाम. "

आपय्या:—[ हंसून ] हे पहा. बिव्वीचा सलाम घेण्यापेक्षां आमचा हे काम अधिक पवित्र आहे म्हणून पैसा खर्चून सुद्धां ते साधायला आमच्या माहाराजांची तयारी असते. हितसंबंधाचा म्हणाल तर हें तुम्हांला माहीत आहे कां? कीं या मूर्ती मुळीं आमच्या कानडी देशांतल्या. पूर्वी केव्हां कुणीं राजानं इकडे आणल्या त्यांच आता आमचा राजा परत घेऊन जाणार. दगडूबुवानीं जरी आपला वंशावळ ब्रम्हदेवाच्या बेंबी-पर्यंत नेऊन भिडवला तरी खरं बोलायचा म्हणजे मूर्तींवरची मालकी आमच्या महाराजांची आहे. हितसंबंध हा असा आहे. पैशाच्या खर्चाची ही अशी व्यवस्था असते. याच्या उप्पर प्रेम आणि ममत्व काय असेल तो तुमचा तुम्हीं पाहून घ्या. असल्याच कुणाच्या प्रेमाच्या आणि ममतेच्या मुळ्या गुंतलेल्या तर सोन्यारुप्याच्या कुदळी अगर पाहारी चालवून टाका काढून म्हणजे झाली. आणि याच्याही उप्पर सांगून टेवतो, इतकं सगळं करून हें काम निभत नसलं तर सांगा—म्हणजे राजेलोक आपला हेतू सिद्धीला न्यायला जो शेवटचा उपाय योजते तो योजा असा महाराजांना सांगून आम्हीं मोकळे होऊं, पहा आपला विचार.

पाटी०:—दिक्षीत आलं सगळं माझ्या लक्षांत. तुम्हांला आतां जास्त बोलायलाच नको. हे पहा तुम्हांला स्पष्टच सांगतो. पांडुरंगाच्या मूर्ती या गांवातून नेल्यात तर त्याला आमची संमती आहे. कसं काय बोधले-बुवा? तुमचं काय म्हणणं आहे?

बोध०:—हो हो. आहे म्हणजे काय विचारतां? पंढरीच्या मूर्ती अनागुंदीचा राजा नेणार त्याला मी पैठणचा दुकानदार कशाला हरकत करूं? आम्हाला राजाज्ञा शिरसा वंद्य आहे. पण दगडूबुवाचं कसं काय?

पाटी०:—अहो ते लागलं माझ्याकडे. बरी बिन पैशानं आडगळ जाईल त्याच्या घरची. जळेनातका या मूर्ती असं एरवी सुद्धां त्याची बायको म्हणते. यंदाच कराचे पैसे चार चुकून मिळाले म्हणून त्याला जरा हें वाटेल, तर त्याला एकदमच थोडे जास्त कमी पैसे दिले म्हणजे संपलं. विठ्ठलाची वस्ती आज पंढरींत आहे खरी; पण उद्या या मूर्ती तुम्हीं उचलून न्या मागं एक कुत्रासुद्धां हळहळणार नाहीं हे मी

सांगून देतो. नाहीं म्हणायला एक थोडी अडचण आहे ती या वारकऱ्यांची आणि त्यांचा पुढारी भानुदास याची.

आपय्या:—काय उलटा न्याय आहे पहा गावचा होतो राजी आणि परका म्हणतो वाजी!

बोध०:—पिकतं तिथं विकत नसतं हा न्यायच आहे.

आपय्या:—एवढीच अडचण नां ? ती आम्हीं संभाळतो.

पाटी०:—त्यांतून थोडी तुम्हांला युक्ती सांगतो. भानुदास आहे भोळा आणि भावीक. द्या त्याला थोडासा चढवून आणि आळवा प्रेमळपणाची मायावी रागिणी त्याच्या समोर थोडिशी. अहो ही खुळी वेडी संताळी एकदा कां याच्या नाकाडोळ्यांतून पाणी वाहू लागलं म्हणजे त्याच्या प्रवाहाबरोबर कुठपर्यंत वाहात जातील याचा कांहीं नेम नाहीं.

आपय्या:—हें थोडं बहूत माझ्याही लक्षांत आलं होतं. त्यांतून तुम्हीं सुचविलं हे बरंच झालं. भानुदासाचं आम्हीं पाहून घेतो. बाकी सगळ्यांची तोंडमिळवणी करून तुम्हीं आंकडा ठरवा आणि आम्हांला कळवा. महाराजांचा उद्यां परवाचाच परत फिरायचा बेत दिसतो, आणि हे लवकर जुळलं म्हणजे अधिक थांबायला नको. मी येतो आतां [ जातो ]

पाटी०:—बोधलेबुवा तुमचा आमचा विचार आतां ठरवूं या. हें पहा तुम्हीं या गांवचे नाहींत हें तुम्हींच कबूल केलं आहेत ?

बोध०:—मग तुमचं म्हणणं काय ?

पाटी०:—हे पहा सरळ सांगतो. मूर्ती देऊन टाकल्याबद्दल पैसे मिळतील त्यांत कांहीं एक हिस्सा सांगू नका.

बोध०:—[ घाबरून ] आणि मग ? माझी वाट काय ?

पाटी०:—घाबरुं नका. तुमची उत्तम व्यवस्था लावून देतो. मूर्तीबरोबर जातानां कुणी पुजारी पाहिजेच ते तुम्हींच जा कसे ? या राजाकडून तुम्हाला कायमचीच आसामी करून देतो म्हणजे झालं ?

बोध०:—( आनंदानं ) मग काय हो आणखी पाहिजे ? रोकड

रक्कम घेऊन उगीच कुणीं संभाळीत बसावी? पुजारी बनलो तर जन्माची भाकरी तरी मिळेल.

पाटी०:—बरं आहे. जा तर तुम्हीं तयारीला लागा.

[ घोबलेबुवा जातो व शंभुबुवा येतो ]

कां शंभुबुवा काय तुमचं म्हणणं आहे बोला.

शंभु०:—बोलायचं काय? माझी वाटणीं करून द्यायला पंचाईत बोलावता ना?

पाटी०:—[ हांसून ] अहो वेडे अहांत तुम्हीं शंभुबुवा. येऊन जाऊन तुम्हांला वांटणी कशाकरतां मागायची होती? दगडूबुवाला कराचे पैसे मिळूं नयेत, त्याचं नुकसान व्हावं म्हणूनच ना? ते तर आतां कायमचं होणार.

शंभु०:—ते कसं काय?

पाटी०:—अहो कसं काय काय विचारतां? अहो भानुदासाच्या फिर्यादी वरनं कराचे पैसे जप्त करून ठाणेदारसाहेब वारकऱ्यांना वाटून टाकणार आणि भानुदासाचे दागिने त्याला परत करणार. आणि याहून मौज ती पुढेंच आहे.

शंभु०:—ती काय?

पाटी०:—अहो ती अशी कीं हा राजा मुळीं विठ्ठलाच्या मूर्तीच मुळीं घेऊन जाणार आपल्या देशाला. घे म्हणावं दगडूबुवाला आतां कशावर कर घेतोस तो. मग बोला, झालं कीं नाहीं तुमचं काम आपोआप?

शंभु०—[ टाळ्या वाजवून ] झालं मला आणखी ते काय पाहिजे? हा दगडूबुवा मोठी ऐट करून कराचे पैसे वसूल करीत होता, याला हे पैसे विनाकारण मिळत होते. तें खरं म्हणाल तर मला सोसत नव्हतं झालं. बाकी या दगडाच्या मूर्तींत कुणा लेकाला हवी वाटणी? त्या निमे-निम फोडून घेतल्या तरी त्याचा खलबत्ता तर राहोच पण पाटावरवंटा सुद्धां व्हायचा नाहीं. त्याहीपेक्षां चांगले दगड पुष्कळ आमच्याकडे आहेत. पण तुम्हीं म्हणता हे कायम ना?

पार्टी०:—कायम म्हणजे विचारतां काय? हा राजा होऊनच तुम्हांला विचारील तेव्हां तुम्हीं त्याच्या पुढं सांगून द्या की, मूर्ती मूळच्या कर्नाटकांतल्या म्हणून. म्हणजे झालंच काम. तुम्हांला वेळेवर बोलावणंच पाठवीन म्हणजे तुम्हीं दगडूबुवाची फजीती पाहायला समक्ष या.

शंभु०:—बरं आहे, मी जातो तर. [ जातो. इतक्यांत दुसऱ्या बाजूनं मंगळाजी येते ]

पार्टी०:—कां मंगळाजी, तुम्हीं कुणीकडे इकडे?

मंग०:—इतक्या लवकरच कां विसरलांत पूर्वी चांगितलं तें? तुम्हीं कबूल केलेल्या गोष्टींतलं काय काय झालं ते विचारायला आले.

पार्टी०:—अहो विचारता काय? सगळं तुम्हांला सांगितल्यासारखं झालं. पहिली गोष्ट, आधि आज संध्याकाळीं गाण्याची तयारी ठेवा. राजाकडून होणाऱ्या आजच्या महापुजेंत तुमचं गाणं मी घुसडून दिलं आहे. आणि गाणं तरी कसलं? देवळांत शेजारतीच्या वेळीं येऊन तंबोऱ्याची गवसणी सोडून जरा इकडे तिकडे खुंट्या पिळा आणि जरा तोंड उघडा कीं फिरून तंबोरा गवसणींत घालण्याची तयारी. शिवाय उद्या राजाच्या तंबूत तुम्हाला बहुधा गायला जावं लागेल. आणि त्याच्याहूनही एक आनंदाची बातमी सांगायची राहिलीच आहे.

मंग०:—ती कोणती?

पार्टी०:—अहो तुम्हीं विसराल पण मी विसरायला पाहिजे ना? तुमच्या मागं हीं टाळकुट्यांच्या भजनाची जिकीर असते ती कायमची काढून टाकतो.

मंग०:—ती कशी काय?

पार्टी०:—अहो विचारतां काय? या विठ्ठलाच्या मूर्तीच उचलून या राजाबरोबर कानड्या मुलखांत पाठवून देतों.

मंग०:—इश्श. राजानं बरोबर नेण्याइतकी का त्या मूर्तींची अपुर्वाई?

पार्टी०:—तुमचं म्हणणं बरोबर आहे. असल्या निर्जीव काळ्या दगडाच्या मूर्ती नेण्यापेक्षां तुमच्यासारखी एखादी चालती बोलती गोरीगोमटी मूर्ती राजानं बरोबर न्यायला पाहिजे होती खरी. पण कुणाची आवड कशी तर कुणाची कशी! असो; तुम्हांला कबूल केल्याप्रमाणें तुमचं

काम केलं ना? परवा दिवस उजाडायला या मूर्ती कांहीं दगडूबुवाकडं राहात नाहीं. आणि मी सांगतो बहुधा दगडूबुवाही जाग्यावर राहात नाहीं.

मंग०:—उत्तम झालं. मूर्तीबरोबर हे टाळकुटेही निघून जातील, मग मला जरा हायसं वाटेल.

पद १८

टाळले। सगळे। मम सौख्याचे रिपु-गण साचे ॥ धृ० ॥
टाळ मृदंगा पिटतां पिटतां ॥
कीट पडोनी घर भरले ॥
परि मज कांचन कण न मिळे ॥ १ ॥
अखंड-सौभाग्यीं मम पडला ॥
अखंड-भजनानें घाला ॥
धानिक पति न मज कोणि मिळे ॥ २ ॥

पाटी०:—अहो मूर्ती सकाळीं हालल्या म्हणजे रिकाम्या झालेल्या जागेंत संध्याकाळीं आपण तमाशाच उभा करूं झालं. म्हणजे या टाळकुट्यांवर पुरा सूड उगवल्यासारखं झालं कीं नाहीं?

मंग०:—पण हे सगळं खरं ना पाटीलबुवा? नाहीं तर मला आपली उगीच नादाला लावाल झालं.

पाटी०:—छेः तुम्हाला कसला नादाला लावणार? अहो उलट तुमच्या नादाला मी लागलो म्हणून तर ही सारी खटपट? जा तुम्हीं लागा आपल्या तयारीला. [ मंगळाजी जाते ] शाबास माझी. सगळ्या गोष्टींची तोंडं कशी अगदीं बेमालूम मिळाली. एका तडाक्यांत मी जन्माचं कल्याण करून घेणार. या मूर्ती गेल्या म्हणजे पंढरपूरची वारकऱ्यांची ही गर्दी पुष्कळशी मोडेल आणि यांची घाण काढण्याचं काम गांवकऱ्यांचं बरंचसं वांचेल. असो, कृष्णदेव राजाकडे जाऊन ही सगळी हकीकत सांगून सवद्याचे पैसे पदरांत पाडून घ्यावे हे बरं. मग वारकरी अगर दुसरे कोणी हवं तितकं ओरडोत अगर गळा काढून रडोत मी तिकडे लक्ष देतो आहे कशाला? [ जातो. ]

---

## प्रवेश तिसरा.

[ भानुदास व आपय्या प्रवेश करतात ]

भानु०:—काय म्हणतां ? महाराज माझी वाट पाहात आहेत ?

आपय्याः—होय. आमची महाराज आपला वाट एकसारखी बघते. आपली कीर्तन ऐकून आमची महाराज फार फार संतुष्ट झाली. ते आम्हाला म्हणते, आपय्या तूं भानुदासाकडे जा आन तेला आणून मला भेटीव, ना तर प्राण जाते.

भानु०:—काय ? तुमच्या महाराजाना असं काय झालं आहे ? मी कांहीं वैद्य नाहीं, किंवा जोतिषी नाहीं. तुमच्या महाराजांची प्रकृती बिघडली असेल तर गांवातला नाहीं तर जवळपासचा एखादा चांगला वैद्य घेऊन येतो.

आपय्याः—नाहीं भानुदास, तूंच आमच्या महाराजांची वैद्य ! आमच्या महाराजाला शारिराची रोग नाहीं झाली. तेला परमार्थचे बाधा झाले. तुमचा कीर्तन ऐकून महाराज म्हणते मी राज्य सोडते, आंगाला राख फासते आणि रानांत निघून जाते. आन् मला म्हणते आपय्या, तूंच आपली राज्य सांभाळ. ए मोठा संकट आले. आमचे महाराज गोसावी होऊन गेली तर आमची कानडी प्रजा काय करेल ? भानुदासाबाबा तूंच वैद्य, तुझी पाय धरते, पण आमच्या महाराजाला दोन शब्द सांग आन तेचा लक्ष फिरून राज्याच्या कारभारांत पडती असं कर बाबा ! आम्ही सगळे कानडी प्रजेच्या वती तुझे पाय धरतो. असली राजा प्रजेला कधीं मिळतो नाहीं.

भानु०:—काय दिक्षीत ? महाराजानां वैराग्य प्राप्त झालं म्हणता ? वः तसं झालं असलं, तर तुम्हीं त्यानां बाधा झाली काय म्हणता ? आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला असं मानून मोठा सामारंभ केला पाहिजे. दुःखानं गांजलेले किंवा व्याधीन पिडलेले अशा आर्तांना वैतापानं वैराग्य झालं तरी ते ग्राह्यच असतें; आणि तुमचे महाराज तर उत्क-

र्षांच्या शिखराला पोंचले असतां, त्याना संतती संपत्ती अनुकूल असतां, आरोग्याचं ऐश्वर्य ते भोगीत असतां, जर त्यांच्या मनांत वैराग्य बाणलं असेल तर कपिला षष्ठांचा योग आला असं मी तरी म्हणन. चला चला आपय्या, मोक्षपर्वणीचा सुखसोहोळा मला आपल्या नेत्रांनीं पाहु द्या.

पद १९

मूर्तिमंत पातला । मोक्ष पाहुं दे मला ॥
नृपाळ विभवशालि जो विरक्तिमार्गी लागला ॥ धृ० ॥
धनाहि गमत वमनसे । छत्र अशुभ चिन्हसें ॥
राजनाम दूषण जणुं । मानि कुयश कीर्तिला ॥ १ ॥

आपय्याः—भानुदास, तुम्हीं मला निव्वळ हरिभक्त दिसते. तुम्हाला राज्यकारभार कांहींच कळतो नाहीं. अरे बावा आमची महाराज आंगाला राख लावून जाईल तर तेचा शत्रू तेचा राज्य घ्यायला टपून बसली तो तवाच घेतो सोडनो नाहीं. उंदरावर झडप घालायला मांजरी टपून बसतो, तसा तेचा शत्रू राज्यावर उडी घालतो, सगळा देश जाळतो, बायकापोर कापून काढते राज्यांतली शेंकडो देवस्थानं फोडते आन कायबी कायबी करते. आरे बावा भानुदास, तूं आमच्या महाराजाला आपल्या सारखी मोक्षार्थी करूं नकोस. आमच्या सगळ्या कानडा प्रजेच्या शिव्याशाप आपल्या डोक्यावर घेते काय? आम्हीं तुझ्या पाया पडतो. तूं महाराजांची समजूत काढ.

भानु०:—काय? तुमच्या महाराजांना वैराग्य प्राप्त झालं तर तुमच्या राज्यावर अशीं संकटं येतील म्हणतां? तसं असेल तर माझं कांहीं एक म्हणणं नाहीं. राजानं प्रजेचं रक्षण आधीं केलं पाहिजे. आणि मग त्यानं मोक्षमार्गाकडे ढुंकून पाहायला हरकत नाहीं. मी सांगितली ती मोक्षपर्वणी प्रजेच्या सुखासमाधानाच्या वेळची. प्रजेचा नाश होत असेल तर तुमच्या महाराजांनीं फिरून संसारांत लक्ष घालावं असाच मी त्याना उपदेश नव्हे तर विनवणी करीन.

आपय्या:—अहाहा भानुदासा बाबा धन्य आहे तुझी. आमच्या महाराजाला रोग जडली तेला तूंच धन्वंतरी भेटली. ही पहा, आमची महाराज कशी वेड्यासारखी होऊन बसली आहे ती. [ पडदा उघडतो. ]

कृष्णदेव महाराज डोळे मिटून आपल्याशींच टाळ्या
वाजवीत भजन करीत बसले आहे.

कृष्ण०:—[ आपल्याशींच ] अहाहा, काय तो कीर्तनाचा रंग? काय तो नामगर्जनेचा आनंद? त्या टाळ मृदंगाच्या ध्वनीच्या प्रत्येक आंदोलनाबरोबर मोक्षद्वारांतून सुटलेल्या विमानाच्या साखळीचा एक एक दुवा जोडला जातो कीं काय? असं मला वाटलं. पण मी गेल्यावर भानुदासानं—त्या प्रेमळ भगवद्भक्तानं—आपलं कीर्तन लवकरच बंद कां बरं केलं? पण मी तरी कां म्हणून काय विचारतो? त्या प्रेमळ संत समाजाबरोबर विमानांत बसून वर जाण्याची माझी योग्यता कुठं आहे? त्यांनीं आपला जन्म नम्रपणानं ईश्वरभजनांत घालविला, आणि मी मात्र राजा होऊन गर्व आणि अहंकार याचे सर्व खेळ खेळून राजस आणि तामस गुणपरिपाकाचा संचय केला. माझ्यासारखा अभागी मनुष्य या विमानांत बसला तर तें स्वर्गाला कसं जाईल ? मोक्षपदाला उन्मुख व योग्य झालेल्या इतक्या विभूतींचा घात माझ्या मुळं करणं कधींही बरं झालं नसतं. तस्मात् भानुदासानं कर्तिन थांबवलं तेंच बरोबर केलं.

आपय्या:—[ पुढें होऊन ] महाराज हे पहा श्रीभानुदासच आपल्या भेटीला आले आहेत.

कृष्ण०:—[ खडबडून भानावर येऊन ] काय ? श्रीभानुदास माझ्या भेटीला आले.

आपय्या:—होय महाराज. त्यांच्या भेटीचा आपला उत्सुकता पाहून मीच त्याना घेऊन आले. भानुदास मोठी सज्जन आहे. माझा विनंती होताच आपल्या भेटीला निघुन आले.

भानु०:—छे, छे: महाराज यांत माझं सौजन्य कसलं ? आपण राजेलोक म्हणजे पृथ्वीवरील प्रत्यक्ष श्रीविष्णूचेच अवतार. श्रीपांडुरंगांत आणि

आपणांत भेदभाव अज्ञजनाशिवाय कोणी मानणार नाहीं. श्रीविष्णूचं प्रजापालनाचं काम, आपण त्यांचेच प्रतिनिधी या भूतलावर करतां. आपल्याला मी भेटलो तर श्रीपांडुरंगालाच भेटल्यासारखं मला झालं.

कृष्ण०:—महाराज नको नको, आम्हां संसाररत राजेलोकांवर आपणा संत सज्जनांचं कोणत्याही युगांत असंच अखंड प्रेम राहिलेलं आहे हें मी जाणतो. पण राजेलोकांची स्तुति करणं हे आपल्या महानुभावित्वाला शोभलं तरी ती स्तुती आम्हीं कानानीं ऐकून घेणं हें आम्हांला दूषण आहे. आपणासारख्यांची आभावित गांठ पडल्यामुळं ती स्तुती ऐकून घेण्याची आपत्ती येणार, तस्मात् या पंढरीतच नित्य रहावं आणि आपल्यासारख्यांच्या समागमांतच नित्य काळ काढावा असा मी निश्चय केला आहे. ते राज्य आहे, ते प्रधानमंडळ आहे, व ती प्रजा आहे परस्पर पाहून घेतील. मी राजा झालो म्हणून कांहीं अमर नाहीं. मी मेल्यावर तरी राज्याची व्यवस्था करणं प्राप्तच आहे; तेव्हां ते ती आतांही करतील.

पद २०

मी करिन सुखनिवास पंढरपुरीं सदा ॥
तोडुनि संसृति समूल धरिन हृदीं हरिपदा ॥ धृ० ॥
राजा न सुखलेश । अघसंतति विक्लेश ॥
विस्मृतिपथिं रमेश । ही जडत आपदा ॥ १ ॥

भानु०:—काय महाराज? आपण राज्य सोडून या पंढरींत कायमचेच राहणार ?

कृष्ण०:—होय भानुदासा यांत काय संशय ? माझ्या डोळ्यांत श्रीविठ्ठलाची मूर्ती आणि या भक्त मंडळीच्या चारित्राचा देखावा इतका भरून राहिला आहे कीं ज्या राज्यांत या मूर्ती नाहींत किंवा हे संत सज्जन नाहींत तें राज्य असून मला दिसणार नाहीं. या पंढरीला येऊन मी आयता डोळस झालों तो परत माझ्या राज्यांत जाऊन आंधळा काय म्हणून बनावं ?

पद २१

संसार सारा । अविद्या पसारा ।
परि मानितो त्या ऽऽऽ । हा जीव प्यारा ॥ धृ ॥
खदिरअंगारसम । बहु ताप देतां ।
'परमार्थ परमार्थ' । करितो पुकारा ॥ १ ॥

भानु०:—माझा श्रीविठ्ठल मुमुक्षूंना परमार्थाची दिव्य दृष्टी देतो. ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण महाराज राजाचा परमार्थ त्याच्या प्रजाजनांच पालन संरक्षण करणं यांतच सांठविलेला नाहीं काय ?

राजाः--आपण योग्य उपदेश केला. परंतु पंढरविरून माझं मनच हालत नाहीं. आणि मी जर पंढरी सोडून आपल्या नगराला जाऊन राज्य कारभारांत लक्ष घालावं अशी आपली सदिच्छा असली तर माझं निरंतर समाधान होईल असा कांहीं तरी कृपाप्रसाद मला द्यावा.

भानु०:—मी तुमच्यासारखाच फारतर एक मुमुक्षु आहे. मी तुम्हांला कसला प्रसाद देणार ?

राजाः--पंढरिनाथाच्या या मूर्तींसारख्या मूर्ती मला लाभोत असा आशीर्वाद मला असावा.

भानु०:—एवढंच ना ? पंढरीनाथाच्या या मूर्ती मला जशा दर्शनप्रिय आहेत तशा त्या तुम्हांलाही आहेत हें पाहून मला आनंद होतो. महाराज, मूर्तीदर्शनाचा आपला अभिलाष आपल्याला आणि आपल्या प्रजाजनानां कल्याणप्रद होवो !

राजाः—अहाहा ! या आशिर्वादानं मी धन्य झालो. कोण आहेरे बाहेर [ आपच्या पोषाख घेऊन येतो. ] दिक्षीत, भानुदास महाराजांच्या आशीर्वादानं मी कृतार्थ झालो. त्याना पोषाख द्या.

भानु०:—महाराज छेः छेः मला पोषाख घेण्याचा अधिकार नाही. महाराजांची कृपा माझ्यावर आहे येवढं मला पुरे. आपणाला जे कांहीं द्यायचं असेल ते आपण पंढरीनाथाच्या नावानं कुणालाही द्यावं म्हणजे ते मला पोहोचेल. [ जातो. ]

राजा:— वाहवा,

पद २२

झालों मीं आजि धन्य खरा ॥
देउनि दर्शन रुक्मिणिपति मज ॥
संगति येई राजपुरा ॥ धृ० ॥
कन्नडदेशीं क्षेत्र पंढरी ॥
वसविन मी वैभवशाली ॥
ऋण पितरांचे सर्व फेडुनी ॥
पुरविन पुरजनछंद पुरा ॥ १ ॥

---

## प्रवेश चवथा.

स्थळ—पंढरपूरचा रस्ता [ पाटील व बोधले बुवा प्र. क. ]

पाटी:—[ हंसून मोठ्यानं ] शेवटीं एकदाची श्री विठ्ठलाची स्वारी या पंढरीला सोडून गेली तर ? बोधलेबुवा अजून तुम्हीं इथंच [ बोधले प्र. क. ]

बोध०:—मग काय करू म्हणतां ?

पाटी०:—अहो महाराजाजवळ मी माझं वजन खर्च करून तुमची नेमणूक पुजाऱ्यांत कायम केली !

बोध०:—आतां मी त्याच तयारीला लागतो. ( हंसून ) पण लोक असतील नसतील तिथून देवाच्या मूर्ती आपल्या गावांत आणतात आणि तुम्हीं आयत्या गावांत असलेल्या गांवाबाहेर घालवून दिल्या केवढं तुमचं गांवावर प्रेम ! आन् केवढा तुमचा गांवचा आभिमान ?

पाटी०:—बोधलेबुवा वेडे कहांत तुम्हीं. अहो या गांवचं प्रेम आणि अभिमान आहे म्हणून तर मी हा एवढा उद्योग केला.

बोध०:—तो कसा काय बुवा ?

पाटी०:—सांगतो ऐका. घाला. हातावर बोटं घाला! एक तर आधीं दगडाच्या मूर्ती गावांतून जाऊन त्याच्या भारंभार सोनं रुपं गावांत आलं. कलम दुसरं, दर आषाढी कार्तिकीला या घाणेरड्या टाळकुट्यांची गर्दी पंढरपुरांत होते, ती कायमची टळली. कलम तिसरं या मूर्ती कर्नाट-कातनं आणल्याचं भांडण मिटल्यानं फिरून पंढरपुरावर कुणा राजाची स्वारी येण्याची भीती राहिली नाहीं. कलम चवथं, आमच्या गांवचं संस्थान मोडलं तरी दुसऱ्या एका गांवांत नवं देवस्थान निर्माण झालं. आपलं मूर्तीमंत पुण्य आम्हीं दुसऱ्याला दिल्यापासून आपली कीर्ती जगांत केवढी तरी होईल. आमचा स्वार्थत्याग हा कांहीं लहान नाहीं!

बोध०:—[ हंसून ] स्वार्थ साधून स्वार्थत्याग करण्याचं तुमच्या पंढरपूरकरांचं हे उदाहरण मोठं लोकोत्तर खरंच. द्रव्य म्हणजे अविद्या घेऊन सगुण पूजेची विद्या दुसऱ्याला देऊन टाकली हा तुमचा मोठा स्वार्थत्याग खराच. बरं, पण आता यात्रेकरू लोकांत मूर्ती गेल्याचा गवगवा होईल त्याचं काय करायचं?

पाटी०:—त्याचं काय करायचं! भानुदासावर सगळा दोष घालून मोकळं व्हायचं! आणि दुसरं काय?

बोध०:—मला वाटतं ही वारकरी मंडळीच इकडं येताहेत.

पाटी०:—बरंच झालं. जरा आड राहून ते काय बोलतात ते ऐकूं आणि त्या धोरणानं त्यांच्या मधेंच अशी कंडी पिकवून देऊं कीं भानु-दासानं राजाकडून पुष्कळसे पैसे घेऊन मूर्ती हालविण्याला संमति दिली म्हणून. म्हणजे आयतंच परस्पर काम झालं!

बोध०:—हे आलेच वारकरी. चला बाजूला जाऊं ( मागं जातात )

१ ला वार०:—काय म्हटलंस? श्रीविठ्ठलाच्या मूर्ती देवळांत नाहींत म्हणून?

२ रा वार०:—[ दुःखानं ] होय बाबा. असंच झालं खरं. जे या डोळ्यांनी पाहिलं ते सांगतो.

३ वार०:—अरे हा काय सांगतो आणि तूं काय ऐकतोस? यानं डोळे झाकून पाहिलं असेल.

४ था वार०:—नाहींतर डोळे उघडे ठेऊन भलतीकडेच पाहिलं असेल.

२ रा वार०:—[ दुःखानं ] गड्यांनो, तुम्ही माझी थट्टा करीत अहा खरे, पण तुम्हीं एक वेळ देवळांत जाऊन तरी पहा म्हणजे माझ्या सारखंच तुम्हाला दुःख होईल. [ रडत ] गेल्यारे बाबा, श्रीपांडुरंगाच्या मूर्ती गेल्या! मूर्तीच्या खालची जागासुद्धां उखळलेली मी आपल्या डोळ्यानं पाहिली.

१ ला वार०:—[ थट्टेच्या खरानं ] होय ना? अरेरे तुझ्या डोळ्यांवर खरंच सारा आला असला पाहिजे. एखादा नाकाडोळ्याचा वैदू लवकरच गांठ आणि साफ करून घे. नाहीं तर तूं जाशील तिकडे भिंताडंच व्हायचीं!

२ रा वार०:—गड्यांनो, मी तुम्हाला किती जीव तोडून सांगूं? विठ्ठलाच्या मूर्ती नाहिंशा झाल्या हें जर खरं नसतं तर ती द्वाडवार्ता सजवून सांगायला माझी जीभ तरी कशी वाहिली असती? पण खरं आहे तें तुम्हाला सांगितलंच पाहिजे. तुम्हींच चला ना माझ्या बरोबर आणि समक्ष पाहाना आपल्या डोळ्यांनीं!

३ रा वार०:—आणि तूं सांगतोस तें खोटं ठरलं तर?

२ रा वार०:—तुम्हीं काय मागाल तें देईन. नाहीं तर द्याल ती शिक्षा सोशीन. मी खोटं सांगून मला काय मिळणार?

४ था वार०:—काय मिळणार? आमची गम्मत पाहायला मिळणार. पूर्वी पुरांणातनं पुष्कळ चमत्कार वर्णन केलेले आहेत. पण देवाच्या मूर्ती नाहींशा होण्याचा चमत्कार कधीं ऐकला नाहीं. देवाच्या अंगावरचे दागिने फार तर कोणीं चोरून नेईल; पण खुद्द देवाला चोरून नेलेलं नाहीं कुठं ऐकलं.

३ रा वार०:—पण हा जर इतक्या खात्रीनं सांगतो आहे आणि दुःखानं इतका व्हळलेला दिसतो तर चलाना त्याच्या म्हणण्याप्रमाणं आपण जाग्यावरच जाऊन पाहूं?

१ ला वार०:—पण यालाही आपण बरोबर घेऊन जाऊं [ दुसऱ्याकडे पाहून ] आणि जरकां यानं लबाड सांगितलं आणि आमची थट्टा केली असं ठरलं तर याला असं बदडून काढूं की आतां रडण्याचं जे सोंग करतो आहे तें तो मग खरोखरीच रडूं लागेल.

३ रा वार०:—चला तर याला घेऊन [ १, ३, ४ वारकरी २ चा हात धरून नेतात व जातानां पुंडलीक वरदे हारि विठ्ठल असं ओरडतात. इतक्यांत पाटील व बोधलेबुवा प्रवेश करतात. ]

पाटी०:—मित्रहो चालला कुठं ?

१ ला वार०:—पांडुरंगाच्या मूर्ती राजानं नेल्या असं हा म्हणतो तें खरं कीं खोटं हें पाहायला !

पाटी०:—[ दुःखाचा आवीर्भाव आणून ] पाहायला जायचे फुकट श्रम कशाला घेतां ? मूर्ती गेल्या हे अगदीं खरं !

बोध०:—अहो हे पाटील आहेत पंढरपुरचे ! हे सांगतात ते खोटं कसं असेल ?

२ रा वार०:—पण राजाला मूर्ती नेण्याला संमती कुणीं दिली ?

पाटी०:—अहो राजाच तो ! त्याला संमती हवी कशाला म्हणा ! पण त्यातून हि जेवढी संमती हवी होती तितकी तुमच्याच पैकीं एकानं दिली.

बोध०:—अहो हे पाटील आहेत. हें खोटं कसं बोलतील ?

३ रा वार०:—[ प्रत्येक वारकऱ्याकडे बोट दाखवून ] काय ? आमच्या पैकीं कोणीं समती दिली !

पाटी०:—अहो तुम्हीं इथं अहांत त्यापैकीं कुणीं नाही; पण तुम्हां वारकऱ्याचा पुढारी भानुदास नाहीं कां ? त्यानंच ?

सर्व वार०:—[ आश्चर्यानं एकमेकाकडे पाहून ] काय भानुदास महाराजांनी ?

बोध०:—अहो आश्चर्यानं बघतां काय ? हे पाटील आहेत हे खोटं कसं बोलतील ?

पाटी०:—होय, होय, तुमच्या पुढाऱ्यानंच राजाला संमती दिली ! हे पुढारीच सगळी घाण करतात केव्हांही.

बोध०:—अगदीं तसंच ! अहो हे पाटील आहेत खोटं कसं बोलतील ?

४ था वार०:—मग आम्हीं आतां असेच जाऊन भानुदास महाराजांना विचारतों.

पाटी०:—जाऊन विचारा हवं तर. पण तो खरी गोष्ट तुमच्या जवळ कधींही कबूल करणार नाहीं ! सांगून ठेवतो

बोध०:—हे पाटील आहेत हें खोटं कसं बोलतील ? पण हें पहा तुम्हांला देव पावला, हा भानुदासच इकडे येतो आहे ! त्यालाच विचारा म्हणजे झालं. तो आपला गुन्हा सहसा कबूल करणार नाहीं केलान तर आश्चर्यच म्हणा !

[ भानुदास येतो. ]

भानु०:—एकूण पंढरीनाथाला पंढरीचा कंटाळा आला ना ?

पाटी०:—त्याला कसचा ? पण तुम्हालाच पांडुरंगाच्या मूर्तीचा कंटाळा आला म्हणाना ? पांडुरंगाची या पंढरींत अनादी कालापासून वस्ती ! तुम्हीं बोलून चालून उपरी परगांवचे ! पण घालीवलंत कीं नाहीं आमच्या क्षेत्राचं सर्व सौभाग्य ? काय बरं मिळालं तुम्हाला त्यांत ? राजाला काय ? पडत्या फळाची आज्ञा त्याला हावीच होती. तुमच्या संमतीचं नुसतं त्याला निमित्त पुरलं ! [ भानुदास आश्चर्य चकित होतो ]

बोध०:—पहा वारकरी मंडळीहो पहा ! हा भानुदास यावर प्रत्युत्तर तरी देतो आहे कां तो ? मी नाहीं तुम्हाला वरचे वर सांगितलं कीं हे पाटील आहेत तेंव्हां ते खोटं कसं बोलतील ?

१ ला वार०:—काय महाराज ? पांडुरंगाच्या मूर्तीं नेण्याला आपण संमती दिली ?

भानु०:—अशी गोष्ट होईल तरी कशी ?

पाटी०:—प्रत्यक्ष घडून आली तशी ? काय हो भानुदास तुम्हीं कृष्णदेव महाराजांकडं गेला होतां कीं नाहीं त्याच्या बोलावण्यावरून !

भानु०:—होय ही गोष्ट खरी आहे !

बोध०:—पहा पाटील खरं तेंच बोलतात !

पाटी०:—बरं, महाराजांनी आपली एकट्याची एकांतांत गांठ घेतली कीं नाहीं ?

भानु०:—होय हीही गोष्ट खरी आहे !

बोध०:—पहा ! पाटील खरं तेंच बोलतात.

पाटी०:—त्यांच्या आपल्या भाषणांत मूर्ती हालवून अनागुंदीला नेण्याच्या गोष्टी निघाल्या होत्या कीं नाहीं ?

भानु०:—होय, हीही खरी गोष्ट आहे !

बोध०:—पहा पाटील खरं तेंच बोलतात. !

पाटी०:—झालं तर मग ! वारकरी मंडळीहो, पहा, पहा, तुमच्या समक्ष भानुदासाच्याच तोंडून न्याय झाला ! पहा हे तुमचे पुढारी ! हे पुढारीच घाण करतात ! खरं कीं नाहीं ?

बोध०:—पहा हे पाटील खरं तेच बोलतात !

भानु०:—पण मी महाराजांना काय सांगितलं हें तुम्हांला माहीत आहे काय ?

पाटी०:—तें आम्हांला कसं कळणार ! आपलं आणि महाराजांचं तें गुप्त खलबत होतं ! त्यांतल बोलणं आपलं आपणालाच माहीत ! त्या बोलण्या नंतर महाराजांनीं जे काय केलं त्या वरून तुम्हीं काय बोललां हें दिसतंच आहे !

भानु०:—अरे, अरे, अरे, कोण हा अर्थाचा आनर्थ !

पाटी०:—अनर्थ केला तुम्हीं आतां आम्हांला काय म्हणतां ?

३ रा वार०:—[ दुःखानं रडत ] काय हो भानुदास महाराज हें आपण काय केलं ? पांडुरंगाच्या मूर्तीचं दर्शन आतां आम्हाला कसं होणार ?

भानु०:—हरि हरि हरि—कोण हा माझ्यावर व्यर्थ गहजब !

बोध०:—पहा पहा कांगावा कसा करतो आहे तो पहा !

भानु०:—असो तुमचं म्हणणं काय ? मी पांडुरंगाच्या मूर्ती नेण्याला संमती दिली म्हणून ? बरं आहे तसंच कां होईना ?

४ ला वार०:—[ रडत ] झाली आमची निराशा झाली ! आतां पांडुरंग आम्हाला कसचा भेटणार ? पांडुरंगा बाबा पंढरी सोडून कसारे गेलास ?

भानु०:—गडेहो, रडूं नका. या पंढरीच्या बडव्यांनीं द्रव्य लोभ धरून वारीवर कर बसविला त्याचं हे प्रायश्चित्त पांडुरंगानं दिलं. मी स्वप्नांत पाहिलेला साक्षात्कार तुम्हांला सांगितलाच होता.

पाटी०:—पहा ! पहा बरं ! वारकरी मंडळींनो पहा ! पुढं जी गोष्ट करायची त्याची या गृहस्थाची आधीं पासूनच तयारी होती ! आणि तुम्हां वारकरी लोकांचा म्हणे हा पुढारी !

बोध०:—आपल्या हातानं अंगावरचे दागिने काढून वारकऱ्या करितां पंचांना दिल तव्हां केवढं आलं होतं औदार्य याच्या आंगांत ? पण पुढें दागिने सव्याज परत मिळायचे हें माहीत होतं. तेव्हां औदार्य न सुचायला काय झालं ?

भानु०:—पाटील, बोधलेबुवा हे नसते आरोप तुम्हीं माझ्यावर करतां याबद्दल मला फार वाईट वाटतं; पण राग येत नाहीं.

पाटी०:—थोरानां खऱ्याचा राग येत नसतो?

भानु०:—तुम्हीं अज्ञानामुळं असं म्हणत असाल. तुमची दुष्ट बुद्धी आहे असं माझ्यानं म्हणवत नाहीं !

पाटी०:—[ रागाच्या आविर्भावानं ] आमची दुष्ट बुद्धी ! असं म्हणून तरी पहा बरं.

भानु०:—तुमच्या बोलण्याचा मला रागहि येत नाहीं.

बोध०:—आपलं कृत्य घड असेल तर लोकांच्या बोलण्याचा राग येईल.

१ ला वार०:— [ दुःखानं ] भानुदास महाराज आमचा असा घात करण्याची बुद्धी तुम्हाला कशी हो झाली ?

भानु०:—मित्रहो ! सर्व प्रकार माझ्या लक्षांत येऊन चुकला ! पांडुरंगाच्या मूर्ती इथून कशा हालल्या हे पंढरीनाथ जाणतो. पण तुम्हीं असं दुःख करूं नका. मला पांडुरंगानं दृष्टांत दिला त्यांत दगडुबुवाच्या घरच्या कैदेतनं माझी सुटका करा असं देव बोलले, पण पंढरपूर सोडून जायचं बोलले नाहींत. म्हणून माझी अशी पक्की खात्री आहे कीं मूर्ती

अनागुंदीला बळजबरीनं राजानं नेल्या तरी त्या फिरून पंढरीला आल्याशिवाय राहणार नाहींत.

पाटी०:—अहाहा ! काय बोलतो पहा ! राजानं एवढ्या आग्रहानं आणि खर्चानं नेलेल्या मूर्ती तो परत देणार !

बोध०:—माशानं गिळलेलं माणीक परत येण्याशी आशा मूर्खाशिवाय दुसरा कोण करणार !

भानु०:—मला तुम्हीं मूर्ख म्हणा काय वाटेल ते म्हणा ! पण पांडुरंगाच्या मूर्ती परत पंढरपूरला आल्याच पाहिजेत हा माझा दृढ भरंवसा आहे !

३ रा वार०:—भानुदास महाराज ! असल्या पोकळ आशीर्वादानं आमचं समाधान कसं होणार ?

भानु०:—गडे हो मी तुम्हांला पोकळ आशीर्वाद कां देईन ! ही पहा पांडुरंगाचीच शपथ घेऊन तुम्हांला असं सांगतो कीं येत्या कार्तिकी एकादशीच्या आंत पांडुरंगाच्या मूर्ती पंढरीला येतील !

बोध०:—[ हळूंच पाटलास ] गडी बरा तेजावर आला आहे. काय साधायचं तें साधून घ्या !

पाटी०:—[ वारकऱ्यास ] अहो वारकरी दादानो ! ही तोड बरी निघाली. स्वतः भानुदासानं अशी प्रतिज्ञाच केलीतर मग आपलं कांहीं एक म्हणणं नाहीं ? पण अजूनही हें पोकळ आश्वासनच आहे.

भानु०:-पाटील बोवा ! प्रतिज्ञा करण्याइतका अहंकार माझ्या ठिकाणी परमेश्वरानं ठेवला नाहीं त्याला मी काय करूं ? पण हे पहा ! मी याच पावली अनागुंदीला निघतो, घरीं सुद्धां जात नाहीं ! तुम्हीं गांवचे पाटील अहा ! राजाचे अधिकारी अहा ! माझी बायको आणि मुलगा यांचं रक्षण मी परत येइपर्यंत तुम्हींच करा !

पाटी०:—कां ! हा कांहीं नवाच डाव नाही ना ? आणि तुम्हीं कार्तिकी एकादशीला जर मूर्ती घेऊन परत आला नाहीं तर ? त्याना पोटापाण्याला दिल्याच्या खर्चाचं काय ?

भानु०:—तसं झालं तर तुम्हीं त्यानां वाटलं तर उभ्या बाजारांत

विका. माझी आणि त्यांची पांडुरंगाला काळजी असली तर तो मूर्ती त्या मुदतीत पंढरीला आणून पोंचवील !

पाटी०:—[ स्वगत ] हें छान झालं ! या मूर्तीच्या व्यवहारांत मला इतर लाभ पुष्कळ झाले. एवढाच व्हायचा राहिला होता. [ उघड ] वारकरी दादानो ! आहे, तुमच्या या पुढाऱ्यांत कांहीं तरी पाणी आहे खरं ! आतां तुम्ही पुढच्या कार्तिकीपर्यंत खुशाल निर्धास्त रहा !

वार०:—ठीक आहे ! आमचं तरी दुसरं मागणं काय आहे ? आम्ही पुढच्या कार्तिकीला पंढरपुरास परत येऊं. आणि तोपर्यंत पांडुरंगाच्या मूर्ती पंढरीला परत आल्या तर बरंच आहे, नाहीं तर चंद्रभागेत आम्ही उड्या घालून प्राण देऊं. पण मूर्तींचं दर्शन घेतल्याशिवाय परत जाणार नाहीं.

पाटी०:—अगदीं बरोबर, असंच करा. (हळूच) ही संधी छान आहे, बोधलेबुवा तुम्हाला पुजारी या नात्यानं अनागुंदीला जायचंच आहे. हा भानुदास निघाला आहे. तेव्हां याच्याच पाळतीवर जा म्हणजे सहज एक पंथ दो काज होवून जाईल. [ स्वगत ] आता मूर्ती परत येतात ! नांव कशाला ? आणि हे सगळे टाळकुटे चंद्रभागेत बुडून मेले आणि त्यांच्या मरणाचं पाप या भानुदासाच्या बोडक्यावर बसल तर बरंच झालं !

भानु०:—ठीक आहे. मी येतो आतां ! गडे हो हा पहा मी अनागुंदी-लाच निघालो. मला येथूनच निरोप द्या !

सर्व वार०—[ भानुदासाच्या पांया पडतात ] या बरे महाराज ! पुढच्या कार्तिकीच्या वारीला आम्हीं तुमच्या वाटेकडे अगदीं डोळे लावून बसतों ! म्हणा-पुंडलीक वरदे हारि विठ्ठल !

भानु०:— पद २३

हाच चाललो बघाल । जरि क्षण अवधान द्याल ॥ धृ० ॥
श्रीपंढरीनाथ मूर्ति । परतुनि आणिन संप्रति ॥
संत जन विषाद आर्ति । शमविन अचिर काल ॥ १ ॥

अंक तिसरा समाप्त.

---

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला

[ स्थळः—अनागुंदीतील रस्ता. दोघे नागरीक प्र. क. ]

१ लाः—इतक्या घाईनं कुठं चाललास ?

२ राः—कुठं म्हणजे ? पंढरीनाथाच्या दर्शनाला.

१ लाः—काय म्हटलंस पंढरीनाथाच्या दर्शनाला ? इथं कुठला पंढरीनाथ ? पंढरीनाथ राहिला पंढरीला.

२ राः—मग कृष्णदेव महाराजांनी नवं मंदिर उभारून त्यांत ज्याची स्थापना केली तो कोण ?

१ लाः—तो विठ्ठल. तुला माहीत नाहीं वाटतं महाराजांचा हुकूम सुटलेला ?

२ राः—तो रे काय ?

१ लाः—हुकूम असा सुटला आहे कीं विठ्ठलाला कोणी पांडुरंग अगर पंढरीनाथ म्हणेल तर त्याला शिक्षा होईल.

२ राः—याचं कारण ?

१ लाः—अरे कारण अगदीं उघड आहे. आमच्या विठ्ठलाला पूर्वी पंढरपूरला नेऊन त्याचं नांव बदलून टाकलं होतं त्याच्या उलट आपल्या महाराजांनी मूर्ती आतां अनागुंदीला परत आणल्या तेव्हां त्याचं पंढरपूरचं नांव नाहींसं करावं अशी त्यांची इच्छा आहे.

२ राः—अस्सं ! तूं सांगितलास हुकूम बरं झालं ! पण नावांत बदल केला तसा मूर्तींत नाहींना बदल केला !

१ लाः—मूर्तींत रे तो कसा बदल करायचा ?

२ राः—कां नाहीं करतां येणार ? पंढरपुरास विठोबाला पितांबर आणि रुखमाबाईला लुगडं नेसवीत होते. पंढरपूरची सर्वच आठवण बुजवायची

असली तर रुखमाबाईला पितांबर नेसवावा आणि विठोबाला लुगडं नेसवावं. बिचाऱ्या मूर्ती थोड्याच आल्या आहेत असं केल्याबद्दल भांडण करायला ? एवढंच नव्हेतर विठोबारूपी श्रीविष्णूला पूर्वी आपण एकवेळ मोहिनीचं रुप घेऊन लुगडं नेसल्याची आठवण होऊन बरंच वाटेल. बरं ते असो, आपण कांहीं फिरून पंढरीनाथ म्हणणार नाहीं, पण तूं हें हातात काय घेऊन चालला आहेस ?

१ लाः—हें नैवेद्याकरतां पंचपक्वान्नाचं ताट घेऊन चाललो.

२ राः—पण आज नैवेद्य विशेषसा ? रोज कांहीं पंचपक्वान्नाचा नैवेद्य होत नाहीं.

१ लाः—म्हणूनच. रोज साधा नैवेद्य असतो, पण आज एकादशीनां ? एकादशी करतांच हा नैवेद्य राजाज्ञेवरून तयार केला आहे.

२ राः—एकादशीला आणि पंचपक्वान्नाचा नैवेद्य ? हें तर अगदींच चमत्कारीक दिसतं ! एकादशी म्हणून जर नैवेद्य करायचा तर तो निराहाराचा पाहिजे.

१ लाः—अरे ती चाल होती पंढरपुरांत. पण इथं तिचं काय ? पंढरपूरची सगळी आठवण बुजली पाहिजे अशी महाराजांची इच्छा आहे.

२ राः—म्हणून वाटतं विठोबाला एकादशीची आठवण करून देऊन ती त्याच्या कडनं मोडवायची ? खासा रोजगार. गरीब बिचारा विठोबा. त्याला बोलता येत नाहीं चालता येत नाही. तुम्हीं करा त्याच्या- वर वाटेल तो जुलूम झालं.

१ लाः—देवावर आणि जुलूम ? कोण करणार बाबा ? आणि देव बरा जुलूम करून घेईल.

२ राः—होय तुम्हीं म्हणतां ते खरं आहे. देवाला झालं तरी थोडासा स्वाभिमान असणारच. तो राजांचा राजा आहे. तेव्हां तो एखाद्या यःकश्चित राजाकडून असा जुलूम करून घेणार नाहीं. खचित कोण ही कोती बुद्धी ? आधि मुळीं देवाच्या मूर्तीवर राजानं झाल तरी हक्क सांगा- यचं काय कारण ? पण नाहीं. राजाना आपण सत्ताधीश, बळवान असा

गर्व आणि अभिमान असतो तो ते माणसांवर तर चालवितात, पण देवाच्या मूर्तींवरसुद्धां चालविल्याशिवाय त्याना समाधान वाटत नाहींना ! धन्य आहे मनुष्यस्वभावाची.

१ ला:—व: तूं तर फारच मोठ्या गोष्टी सांगू लागलास ? पण तुझ्याशी बोलत बसून नैवेद्याची घंटा चुकूं देण्याइतका मीं वेडा नाहीं. तो नव्या देवाचा नवा पुजारी बोधलेबुवा उशीर झाल्याबद्दल माझी खरडपट्टी काढील ना ? [ जातो. ]

२ रा:—खरोखरच आमच्या महाराजांनीं पंढरपुराहून या मूर्ती आणल्या फार गैर केलं ! जें देवस्थान जिथं एकदा बनून राहिलं तिथंच ते कायमचं राहिल पाहिजे. देवाच्या मूर्तीबद्दल भांडून राजांनी त्या हालवून आपल्या गांवी आणण्यांत वैभव मानणं याहून वृथाभिमानाचा ग्राम्य प्रकार कोणताच नसेल. हे दोन दगड अनागुंदीला आणल्यानं आमच्या या राजधानीला काय मोठी पुण्याची जोड मिळाली कुणास ठाऊक. मूर्ती पंढरपुराहून हालवून आपण पंढरपुरला कमीपणा आणला आणि दौलताबादच्या राजावर आपण सूड उगविला असे महाराज मनांत मांडे खात असतील पण केवढा भ्रम ! [ दुरून भानुदास येतो ] अरे, हा कोण मराठा कीं ब्राह्मण इकडं येतो आहे ? आणि याच्या हातात हें काय ? यानं काठीला हे भगवं फडकं कसलं बांधलं आहे ? आणि हा टाळ वाजवीत तोंडानं गात काय येतो आहे ? त्याची दृष्टी पहावी तर आपल्याच नासिकाग्राकडे लागली आहे. हा कोण ? आणि हा असा शून्यदृष्टी चालला तरी कुणीकडे ? बहुरुप्यानं एखादं सोंग आणलं म्हणावं तर सोंग दिसत नाहीं. खरं नाणं दिसतं [ भानुदासाजवळ येतो ] काय महाराज, आपण कुठले आणि इकडं कुणीकडं चाललांत ?

भानु०:—पांडुरंग पांडुरंग ! महाराज मी पंढरपुराहून आलों. अनागुंदी शहर म्हणतात तें हेंच का ? हीच का कृष्णदेवराय महाराजांची राजधानी ?

नाग०:—होय हीच. या शहरालाच अनागुंदी म्हणतात. पण आपलं कुणीकडं काम आहे ?

भानु०:—[ हंसून ] माझं काम होय ? श्रीपांडुरंगाकडं आहे.

नाग०:—पांडुरंग म्हणजे विठ्ठलच नां ?

भानु०:—होय. त्याला कोणत्याही नावानं भजा अगर हांका मारा तो तुम्हांला सारखाच पावेल.

नाग०:—ते खरं, पण तुम्हांला जर या शहरांतून धडपणें जायची इच्छा असेल तर पंढरीनाथ हा शब्द तोंडातून काढूं नका ?

भानु०:—काय ? मला पंढरीनाथाचं नांव घ्यायला चोरी ! आणि ती कुणीं केली ?

नाग०:—आमच्या नगरच्या राजानं.

भानु०:—होय. तुमच्या नगरच्या राजानं चोरी केली आहे खरीच. त्यानंच माझ्या श्रीपांडुरंगाच्या मूर्ती पंढरीहून चोरून आणल्या. त्या चोरून आणून कुठं लपवून ठेवल्या आहेत हेंच पहाण्याला मी आलो आहे.

नाग०:—मग काय तुम्हीं पंढरपुराहून आला ?

भानु०:—होय. माझ्या पंढरीनाथाच्या मूर्तींच्या चोरीचा तपास काढायला मी पंढरपुराकडून आलो आहे.

नाग०:—अस्सं ! आतां समजलो. हे पहा, पण हो खरंच तुमचं नांव विचारायला विसरलो.

भानु०:—या देहाला भानुदास म्हणतात.

नाग०:—काय आपणच भानुदास महाराज ?

भानु०:—मी भानुदास आहे, महाराज नाहीं. मात्र तुमच्या महाराजानी केलेल्या चोरीचा तपास काढायला मी आलो आहे.

नाग०:—आमच्या महाराजांनी पंढरपुराहून मूर्ती आणल्या त्याला तुम्हीं चोरी म्हणतां ?

भानु०:—हो हो. आवश्य. चोरी कां नाहीं म्हणणार ? राजा अगर महाराजा झाला तरी तो चोरी करणार नाहीं असं थोडंच आहे. राजा म्हणजे तो एक चोरच. आणि महाराजा असेल तो बडा चोर ठरेल. साधा चोर ठरणार नाहीं इतकच काय ते. तुमच्या महाराजांनीं पांडुरंगाच्या

मूर्ती आणल्या त्या वारकऱ्यानां न कळत आणल्या, तेव्हां ती चोरीच नव्हे तर काय ?

नाग०:—पण आम्ही असं ऐकलं आहे कीं ज्याच्या घरीं या मूर्ती होत्या त्यानं पुष्कळसं द्रव्य घेऊन त्या आमच्या महाराजांना विकल्या.

भानु०:—चोराला कोणीं साथीदार असला म्हणून त्याच्या चोरीचा गुन्हा कांहीं त्यामुळं कमी होत नाहीं.

नाग०:—[ स्वगत ] अरे हा वारकरी तर फारच धीट दिसतो ? आश्चर्यच आहे म्हणायचं. नाहीं तर नेहमीं वारकरी म्हटले म्हणजे कुणीं नुसतं आंगावर ओरडलं कीं चार कोस दूर पळायचे ! आणि हा पाहावा तर राजाला चोर म्हणायला तयार ! या बिचाऱ्याला आपल्या घरीं घेऊन जावं, नाहीं तर याच्या तोंडचे फटकळ शब्द ऐकून राजदूत कदाचित याला पकडून तुरुंगात नेऊन टाकायचे [ उघड ] भानुदास महाराज !

भानु०:—मला महाराज म्हणून हांक माराल तर मी तुम्हांला उत्तरच देणार नाहीं.

नाग०:—बरं राह्यलं. अहो भानुदास, या नगरांत तुमचं कुणी ओळखीचं आहे काय ?

भानु०:—तुमच्या माहाराजांची स्वारी पंढरपुरीं आली होती तेव्हां त्यांच्या बरोबर आलेल्या कांहीं माणसांची तोंड आळख आहे. पण खरं म्हणाल तर या अनागुंदीत माझ्या पंढरीनाथाच्या मूर्तीशिवाय माझ्या पक्क्या ओळखीचं असं कोणीच नाहीं.

नाग०:—मग कृपा करून माझ्या बिऱ्हाडी आपण उतरायला चलाल तर मी आपला फार आभारी होईन ? आपल्या सारख्याचे पाय माझ्या घराला कशानं लागणार ?

भानु०:— तुम्हीं मला आपल्या सौजन्यानं लाजविलंत. चला तुमच्या बिऱ्हाडीं राहाण्याला मला कसली हरकत ? खरोखर तुमचेच माझ्यावर उपकार झाले आहेत. अकारण मित्र म्हणतात ते यालाच. पण पंढरी-

नाथाच्या मूर्तीचं दर्शन घेण्याला माझं मन फारच उतावळं झालं आहे! ते दर्शन होईपर्यंत मला दुसरं कांहींएक सुचणार नाहीं!

नाग०:—चला. आपली स्नानसंध्या झाली कीं आपण प्रथम विठ्ठलाच्याच दर्शनाला जाऊं. [ जातात ]

---

## प्रवेश दुसरा.

[ बोधलेबुवा व आपय्या प्रवेश करतात ]

बोध०:—ऐकलंत का दिक्षीत? भानुदास अनागुंदीला आला आहे.

आपय्या:—कोणता भानुदास?

बोध०:—अहो तो आपला पंढरपूरचा वारकरी आणि हरदास!

आपय्या:—मग तो एकटाच आला आहे कीं बरोबर वारकरीही आणले आहेत त्यानं? पुष्कळसे वारकरी बरोबर आणले असले तर बरं होईल. कारण या विठ्ठलाच्या मूर्ती अनागुंदीला आणून चार महिने होत आले तरी इथं त्याना कुणी आस्थेवाईक भक्तच मिळेना. आमच्या महाराजांनी रात्रीचा दिवस करून मूर्ती करता सुंदर आणि मोठा मंदीरही बांधून दिले, पण पहावं तो पुजारी आणि पहारेवाले यांच्या शिवाय देवळांत कोणी तिसरा मनुष्य जाईल तर शपथ.

बोध०:—होय. तुम्हीं म्हणता ते अगदी खरं आहे. मी सकाळ संध्याकाळ पुजेंत चार घटका मोडतो आणि भावीक लोकांची देवदर्शनाला यायची वेळ म्हटली म्हणजे तीच. पण या मूर्तीचं दर्शन घ्यायला एकही कोणी फिरकत नाहीं. जसा काय मूर्तीवर बहिष्कारच घातला आहे!

आपय्या:—म्हणून म्हणतों हा भानुदास बरोबर वारकरी घेऊन आला असेल तर आयता वारीचा सांप्रदाय सुरू होईल.

बोध०:—आणि तसं न झालं तर?

आपय्या:—छे छे! मला तर फार वाईट वाटेल. कारण मी इतका खटाटोप करून पंढरीच्या मूर्ती आपल्या या कानडी मुलखाला परत

आणल्या. पंढरीची यात्रा मोडून हे अनागुंदी क्षेत्र व्हावा ही माझी इच्छा. तेव्हां पंढरीची यात्रा मोडली नाहीं आणि अनागुंदीची जोडली नाहीं तर या खटाटोपाचा उपयोग काय?

बोध०:—तर मग हा भानुदास इकडं आला तरी कशाला?

आपय्या:—आला असेल पोट भरायला झालं. तुम्हीं नाहींत का आलांत मूर्तींबरोबर पोट भरायला?

बोध०:—छे: दिक्षीत तुमची कल्पना ही चुकली

आपय्या:—मग तुमची बरोबर ती सांगा?

बोध०:—हा भानुदास मूर्ती परत मागायला आला असेल. तो मोठा हट्टी आहे.

आपय्या:—[ हंसून ] पण त्याचा हट्ट पुरविणार कोण?

बोध०—अहो तो महाराजांकडं जाईल; हाता पायां पडेल, विनवण्या करील, आणि डोकं फोडून घ्यायला तयार होईल; काय नाहीं नाहीं ते करील आणि महाराजांना सतावून सोडील.

आपय्या:—राहूं द्या त्या गोष्टी. महाराज स्वभावानं गरीब असले तरी अगदीं दुधखुळे नाहींत, इतक्या खर्चानं आणि सायासानं आणलेल्या मूर्ती परत द्यायला.

बोध०:—पण मला वाटतं त्याची आणि महाराजांची गांठ पडूं देऊं नये हेंच उत्तम. उगीच विषाची परिक्षा पहा कशाला?

आपय्या:—बरं तुम्हीं म्हणतां तसंच कां होईना! मी असा पक्का बंदोबस्त करून टाकतो कीं त्याची आणि महाराजांची गांठच पडूं नये मग तरी झालं ना?

बोध०:—तो कसा?

आपय्या:—[ कानांत सांगतो ] अहो असा! कसा म्हणून विचारता काय? भानुदासानं कांहीं अनागुंदी पूर्वी पाहिली नाहीं. तो इथं आगदी नवखा आहे. तेव्हां एकदाचा त्याला आडकवून टाकला म्हणजे या अनओळखी शहरांत कोण येतो त्याला सोडवायला? आणि कशा करतां?

बोध०:—ही तोंड तुम्हीं ठीक काढलीत. चला पंढरीनाथाच्या— आरतीची वेळ झाली !

आपय्या०:—बोधलेबुवा तुमच्या तोंडांतनं आजून मूर्तीचं ते जुनं नांव जात नाहीं ना ? काय करावं विठ्ठल म्हणायचं सोडून—

बोध०:—[ दचकून ] अरे मी पंढरीना--

आपय्या०:—फिरून तेच ?

बोध०:—चुकलो खराच [ तोंडात मारून घेतो ] विठ्ठलाच्या आरतीची वेळ झाली तेव्हां मला विठ्ठलमंदिरांत गेलंच पाहिजे [ जातो ]

आपय्या:—भानुदास अनागुंदीला कां आला असावा याची सूचना बोधलेबुवांनीं करून दिली हें बरें झालं ! कोण उपद्‌व्यापी मनुष्य हा ! याला कां आतां मूर्ती परत मिळणार ? पण हा विचार कशाला ! त्याचा शोध करून त्याला गांठून एकदम एखाद्या तळघरांत कोंडून टाकावा म्हणजे झाला. [जातो]

---

## प्रवेश तिसरा.

स्थळः—तळघर [ भानुदास बंदीत पडला आहे ]

भानु०:—

पद २४

क्रुति अनुचित कां । मज हातुनि घडली कांहीं ॥
परि अजुनि दया दयाघनिं सरली नाहीं ॥ धृ० ॥
टांकुनि पंढरि आलो येथें । तव चरण शोधण्या पाहीं ॥
दर्शन देउनि मुक्त करी मज । पंढरीनाथा लवलाही ॥ १॥

मला असं बंदीवासांत टाकून कुणाला काय मिळणार ? पण खरंच दुसऱ्याला उपद्रव देण्यासारखं माझ्या हातून काय बरं घडलं असेल ? मी कुणाचं अहित चिंतिलं असेल तर पांडुरंगा तुझीच शपथ ? तुझी

आवडती पंढरी सोडून आलो, म्हणून तर नाहींना माझ्यावर रागावलास? मी पंढरी सोडून आलो खरा, पण तुझ्याच मूर्तीच्या दर्शनाकरता! देवा, तुझ्या मूर्ती नाहिशा झाल्यापासून पंढरीला प्रेतकळा आली आहे! पंढरी तुझी आवडतीना? मग तिची अशी दशा व्हावी हें तुला कसं आवडलं? अठ्ठावीस युगांच्या सहवासाची पंढरी! ती देवा तुम्हांला अशी कशी बरं टाकवली! देवा तुमच्या मूर्तीचं दर्शन घेईन तुमच्याशी भांडेन तंडेन अशा निश्चयानं या अनागुंदीला आलो! मग हे नस्तच विघ्न तुम्हीं मध्ये कां बरं उत्पन्न केलं? पण अशा आडथळ्यानं माझं तुमचं भांडण थांबायचं नाहीं! मी तुम्हांला पंढरीला परत घेऊन जाईन तेव्हांच हे भांडण मिटणार आहे [ ध्यानस्थ बसतो ]

[ विठोबा मारेकऱ्याच्या वेषांत येतो ]

विठोबा:—भक्ताचं मन मला कळत कां नाहीं? असं असून त्याच्या सत्वाची परिक्षा प्रत्यक्ष पाहण्याची माझी खोड जात नाही हा मला लागून राहिलेला चाळा काहीं केल्या थांबत नाहीं काय करावं? कुठून मला हा सगुण लीलेचा खेळ आठवला कुणाला ठाऊक? मी केवळ लीला म्हणून अशी गोष्ट करतों खरा, पण लोकरीतीचं आचरण आंगवळणीं पडतं. लीलेचं मायिक स्वरूप जाऊन तो देहस्वभाव बनतो. आणि मग स्वभाव बनला तो बनला! पण नाहीं भक्तांचा छळ करून त्याना कसोटीला लावताना खरोखरच मला अवर्णनीय सुख वाटतं. हा पहा माझा परमभक्त भानुदास! बिचारा माझ्या मूर्तीच्या दर्शनेच्छेनं वेडा होऊन, पंढरपुरास बायकामुलं टाकून देऊन या अनागुंदीला आला! असं असता याची परीक्षा ती पाहायची काय राहिली आहे? पण नाहीं; या मारेकऱ्याचे वेषांत येऊन त्याला मरणाची भीती दाखवून त्याच्या तोंडून निघालले गोड भक्तीचे आलाप ऐकल्याशिवाय माझं समाधान व्हायचं नाही. त्याला मी तरी काय करूं?

भानु०:—[ डोळे उघडून ] अहाहा! डोळे मिटून ध्यान करतांच श्रीपांडुरंगानं मला दर्शन दिलं त्यामुळें माझं मन कसं सुप्रसन्न झालं

आहे. पंढरीस नित्य पाहातो तशाच मूर्ती दिसल्या पण किती नटविलेल्या आणि सजाविलेल्या ! पंढरीनाथाला इतका डामडौल कधींपासून आवडूं लागला ? देवा तुमच्या आंगावर दागिने तरी किती भारी आणि वस्त्रं किती उंची दिसलीं ! अठ्ठावीस युगं पंढरपुरास भोगलेल्या दारिद्र्याचा सगळा वचपा निघालाच म्हणायचा ! पण देवा, श्रीमंतीचे भोग भोगण्याची इच्छा खरी आई रखुमाईची कीं स्वतः तुमचीच ? अशा कामांत स्त्रियांनाच मोह अधीक पडतो असं जग बोलतं म्हणून आपलं विचारतो ! [ तळघरच्या गाभाऱ्यांत मूर्ती हांसल्याचा भास होतो व हांसण्याचा आवाज होतो ] पण देवा तुम्ही कांहींही म्हणा, तुम्हीं केलं हे कांहीं ठीक केलं नाहींत ! आईसाहेबाचं आपण या कामी एकलं असेल तर आपण बाईलवेडेपणा दाखविला ! आणि आपली स्वतःचीच ही बुद्धी असेल तर मग आपल्याला काय म्हणायचं !

विठो०:—कायरे ए अधमा ! तुला बंदिवासांत ठेवलं तरी तुझ्या मनाचा चाळा अजून सुटत नाहीं काय ? मनाचा एकवेळ न सुटो पण तोंडाचा तरी सुटावा कीं नाहीं ?

भानु०:—[ आश्चर्यानं ] काय ? भल्या गृहस्था, तूंच मला या आंधाऱ्या कोठडींत कोंडून ठेवलंस ? मी तुझा असा अपराध तरी कोणता केला होता ?

विठो०:—मी कशाला तुला अंधार कोठडींत ठेऊं ? माझ्या धन्यानं ठेवलं ! पण तें, तूं त्याचा कांहीं अपराध केलास म्हणून नव्हे; तर तुझ्याच कृत्यानं तुझा नाश होणार होता, त्यापासून तुझा बचाव व्हावा म्हणून !

भानु०:—असं माझं आत्मघातकी कृत्य कोणतं हें तरी सांगशील कीं नाहीं ?

विठो०:—पंढरिनाथाच्या नावाचा उच्चार करणं ?

भानु०:—आणि त्यानं माझा घात कसा होणार होता ?

विठो०:—पंढरिनाथाच्या नावाचा उच्चार विठ्ठल या नावाशिवाय कोणी करील तर त्याचा शिरच्छेद करावा असा महाराज कृष्णदेवराय

यांचा हुकूम झाला आहे. त्या नावाचा उच्चार तूं अनेक वेळा केलास तो कदाचित् नकळत केला असशील असं मानून तुला फक्त कैदेंत टाकलं. परंतु कैदेतसुद्धां त्याच नावाचा उच्चार तूं चालविला आहेस असं पाहून राजाज्ञेवरून तुझा शिरच्छेद करण्याकरतां माझ्या धन्यानं मला आज्ञा केली आहे ! पण तुला फिरून एकवार बजावता, अजूनही पंढरिनाथ या नावाचा उच्चार टाकून दे. ते शब्द फिरून तोंडातून काढणार नाहीं असं वचन दे म्हणजे अजूनही सुटशील !

भानु०:—काय ? पंढरीनाथाच्या नावाचा मी त्याग करूं ? त्या नावाचा त्याग करून मी जिवंत राहण्यांत तरी काय अर्थ ?

विठो०:—तुझ्या आजून पुरं लक्षांत आलंसं दिसत नाहीं ! तुला तुझ्या देवाचं नामस्मरण करायचं असलं तर विठ्ठल असं हवंतर म्हण पण पंढरिनाथ असं म्हणू नकोस ? यांत तुझं काय गेलं ?

भानु०:—काय गेलं ? माझ्या नामस्मरणाचं स्वातंत्र्य गेलं ! विठ्ठल हा विठ्ठल असेल पण पंढरिनाथही आहे.

विठो०:—असेल ! पण या राजधानींत ते नांव वर्ज आहे !

भानु०:—कां ?

विठो०:—आमच्या महाराजांना पंढरिनाथ हे नांव प्रिय नाहीं.

भानु०:—कां बरं ? तुमच्या महाराजांनीं माझ्या पंढरिनाथाच्या मूर्तीची चोरी केली, त्या पापाची आठवण त्या शब्दांवरून त्याना होते वाटतं ! व: तसं असेल तर फार चांगलं. मी पंढरिनाथ या नांवाचा उच्चार एक वेळ सोडून सहस्रवेळ करीन ! कारण प्रत्येक उच्चाराबरोबर त्याना आपल्या पापाची आठवण होऊन पश्चातापानं या जन्मींच्या पापाची निष्कृती या जन्मींच होईल. ! तुमच्या महाराजांनीं मला बंदीवासांत न ठेवतां खुद्द राजवाड्यांत आपल्या संन्निध नेऊन ठेवावं हेंच योग्य.

पद २५

मुखिं पंढरिनाथ नाम हें । जरि न राहे ॥
तरि जातिल असु टाकुनी ॥ धृ० ॥

कृष्णदेव नृप असे प्रबल जरि ।
म्हणोन त्यानें केली चोरी ॥
पडत गळां फांसाची दोरी ।
होइन शंकित तरि मनीं ॥ १ ॥
पंढरि नामोच्चारें होइल ।
स्मृति कर्माचि, तन्मद जाइल ॥
पश्चात्तापानलिं खल राहिल ।
नृपनिंदाव्यसनीं जनीं ॥ २ ॥

विठो०:—[ दरडावून ] हँ भानुदासा तूं बहकत चाललास. हें माझ्या हातांतलं शस्त्र पहा आणि ही राजाज्ञा ! फिरून पंढरिनाथ असं ह्मणणार नाहीं असं कबूल कर नाहींतर राजाज्ञेप्रमाणें मला तुझा शिरच्छेद करावा लागेल.

भानु०:—तसं झालं तर फार चांगलं ! " अंते मतिःसा गतिः " हें वचन कधींही व्यर्थ होणार नाहीं. मला मरण येत असता जर माझ्या मनांत पांडुरंगाचं ध्यान असलं तर तो अखंड मोक्ष असं मी समजेन. मला शिरच्छेदाची भीति व्यर्थ दाखवितोस ! उलट मी तुला असं सांगतो कीं तुला जर मारेकऱ्याचं काम नीट करतां येत असेल तर माझ्या तोंडांतून " पंढरिनाथ ! पंढरिनाथ " असा घोष निघत असतां माझं मस्तक धडा पासून वेगळं कर ! म्हणजे मुखांतला नामोच्चार अखंड राहील.

विठोबाः—भानुदासा, तुझ्या हटवादीपणाचं मला हांसूच येतं. अरे वेड्या, तुझी बायको आणि मुलगा पंढरपुरास तुझी काळजी करीत तुझ्या वाटेकडे डोळ लावून बसलीं आहेत, त्यांची दया तुला कांहींच येत नाहीं काय ?

भानु०:—त्यांची दया मी करणार ? छेः तीं खुद्द पंढरपुरास आहेत. माझ्या पंढरिनाथाच्या आश्रयाला तीं आहेत. आई चंद्रभागेच्या स्वाधीन तीं केलेलीं आहेत. ! त्यांचं संरक्षण मी मेलो तरी सर्वप्रकारें उत्तम

होईल. तीं अशीं भ्याड नाहींत. पंढरिनाथाच्या नामोच्चाराच्या आग्रहाकरतां आणि पंढरिनाथाचं नांव घेत घेत मी मरण पावलो असं त्यांना कळलं तर तीं मला धन्य म्हणतील माझ्या मरणाबद्दल खेद मुळींच करणार नाहींत.

विठो०:—माझ्या कडून तुला सांगायचं तितकं मी सांगितलं. तरी तूं आपला आग्रह सोडीत नाहीस, फिरून पंढरिनाथाचं नांव हट्टानं घेतोस, तर भोग आपल्या कर्माचं फळ !

भानु०:—[ हंसून ] माझं कर्म जर शुचिर्भूत आहे तर मी फळाला कां भिईन ! तें फळ लवकर पदरांत पडावं म्हणून मी असा पदर पसरून श्रीपंढरिनाथाला हांक मारीन !

विठो०:—आणि तुझ्या हांकेला तो ओ देईल ?

भानु०:—यांत काय संशय ?

पद २६

जै आकाश वर पडों पाहे । ब्रह्मगोल भंगा जाये ।
वडवानळ त्रिभुवन खाये । तरि तुझीच वाट पाहे गा
पंढरीनाथा ॥ जै हे विरोनि जाय क्षिती ।
पंच महाभूते प्रळय पावती । परि मी तुझाचि सांगाती ॥
तुझीच वाट पाहेगा पंढरिनाथा ॥
भलतैसे वर पडो भारी । नाम न ढळो न सांडो निर्धारी ॥
जैसी पतिव्रता प्राणेश्वरी । विनवी भानुदास, म्हणे— ॥
आधारीं गा पंढरिनाथा ॥

विठो०:—[ स्वगत ] शाबास हा माझा भक्त खरा ! असो याच्या निष्ठेप्रमाणें मला याला फळ दिलंच पाहिजे. माझं दर्शन घेण्याकारितां हा अनागुंदीला आला असं असून याला बंदीवास घडला. तस्मात याला राजमंदिरांत माझ्या थेट मूर्तीपुढं नेऊन उभा करावा म्हणजे याचे श्रम परिहार पावतील ! [ उघड ] भानुदासा कर आपली मान पुढं आणि घे आपल्या कर्माचं फळ.




विठोबा०—भोग 'आपल्या' कर्मांचें फळ. [ पृ० ९६

भानु०:—ठीक आहे हा पहा मी तयार आहे. [ मान पुढें करतो तोंडानं श्रीपंढरिनाथ जय पंढरिनाथ असं मोठ्यानं म्हणतो. विठोबा मारेकऱ्याचा आवेश दाखवितो तोंच बार होऊन देखावा बदलतो. मारेकरी विठोबा गुप्त होतो. अंधारें तळघर नाहींसे होते व त्याच्या जागी विठ्ठलाच्या मूर्ती करतां राजानें बांधलेलें नवीन देवालय दिसतें. भानुदास मूर्ती पुढें चकित उभा आहे ] हा काय चमत्कार मी अंधाऱ्या तळघरांत बंदीवान होऊन पडलों तो या ठिकाणीं एकदम कसा आलों ? आणि माझ्या समोर मारेकरी उभा होता तो कुठें गेला [ आनंदाने ] काय, माझ्या पंढरिनाथानंच माझी हांक ऐकून मला सोडविलं असेल काय ? [ मूर्तीकडे पाहून ] पण पंढरिनाथा अशानं तुमच्याशी माझा दावा संपायचा नाहीं. माझे प्राण तुम्हीं वांचविले या उपकारानं ओशाळा होऊन मीं तुमच्याशीं भांडायला कमी करीन असं देवा तुम्हाला वाटलं असेल कदाचित्. पण नाही [ इकडे तिकडे पाहून ] वाहवा देवा तुम्हाला हे केवढं वैभव लाभलं! मग बरोबरच आहे तुम्हीं पंढरी सोडून आलांत ते ! हे केवढं विशाळ मंदीर ! किती हा सुंदर सभामंडप ! रत्नाप्रमाणें चमकणारे हे दीप किती मौल्यवान आणि तेजस्वी आहेत! असो; झालं ते झालं ! आपल्या स्वतःला वैभव भोगण्याची इच्छा झाली नसेल, पण या नगरच्या राजाची हौस थोडीबहुत पुरवावी म्हणून आपण इकडे निघून आलां असच कां होईना ? पण ती इच्छा पुरली ना ? चला तर आपल्या पंढरी नगराला परत ! राजाच्या घरचा पाहुणचार पुरे झाला ! या एकल कोंडेपणाचा तुम्हाला कंटाळा नाही का आला ? पंढरीचा भक्तजनसोहळा इथं तुम्हाला कधींतरी पाहायला मिळेल काय ? या राजानं तुम्हाला उत्कृष्ठ मंदीर बांधून दिलं; पण ते केवळ स्वतःच्या वडेजावासाठीं ! तुमचं दर्शन घ्यायची ज्याची लहर लागणार त्या दिवशीं तुमच्या आंगावर वस्त्रालंकार पडणार ! तुरुंगातल्या कैद्याची पूसतपास करायला जसा वरिष्ठ अधिकारी कधीं काळीं जातो तसा हा राजा कधीं काळीं तुमच्या दर्शनाला येणार ! पंढरिचा तो भक्तजन मेळा, त्यांची नित्य होणारी गर्दी, मृदंग टाळ चिपळ्या वीणा यांचा तो घोळ इथं कधीं तरी तुम्हांला पाहायला मिळेल काय ? देवा, चला परत

पंढरीला. मी तुम्हाला न्यायलाच आलों आहे. मी तुम्हाला घेतल्याशिवाय परत जाणारच नाहीं. वारकरीमंडळी तुमच्या वाटेकडं डोळे लावून बसली आहे.

पद २७

चंद्रभागा तटीं संत सज्जन सखे ॥
पाहती वाट तव येई देवा फिरूनी ॥ धृ० ॥
झालें म्लान मुख । हारपलें सकल सुख ॥
जीवित जणु कटु विख । गमत त्यां निशिदिनीं ॥ १ ॥

हा पहा मी तुमच्या पुढं पदर पसरतों. मला कौल द्या ! तुम्हीं पंढरीला परत येणार या वचनाची मला कांहीं खूण द्या ! [ डोळे मिटून पदर पसरतो, पांडुरंग आपल्या गळ्यांतली फुलांची माळ आणि त्याबरोबर रत्नाचा हार भानुदासाच्या पदरांत टाकतो, भानुदास ' जय पंढरीनाथ ' असं म्हणून तो प्रसाद पदरांत बांधून घेऊन मग डोळे उघडतो ] अहाहा ! पांडुरंगानं माझी विनवणी ऐकली ! आतां पांडुरंग पंढरीला खचीत येणार [ दरवाजा आपोआप उघडतो ] अरे हा दरवाजा आपोआप कसा उघडला ! माझं काम झालं. मी परत जावं अशी देवाची इच्छा दिसते. चला आतां नदीवर जाऊन स्नान संध्या तरी उरकूं. [ जातो ]

---

## प्रवेश चवथा.

स्थळः—अनागुंदीचा रस्ता.

[ आपय्या व बोधले प्र. क. ]

आपय्याः—काय भानुदासानं देवाचा हार चोरला ? छे त्याला तर मी दूरच्या एका तळघरांत कोंडून ठेवली होती.

बोध०ः—तुमची पक्की खात्री आहे ?

आपय्याः—खात्री म्हणजे विचारतां काय ? मी त्याची बंदोबस्त कांहीं असा तसा केला नव्हता. तळघराला एकच दार होता, दाराला कुलूप घातला होता, आणि कुलूपाची किल्ली ही पहा. इतक्या बंदोबस्तातनं तो बाहेर निघायचाच नाहीं.

शिपा०:—[ प्रवेश करतो ] दिक्षीत महाराज, तळघराचं दार फोडून, कुलूप तोडून, तो पंढरपूरचा ब्राह्मण रात्रीच्या वेळीं पळून गेला.

आपय्या:—आणि इतकं सगळं होत असतां त्याची चाहूल कुणाला ऐकायला आली नाहीं ?

शिपा०:—ते कां होईल दिक्षीत महाराज ? चाहूल ऐकायला आली इतकंच नव्हे, तर तळघर उघडल्याच्या आवाजानं आमच्या कानठळ्या बसल्या कीं !

आपय्या:—हें झालं तेव्हां किती रात्र झाली होती ?

शिपा०:—अगदीं पहाट झाली होती. तोंडास तोंड दिसूं लागलं होतं म्हणाना ?

आपय्या:—मग त्या वेळीं पहारेवाले काय करीत होते ? निजले होते कीं काय ?

शिपा०:—ते जागे होते; पण तळघर उघडण्याच्या आवाजानं भेदरून जाऊन ते बेशुद्ध पडले. आणि फिरून शुद्धीवर येऊन पाहातात तों आंत कांहीं पंढरपूरचा ब्राम्हण नाहीं.

आपय्या:—मग हा तर चमत्कारच म्हणायचा.

बोध०:—अहो चमत्कार कसला ? या भानुदासानं सुरुंगाची दारू उडवून तळघराचं दार फोडलं असेल झालं. त्याच्याकरतां देवाला चमत्कार करायला, तो मोठा साधूच लागला आहे कीं नाहीं ?

[ इतक्यांत देवळांतला सेवेकरी प्रवेश करतो ]

बोध०:—[ सेवेकऱ्यास ] अरे तूं इकडे कुणीकडे या वेळीं ? काय हकीकत आहे ?

सेवे०:—हकीकत कसली ? चमत्कार खरा. मी देवळांतच निजलों होतों. अगदीं पहाटेस तोंडास तोंड दिसूं लागायचे वेळीं एक मोठा आवाज होऊन विठ्ठलमंदिराचा पुढचा दरवाजा आणि देवळाच्या गाभाऱ्याचा दरवाजा दोन्हीं एकदम खाडकन उघडले. आणि एक परका मनुष्य एकदम गाभाऱ्यांत मूर्तीसमोर उभा राहिलेला दिसला.

बोध०:—मग तूं आंत जाऊन एकदम त्याचा हात धरावास कीं नाहीं ?

सेवे०:—हात कसा धरूं ? त्या मोठ्या आवाजानं माझी बोबडी वळली आणि जमिनीवरून आंग कांहीं केल्या हालवेना. मी आपणाकडून धडपडून उठण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण सगळं आंग बधीर झालंस वाटलं. हातापायांचीं बोटं सुद्धां चाळवेनात. मात्र तो परका मनुष्य मूर्तीपुढं उभा राहून हातवारे करून पदर पसरीत होता हें मी पाहिलं. आणि तो वेड्यासारखा मूर्तीबरोबर बडबडत होता हें ऐकायलाहि आलं. थोड्या वेळानं फिरून आवाज होऊन तो मनुष्य नाहीसा झाला, तेव्हा दारं फिरुन जिथल्यातिथं लागलीं. मला उठतां आलं तेव्हां मी गाभाऱ्याजवळ जाऊन पाहूं लागलो तो देवाच्या गळ्यांत फुलांचा हार तर नाहींच, पण रत्नांचाही नाहीं.

आपग्या:—पण तो पंढरपूरचा ब्राह्मण असं तूं कसं म्हणतोस ?

सेवे०:—तो वेड्यासारखा तोंडानं बडबडत होताना ? तो वेडा पंढरपूरच्या हकीकती देवाला सांगत होता, आणि भानुदासा अशा शब्दाचा उच्चार स्वच्छ झाला. कसा झाला कुणास टाऊक ? पण मी कानानं स्वच्छ ऐकला खरा.

आपग्या:—हें काय असावं गौडबंगाल ?

बोध०:—गौडबंगाल कसलं ? नुसता दरोडा, एवढंच नव्हे तर या दरोडेखोरानं सुरूंगाच्या दारूचाही उपयोग केला.

आपग्या:—केवढं हें याचं धारिष्ट ?

बोध०:—अहो धारिष्ट कसलं ? पहाटेची वेळ, कोणी नाहीं असं पाहून त्यानं बार उडविलान काय. तो मोकळा होता म्हणून हें असं झालं; आणि तुम्हीं तर म्हणतां त्याला तळघरांत कोंडून ठेवला होता म्हणून !

आपग्या:—कोंडून ठेवला होता म्हणजे त्यांत शंका कसली ?

बोध०:—कसंही असलं तरी तो निसटून हातावर तुरी देऊन पळाला खरा !

आपग्या:—पळून पळेल कुठं ? तो आमची राजधानी फोडून पळून थोडाच जातो आहे ! त्याला हार घेऊन जाऊन दोन घटकाही झाल्या

नसतील. आतां चारी दिशांना शिपाई पाठवून शोध करूं म्हणजे सांपडेल; जातो कुठें ?

बोध०:—चला चला. आज या दरोडेखोरानं हार चोरून नेला, उद्यां मूर्ती चोरून न्यायचा !

आपय्या:—बरोबर बोलला ! हा भानुदास मूर्ती चोरून न्यायला आला, त्याचं नुसत्या हारानं समाधान कसा होतो ?

---

## प्रवेश पांचवा.

[ गंडकी, दगडूबुवा, गुणवंताबाई ]

दग०:—[ पडद्यांतून वेड्यासारखं मोठमोठ्यानं हांसतो ] पैसेच पैसे अबबबब ! पैसेच पैसे अबबबब ! पैसेच पैसे !

गंड०:—[ पडद्याकडे पाहून ] इश्श ! असं काय करता ते ! कुणी ऐकल तर हांसतील ना ?

गुण०:—खरच कालपासून दोन चार वेळां यानीं हें असंच म्हटलेलं मी ऐकलं. मला वाटतं थोडासा भ्रम झाला आहे यांना !

चक्र०:—आणि आई, काल किनाई चंद्रभागेंतले वाटोळे दगड वेंचून आणून " या बघ माझ्या मोहरा, या बघ माझ्या सोन्याच्या मोहरा " असं मला हाका मारमारून म्हणत होते.

गुण०:—थोडी सूतशेखराची मात्रा तरी देऊन पहा यांना.

गंड०:—[ हंसून ] मात्रा, अगबाई यांना मात्रा कशाला हवी ? आणि मात्रा देऊन किती पुरणार ? लिंबाएवढ्या मात्रेचे चार गोळे दिले तरी ते खाऊन पचनी पाडतील ! कसला भ्रम आणि काय ! थट्टा करीत असतील झालं कुणाची तरी ! इकडं कीनाई लोकांना वेडावून दाखवायची फार संवय आहेहो ! आणि नक्कलहि कशी अगदीं हुबेहूब करतात. परवां यांनी गाढवासारखं असं हुबेहूब ओरडून दाखविलं कीं तें ऐकून लिंब्या

लोणारी आपलं चुकलेलं जनावर सांपडलं म्हणून मोठ्या आनंदानं आमच्या घरीं कीं हो आला ! [ दगडूबुवा वेड्यासारखं हांसत वरील शब्द म्हणत प्रवेश करतो ]

गंड० :—इश्श ! हें काय, थट्टा कुणाची करता ? वेडावून कुणाला दाखविता ?

दग० :—थट्टा कुणाची ? वेडावून कुणाला ? पण कायग ! अबबबब कितीतरी हे पैसे ! इतक्याचं मीं काय करू ?

गंड० :—कुठले पैसे ? म्हणता तरी काय ?

दग० :—कुठले पैसे ? वारकऱ्यांनी दिलेले ? [ हांसतो ]

गंड० :—जळले मेले ते पैसे ! यमदूतानं नाहीं का ते लुबाडून घेतले खात्तरीच्या ओढ्यांत ? आतां कुठले पैसे !

दग० :—[ हांसून ] छे: यमदूत नेतो आहे माझे पैसे ! मी यमदूताचा बाप लागून राहिलों आहे, मी त्याचेच पैसे घेईन लुबाडून [ धोतराच्या पदरांतून दगड काढतो ] कायरे ए चक्रपाणी, पोरा बघितल्यास का माझ्या मोहरा !

चक्र० :—आई आई, हेच बघते दगड चंद्रभागेतले !

गुण० :—गप्प बैस, बोलूं नये आपण मध्यें.

दग० :—कायग, बघितलेस कां सोन्याचे गट्टू ! बोल आता तुला दागिन्याला काय कमी ? हे मोती पण मोती आहे कसं अगदीं टप्पोरें ! हे बघ या सगळ्या पैशाचे होतील तितके दागिने आंगावर तूं घातले पाहिजे. जड होतात, बोंचतात म्हणशील ! तसं म्हटलस तर दागिने आंगावर घालायला दुसरी बायको करीन बरं !

गुण० :—गंडकीबाई, अहो बघता काय ? खरंच याना भ्रम झाला. जा वैद्याला बोलवा जा एकदम ! बाळा चक्रपाणी चल आपण चंद्रभागेवर स्नानाला जाऊं या ( स्वगत ) या घरांत आता राहून उपयोगी नाहीं. हा वेडा एखाद्याची आब्रू घ्यायचा आणि या मुलाला वेडाच्या भरांत मारायचा एखादा. [ जाते ]




दगाडलबा०—दागिने घालण्याकरितां मी दुसरी बायको करीन बरं.

[ पृ० १०२

गंड०:—[ जवळ जाऊन ] खरंच कां तुम्हाला भ्रम झाला आहे ? कीं थट्टा करता कुणाची ? सांगा तरी !

दग०:—भ्रम ! भ्रम कसला ? बोल, तुला कोणते दागिने पाहिजत ते ! [ दगड दाखवून ] आता दागिन्याला काय कमी ? हे सोन्याचे गट मला वारकऱ्यांनी दिले बरं ! आणि ते तुझ्याकरितां !

गंड०:—हे काय हो ! माझी का अशी थट्टा करता ती ? दगडाला सोनं म्हणायला माझे डोळे फुटले असले तरी दगड कोणचा आणि सोनं कोणचं हें जसं कांहीं हातानं कळणारच नाहीं मला ! माझी कां उगीच थट्टा करतां ?

पद २८

मज भोंवति कां करिता हा विनोद मेला ॥
अंध न झाले अजुनि वडस न पडला डोळा ॥ धृ० ॥
शंख शिंप दगड यांसि कोंवि म्हणूं सोने ॥
व्रणित देहिं लवण तीक्ष्ण कां भरिता अपमाने ॥ १ ॥
कर बसवुनि देवावरि तुम्हीं धन केले गोळा ॥
नवसंगति जात जुने कोण न्याय हा झाला ॥ २ ॥

मी कां तुम्हाला सांगायला आले होते कीं वारकऱ्यांवर कर बसवून त्यांच्या पैशांतन मला दागिने करा म्हणून ? जळले मेले नव्याबरोबर जुनेही गेले कीं हो ! त्या मेल्या यमदूतानं नीट विचार तरी करायचा होता, नवे कोणचे जुने कोणचे याचा !

दग०:—या सोन्यामोत्याचे दागिने तुला नकोत ?

गंड०:—नकोत मला. तुमच्याबरोबर मीही वेडी होऊं कीं काय ? आणि पुन्हां जर असा त्रास द्याल मला तर मी आपली माहेरी जाईन सांगून ठेवते.

दग०:—माहेरी जाऊन आंगावर काय घालशील ? माकणीच्या तट्टाच्या आंगावरचा पोषाख हवातर घालील तुझी आई तुझ्या आंगावर ! तो हवा तुला ? छे: तूं दगडूबुवा बडव्याची बायको ! या दगडूबुवाला राजेलोकांचं उपाध्येपण आहे. मी किती श्रीमान ! त्या अनागुंदीच्या

राजाला मी दगडाच्या नुसत्या दोन मूर्ती दिल्या तर त्यानं सगळ्या चंद्र-भागेच पात्र सोन्यामोत्यानी भरून मला दिलं. तूं माझी आवडती बायको. या सोन्यामोत्याचे दागिने जर तूं अंगावर घालीत नाहीस तर दुसरं कोण घालील ?

गंड०:—मूर्ती गेल्या तर मेल्या गेल्या ! त्या घालविल्या म्हणून लोक बोलतात पण त्यानां बोलायचा काय अधिकार ? माझ्या घरचे दगड मी फोडीन नाहीतर देऊन टाकीन. पण हातचे दागिने घालवून वेड्यासारखे हे नदींतल दगड कवटाळीत बसतां, तुम्हाला लोक वेडे म्हणतात याचं बाई फार वाईट वाटतं. चला घरांत.

[ हाताला धरून घेऊन जाते ]

---

## प्रवेश सहावा.

[ आपय्या, बोधलेबुवा व शिपाई
प्रवेश करतात. ]

बोध०:—महाराजांनीं हवा तसा हुकूम दिला म्हणतां ?

आपय्याः—दिली म्हणजे ? मी खणपटीला बसून घेतलीना ? हुकूम मिळवायला थोडीसी कांगावा करावा लागली हें निराळं ! पण आम्हीं महाराजाला बोलले. देवाच्या मूर्ती चोरणार दरोडेखोर शहरांत आली, भयकर दरोडेखोर चोरी करून आमचा पैसा लुटून न्यावी म्हणून तळघर फोडले. तीच दरोडेखोर विठलाच्या गळ्यांतले हार चोरले. तवा महाराज एकदम हुकूम लिहून दिली !

बोध०:—पण हा चोर भानुदासच आहे असं नाहीं ना महाराजापाशीं तुम्हीं बोलला ? नाहीं तर भानुदासाचं नांव ऐकताच महाराज स्वतःच त्याच्या पाया पडायला निघायचे ! सुळी द्यायचा हुकूम राहायचा बाजूलाच !

आपय्याः—हुच अयय्यो ! बोधलेबुवा मी काय वेडीबिडी आहे कायेर ? मी कशाला सांगती भानुदासाचं नांव ? कुणी दरोडखोर अस मी म्हाणाली ! तवा काम फत्ता झाली. हा बघ शिपायाच्याच हातात सूळ देऊन आणली ! भानुदासाच्या जवळ हार सांपडूं दे की दिलीच त्येला सुळावर ! हे काय साधुसंत म्हणती काय असा चोरी करती ते !

शिपा०:—महाराज ती पहा कोणी परका माणूस दिसती. नदीकाठी स्नान करती !

आप०:—चला चला तर ती भानुदासच असल. बरी चोर जवळच सांपडली ! [ पुढं जातात ]

भानु०:—

अभयदान मज देई गा उदारा । कृपेच्या सागरा देवराया ॥

[ संध्या करीत बसतो ]

बोध०:—कां भानुदासबुवा काय चाललं आहे ?

भानु०:—कां बोधलेबुवा तुम्हीं इकडे कुणीकडे ?

बोध०:—बघा कसा याचा उलटान्याय आहे तो ? मी विठ्ठलाच्या मूर्तीबरोबर या अनागुंदीला आलो हें सगळ्या जगाला माहीत आहे, आणि हा विचारतो तुम्हीं इकडं कुणीकडं ? पण काय हो संत साधू भानुदास ! तुम्हीं तुमची आवडती पंढरी सोडून इकडं कोणीकडं ?

भानु०:—इकडं कुठं म्हणजे ? पंढरिनाथाच्या दर्शनाला ? पंढरीनाथ पंढरीतून निघून गेल्यावर पंढरी कुणाला आवडणार ? पतिविरहित स्त्रीच्या मुखाप्रमाणं पंढरीचं दर्शन आतां अभद्र झालं आहे.

आपय्या:—मग कसं काय ? इथं आल्यासारखी विठ्ठल तुम्हाला दर्शन दिलीच असल.

भानु०:—होय ! पंढरीनाथानं कृपाकरून मला दर्शन दिलं खरं. त्याच्याकरतां जर मी पंढरीहून इतक्या लांब चालत आलो तर पंढरीनाथ मला दर्शन कां न देईल ?

बोध०:—हो हो न द्यायला काय झालं ? नुसतं दर्शनच हो काय म्हणून ? आणखीवर कांहीं प्रसाद वगैरेही दिला असेल ! तुम्हीं विठ्ठलाचे

आवडते भक्त! तुम्हाला प्रसाद द्यायचा नाहीं तर कुणाला! आम्हाला देतां का थोडासा त्यांतला प्रसाद? हो, म्हणजे आम्हीं कृतार्थ तरी होऊं. प्रत्यक्ष विठ्ठलानं दिलेला प्रसाद!

भानु०:—काय? पंढरीनाथानं दिलेला प्रसाद हवा? पंढरीनाथाच्या प्रसादाची इच्छा तुम्हाला झाली? तुम्हीं भाग्यवान आहां!

आपय्या:—अरे बाबा आमचा कसला भाग्य! विठ्ठल तुझ्याशीं बोलते, आपल्या हातीं तुला प्रसाद देते? तूं भाग्याची खरी!

भानु०:—तसं हवं तर म्हणा. कारण हा पहा मला पंढरीनाथानं आपल्याहातीं प्रसाद दिला आहे! [ हातरुमालातून सोडतां सोडतां ] पहा या प्रसादाचा सुगंध तरी किती उत्तम आहे तो [ फुलांचा हार बाहेर काढतो त्याच्याबरोबर रत्नांचा हार निघतो ]

बोध०:—कां दिसतो, पहा पहा तो हार! मी सांगितलं नाहीं नुसत्या तर्कानं कीं हार भानुदासाशिवाय गेला नाहीं म्हणून?

आपय्या:—[ रागानं ] हुच्च! अय्ययो! हे भानुदास साधुसंत कसले! हे भोंदू—छे—चुकले, चोर दरोडखोर की रे! काय देवाच्या गळ्यांतला हार चोरते!

भानु०:—[ आश्चर्यानं ] अरे याठिकाणीं हा रत्नजडित हार कसा आला? पंढरीनाथानं मला नुसता फुलांचा हार प्रसाद म्हणून दिला होता नव्हे का?

बोध०:—अहो संतशिरोमणी! एक विठ्ठलानं दिला आणि दुसरा तुम्हीं घेतला! आणि एक झालं तरी दिला कसला? दिला म्हणे! जसा कांहीं विठ्ठल हात उचलून द्यायलाच लागला आहे! प्रत्यक्ष परमेश्वराला बोलवायला चालवायला भानुदासा तूं परब्रम्हाचं धाकटं भावंडच असशील जसा कांहीं!

आपय्या:—[ शिपायांस ] अरे बघता काय? ये चोराला धरा पकडा. आणि द्या सुळावर आतां याठिकाणीं! यानं मंदीराचे दरवाजे फोडून आज हार घेतला, तशीच उद्या हे चोर विठ्ठलाची मूर्तीच उचलून खांद्यावर घेऊन जायची! हुच्च! अय्ययो! बरी चोर वेळेवर

सांपडली. नाहीं तर मी एवढा प्रयत्न करून मूर्ती पंढरपुराहून आणला तो हा चोर परतून नेती खरा! पकडा या चोराला आणि द्या सुळावर! पुरारे सूळ जमिनींत [ शिपाई भानुदासाला पकडतात. सूळ पुरतात. ]

भानु०:—[ हांसून ] हा सर्व काय प्रकार आहे कांहीं कळते नाहीं! माझी पक्की खात्री आहे कीं तळघरांत तो मारेकरी आल्यापासून सगळे चमत्कारावर चमत्कार घडून येताहेत!

बोध०:—पहा पहा, काय भलत्याच गोष्टी सांगून चोरीची बतावणी आणि संपादणी कशी करूं पाहातो आहे ती! पण भानुदासा, असल्या दैवी चमत्काराच्या गोष्टी ऐकून आम्हीं फसणार नाहीं! माझ्या पोटावर पाय आणूं पहात होतास नाहीं कां मूर्ती परत पंढरपूरला नेऊन? भोग आपल्या दुष्टबुद्धीचं प्रायश्चित्त!

आपय्या:—अरे बाबा, असा चमत्काराच्या गोष्टी ऐकून आम्हीं काय फसते काय रे! अरे शिपायानो उडवा कोरडे याच्या आंगावर! राजाचा अपराध केल्याचा शासन कसा होते त्याचा चमत्कार बघ आतां दाखवते तुला!

भानु०:—मित्र हो! तुम्हांला फसवावं किंवा भुलवावं म्हणून नाहीं सांगत! पण तळघरांत मारेकरी शिरल्यापासून चमत्कारांवर चमत्कार घडून आले. प्रथम मोठा आवाज होऊन–तळघराच दार दुभंगलं–मारेकरी मला मारायला तरवार उगारतो तोंच फिरून मोठा आवाज होऊन तळघरच दुभंगलं. माझ्या डोळ्याला आंधेरी आली, आणि क्षणभरानं पाहिलं तर मी माझ्या पंढरीनाथाच्या पुढं उभा!

बोध०:—[ हंसून ] तर तर तर, स्वतःचं दुष्ट लीलाचरित्र परमेश्वराचं लीलाचरित्र म्हणून सांगायला तुला लाज कशी वाटत नाहीं?

भानु०:—बोधलेबुवा, अहो या गोष्टी माझ्या हातून कशा होतील! मग त्यांना परमेश्वराची लीला म्हणा नाहीं तर भुताटकी म्हणा माझं काय जातं?

आपय्या:—हुच आयय्यो! पण राहीना कां तुझा ती ईश्वर आणि तो भूत आम्हांला कशाला सांगती! दुष्ट रे दुष्ट भानुदास! मी

पंढरपुराहून मूर्ती आणून कन्नडदेशकार्य केलें ते पाहवली नाहीं तुला! म्हणून दरोडे घालून मूर्ती परतून नेती काय!

भानु०:—होय. मी पंढरीनाथाला परत पंढरीला चला म्हणून विनवलं खरंच. खोटं कशाला बोलूं?

आपय्या:०—पहा पहा—तुझ्याच तोंडून न्याय झाले. आणि तूं खोटा बोलले तरी आम्हांला समजतो नाहीं काय? आम्हीं आगदीं गाढवच असल कीं नाहीं! श्रीविठ्ठल तर आता पंढरीला परत येत नाहींच पण त्याच्या अंगावरचे दागिने चोरणार तूं आता या अनागुंदीतच मर जा!

भानु०:—माझ्याजवळ हार सांपडला खरा; पण मी कांहीं तो चोरला नाहीं. याला पंढरीनाथच साक्ष.

पद २९

होउ नष्ट माझा। देह सत्य काजा॥ धृ०॥
असतां मी निरपराधी। जडत केविं खल उपाधी॥
पाप पुण्य भाजा॥ १॥

मी हार चोरला असं तुमच्याप्रमाणें त्यालाही वाटलं तर मला मरण आलंलं तो खुशाल पाहील!

शिपा०:—महाज, सूळ रोवून तयार झाली.

आपय्या:—काय सूळ रोवून झाला? ठीक आहे चढवा भानुदासाला वरती! भानुदासा! भोग आपल्या कर्माची फळ. आणि या शिपायांना त्रास न देतां मुकाट्यानं सुळावर चढ. नाहीं तर तुला याहून अधीक हाल सोसावे लागतील.

भानु०:—पण मला तुम्हीं तुमच्या महाराजाकडे घेऊन चला. मी हार चोरीन कीं नाहीं हें ते सांगूं शकतील!

आपय्या:—हें होणार नाहीं. हा पहा महाराजांचा हुकूम. ज्याच्या जवळ हार सांपडेल त्याला तिथल्यातिथं सुळीं द्या असा हा पहा महाराजांचा हुकूम!

भानु०:—काय? या अनागुंदीचा न्याय असाच असेल तर होऊन जाऊं द्या तुमच्या मना सारखंच. हा पहा सुळावर चढायला मी तयार

आहे. [ सुळाकडे जाऊन सुळास हात लावतो ] श्रीपांडुरंगा तुझ्या प्रसादा-मुळं आलेला प्रसंगही मी प्रसादाप्रमाणेंच समजतो. देवा तूं जर पंढरीला परत येत नाहींस तर मी तरी हें काळं तोंड घेऊन पंढरीला जाऊन काय करणार! ज्या ठिकाणीं तूं येऊन राहिला आहेस तें नवं क्षेत्रच बनलं आहे. हीच माझी पंढरी. आणि पंढरीला जाऊन मरण यावं याहून मनानं दुसरं कांहीं कधीं चिंतलं असेल तर तुझ्याच पायाची शपथ!

पद ३०

धांवुनिया रूप दावा हो राहिराया ॥ धृ० ॥
जरि निर्मळ मी तरि पाहिन या क्षणिं तुमच्या हो पाया ॥ १ ॥
ना तरी पतना सत्वर पावो दुष्ट अधम ही काया ॥ २ ॥

[ इतक्यांत बार होऊन सुळाचा वृक्ष होतो ]

बोध०:—दिक्षीत, पहा पहा काय चमत्कार झाला तो!

आपग्या:—अरे होय—कीं—हुच आयग्यो! सूळ कोठे गेली आणि त्येचा जागीं ही गुलाब वृक्ष कशी आली!

बोध०:—[ आंगाचा दाह होतो ] हाय हाय! दिक्षीत माझ्या आंगाची आग झाली! गांधील माशातर दिसत नाहींत आणि आंगाला कोण डसलं कांहीं समजत नाहीं.

आपग्या:—[ आंगाचा दाह होऊन नाचूं लागतो ] अरे होय कीं माझा आंग सुद्धां भाजले, चटका बसले आगरे आग!

[ शिपाई तसंच करूं लागतात ]

भानु०:—[ गहिंवरून ] पंढरिनाथा काय ही तुझी अद्भुत लीला! नको नको! या बिचाऱ्यांचा छळ झालेला माझ्यानं पाहवत नाहीं. देवा माझे प्राण वांचविलेस येवढे तुझे उपकार पुरे झाले.

पद ३१

वितरी प्रभो कृपा देवराया । नसाहे पहा ही क्लेशासि काया ॥
मम रक्षणासी केले कृपाळा । बहु हाचि पाहे उपकार झाला ॥
झणीं आवरी रे भयकारि माया ॥ वितरी ॥

कृष्णः—( प्र० करून ) संतवर्या भानुदासा मी अपराधी आहे मला क्षमा करा!

पद ३२

कठिण अति संकट हे टळले ॥ धृ० ॥
मिथ्या अपराधी दंडाया पाश यमे वळले ॥ १ ॥
देव रक्षिता होता न करी दैव घात कळले ॥ २ ॥

भानु०:—उठा, उठा, महाराज, माझे गरीबाचे पाय धरून मला कां लाजवितां ?

कृष्ण०:—महाराज मी आपले पाय न धरतां आपल्या पुढं उभा राहीन तर मलाच लाज वाटेल. माझ्या या राजधानीला आपले पाय कधीं न लागायचे ते लागले, आपल्याला हत्तीघोड्यानिशी समारा येऊन पालखीतून मिरवीत आणायचं ते बाजुलाच राहिलं आणि उलट माझ्याच हुकुमावरून तुम्हांला व्यर्थ सुळीं देण्याला काढलं! या माझ्या घोर अपराधाला कोणतं शासन पुरे होणार ? आपल्यासारख्या सज्जनांवर चोरीचा आळ ? अरेरेरे !

भानु०:—महाराज, श्रीपंढरिनाथाची लीला अगाध आहे. ती आम्हां मनुष्याना कळत नाहीं म्हणून असे प्रसंग येतात. माझ्या या स्थितिबद्दल या दोघांना मी दोष देत नाहीं. माझ्या हातांत प्रत्यक्ष श्रीपंढरीनाथानं आपल्या हातानं आपला हार प्रसाद म्हणून टाकला खरा; पण त्या वेळीं ते पाहाण्याला हे कोणींच हजर नव्हते. माझ्या पदरांत हार पाहून मींच हार चोरला अशी जर त्यांची समजूत झाली तर त्यांत त्यांची काय चूक ? पांडुरंगाला चमत्कारच करायचा होता तर तो त्यांनं त्यांच्या समक्षच कां करवूं नये ? मनुष्य मनुष्यासारख्या वागला तर त्यांत त्याचा काय दोष ?

कृष्ण०:—नाहीं महाराज, आपलं मन थोर म्हणून आपण असं म्हणता इतकंच कायतें. स्वार्थसाधूपणा किंवा अहंकार यांतच कांहीं माणुसकी सांठविलेली नाहीं. मी पंढरीनाथाच्या मूर्ती पंढरपुराहून या शहरांत आण-

ण्याची हांव धरिली नसती तर माझ्या माणुसकीला खचित बट्टा लागला नसता. देवाच्या मूर्ती ! त्या कुठंही असल्या तरी भक्तकार्य करणारच. अनागुंदीत केललं ईश्वराचं भजन पंढरीनाथाला पावणार नाहीं असं कधी तरी होईल का ? असं असतां मी मूर्ती इकडे आणण्याचा हट्ट धरिला ही माझीच चूक. पंढरीनाथानं दिव्यदृष्टि देऊन माझी चूक मला दाख-विली. यापुढें कोणता मार्ग पत्करायचा तो मला सरळ दिसू लागला आहे. मी आत्ताच्या आत्ता मूर्ती पंढरीला पाठविण्याची तयारी करतो [ सेना-पती प्र. क. ] सेनापती, तुम्हीं वेळेवर आलांत.

सेना०:—[ मुजरा करून ] राजवाड्यांत सर्वत्र अनिष्ट उत्पात होऊं लागले. महाराजांची स्वारी अवचित इकडे निघून आली असं समजलं म्हणून आलों.

कृष्ण०:—आलांत ते बरंच झालं. विठ्ठलमंदिरांतल्या पांडुरंगाच्या मूर्ती सर्व सरंजामानिशीं आजच्या आज मला परत पाठवायच्या आहेत.

आप्पया:—[ हळूच ] पण महाराज, मूर्ती मूळच्या आपल्या या कानडी देशांतल्या म्हणून म्हणतो कीं —[ अंगाची फिरून आग होते. ]

कृष्ण०:—अरे दिक्षीतांना इतक्यांतल्या इतक्यांत काय झालं ? ते आतां नीट बोलत होते.

आपय्याः—[ तळमळत ] महाराज मी चुकले. आपण मूर्ती पंढरीला पाठवितो तोच बरोबर आहे. माझ्या पापाचं मला प्रायःश्चित्त मिळतो तरी मी ऐकतो नाहीं. पंढरिनाथा, बाबा छळ नको करूं. तुझे लीला माझे ध्यानांत आला नाहीं. माझा चूक झाले. माझा मोठा चूक झाले. मी मूर्ती या अनागुंदांत ठेऊन घेयाचा आग्रह फिरून करल नाहीं. भानुदासमहा-राज, आम्हाला क्षमा कर रे बाबा. आम्हीं चुकले. एकवेळ सोडून शंभर-वेळ चुकले.

भानु०:—दिक्षीत चूक कसली ! पण जरी चूक झाली असली तरी तिच्या योगानं पंढरिनाथानं केलेली लीला तुम्हां आम्हां सर्वांना पाहायला सांपडली !

कृष्ण०:—असो, सेनापती, हत्ती घोड्यासुद्धां सर्व सरंजाम बरोबर घ्या. सोन्याच्या पालखींत रत्नजडीत बैठकीवर मूर्ती बसवून त्यांच्यावर छत्रचामरं धरा. वाटेनं जाताना पंढरिनाथाच्या नांवाचा जयजयकार करतांना दानधर्म करण्याकरतां सोन्यारुप्याच्या नाण्यांनीं थैल्या भरून घ्या. पंढरीला गेल्यावर सर्व लोक अधिकारी वारकरी साधुसंत याना नम्रपणानं निमंत्रण करून त्यांच्या सर्वांच्या देखत समारंभपूर्वक मूर्तींची स्थापना ठिकाणीं करा. दिक्षित तुम्हींही बरोबर जा. पंढरिनाथाच्या देवस्थानाला मी मोठं इनाम करून देणार आहें, त्याच्या सनदा शिक्केमोर्तब केलेल्या तुमच्या बरोबर देतों. त्या नेऊन पांडुरंगाची स्थापना झाल्यावर त्याच्या चरणीं वहा. बेधलेबुवा, जा तुम्हींही मूर्तींबरोबर. याठिकाणीं पूजेअर्चेकरितां जें वर्षासन तुम्हांला ठरविलं होतं तें तिथंही मिळत जाईल. दगडूबुवालाही असंच वर्षासन मिळेल. मात्र फिरून मूर्तींच्या दर्शनावर कर घेऊं नका. भानुदासमहाराज, पांडुरंगाचं मंदीर बांधायला जो खर्च येईल तो मी देण्याची व्यवस्था करतों. तुम्हीं ठाणेदाराला सांगून तुमच्या हौसेप्रमाणें मंदीर हवं तसं बांधून घ्या. आणखी कांहीं तुमची इच्छा आहे काय ?

भानु०:—महाराज ? माझी इच्छा विचारतां तर ती मीहीं सांगतों. माझ्या पंढरिनाथाला महाराजासारखा भक्त लाभल्यावर त्याला राजोपभोगाला काय कमीं पडणार ? पण महाराज माझी अशी इच्छा आहे कीं, श्रीपांडुरंगाच्या मूर्ती मी आपल्या खांद्यावरून वाहून पंढरीला न्याव्या. मूर्ती पढरीहून हालण्याला मी जर यत्किंचित कारणीभूत झालों असलों तर त्या पापाचं प्रायःश्चित्त एरवीं मी कसं घेणार ? महाराज आपणाला श्रीलक्ष्मी प्रसन्न आहे. आपण सर्व पालखीच्या पालखीसुद्धां रत्नजडीत करून द्याल, देवस्थानचा खर्च निरंतर चालवाल, आणि अशा रीतीनं पांडुरंगाची सेवा कराल. पण मी पडलों गरीब, माझ्या जवळ त्याची सेवा करायला खरोखरींच या देहाशिवाय दुसरं काय आहे ? म्हणून विनंती करतों कीं मूर्ती या खांद्यावरून नेण्याला महाराजांनी मला अनुज्ञा द्यावी. त्या योगानं मी महाराजांचा फार ऋणी होईन.

कृष्ण०:—अहाहा, भानुदास तुम्हीं धन्य खरे. तुमच्या मनांत केवढी ही उदात्त कल्पना आली ! आम्हां राजलोकांचे विचार सदा बाह्य ऐश्वर्योपचारांत गुंगून गेलेले असतात. देह झिजवून परमेश्वराची सेवा करायची कल्पना आमच्या मनांतही कधीं येत नाहीं. तुम्हीं मला ईश्वरसेवेचा खरा मार्ग दाखविलात. चला महाराज, पांडुरंगाच्या मूर्ती खांद्यावरून वाहण्याचं आपलं भाग्य सफल होऊं द्या. तें भाग्य मला लाभायचं नसलं तरी मी पादचारी होऊन तुमच्याबरोबर वाट चालत पंढरपुरास येईन आणि मूर्तीची स्थापना आपल्या डोळ्यांदेखत करवीन.

भानु०:—काय महाराज ? आपण पादचारी होऊन इतक्या लांब येणार ? एवढे कष्ट आपण सोसणार ?

कृष्ण०:—कष्ट ? यांत कष्ट कसले ? ऐहिक ऐश्वर्याच्या मृगजळामागं लागून लौकिकाकरितां राज्यकारभाराचे आणि कीर्तिकरतां युद्धप्रसंगाचे कष्ट आम्हीं हौसेनें काय थोडे करतां ? मग परमार्थसाधनाचेच तेवढे कष्ट करायला आम्हीं माघार कां घ्यावी ? चला, भानुदासमहाराज आज महापूजा होतांच पंढरीला नेण्याकरितां मूर्तींचं उत्थान करायचं. सेनापती, आमच्या यात्रेची सर्व सिद्धता ताबडतोब करा.　　[ जातात. ]

---

## प्रवेश सातवा.

दगडूबुवाचं घर.

[ दगडूबुवा गेंडको पाटील प्रवेश करतात. ]

गेंड०:—[ पाटलास ] आलांत का पाटीलबुवा ? या. वेळेवर आलांत. हे पहा काय करावं कळेचना. पहा बरं, याना हें असं वेड लागलं आहे. वेडाच्या भरांत आलिकडे तुमचं नांव घेऊं लागले म्हणून म्हटलं तुम्हांला बोलावणं पाठवावं.

पाटी०:—बोलावणं पाठविलंत ठीक केलंत; पण मी काय वैद्य नाहीं कांहीं नाहीं. मी येऊन काय करणार ? पण हे वेडांत माझ्याबद्दल म्हणतात तरी काय ?

पद ३३

दग०:—[ प्र. क. ]

पाचा मुलखाचे पाच पंच । मोठा जुळला लभाडांचा संच ॥
म्हणती देवदर्शनाला दे कर । नाहीं तर आपली वाट सुधर ॥
करुनी पंचाईत मिळविले धन । पण शेवटीं केली चोरांचीच धन ॥
दिसतो हा मोठा संभावीत पाटील । पण मला काय माहीत
हा ओढ्यातच गाठील ? । येरे यमदूता, येरे विष्णुदूता ॥
यश येवो देवा तुझ्या तरी हाता ॥ गाडगं भरलं गाळीव पापाचं ।
घे तर घे काय जातं माझ्या बापाचं ॥ मूर्ती गेल्या मूर्ती
आल्या देव राहिला घरच्या घरीं । सांभाळा सांभाळा पाटील
बुवा आता लागती गळ्याला दोरी ॥

अग ए हे घे दागिने, नको म्हणू नको, कसे लठ्ठ लठ्ठ आहेत ! कसे आहेत लखलखीत !

पाटी०:—गंडकीबाई, यांना वेड लागलं खरंच. तें कांहीं खोटं नाहीं. पण त्याला मी काय करणार ? मी म्हटलंना मी कांहीं वैद्य नाहीं. पण हें वेड लागायला कारण कोण तें माहीत आहे का तुम्हांला ?

गंड०:—कोण ? सांगा बरं कोण तें ?

पाटी०:—कोण म्हणजे ? अहो तो भानुदास. त्यानं इथून देवाच्या मूर्ती काढून लावल्या, आणि सगळ्या गांवाला वेड लावलं ! मूर्ती गेल्यापासून आमच्या मनाची स्थितीसुद्धां चमत्कारीक झाली आहे. आम्हालाही वेडच लागलं आहे; पण दगडूबुवा तें वेड तोंडानं बोलून दाखवीत नाहींत ते वेड्यासारखे चाळे करतात, आम्हीं करीत नाहीं, इतकाच फरक. बाकी देवाच्या मूर्ती गेल्यामुळं आम्हीं सर्वच वेडे झालों आहों.

गंड०:—खरं ना पाटीलबुवा ? तुम्हालाही माझ्यासारखंच वाटतं ना ? ही मेली गुणवंताबाई माझ्या घरीं राहायला आली; तेव्हांपासून यांना हें वेड लागलं ? बाईचे पाय पांढरे.

पाटी०:—गंडकीबाई, मी कांहीं वैद्य नाहीं हें तुम्हाला सांगितलंच आहे. तरी पण या बाईला तुम्हीं घरांतून काढून लावाल तरच तुमच्या नवऱ्याला बरं वाटेल.

गंड०:—मग घेऊन जाना या बाईला तुम्हीं.

पाटी०:—[ मनांत ] नाहीं तर मी इथं दुसऱ्या कशाला आलों आहें ? [ उघड ] तुम्हीं सांगत असाल तर घेऊन जातों. गांवच्या लोकांचा बंदोबस्त करायचं माझं कामच आहे. शिवाय आज कार्तिकी एकादशी. भानुदासानं आज मूर्ती परत आणून द्यायचा वायदा केला आहे सगळ्या गावाशीं. तो वायदा टळून गेला ! कार्तिकी एकादशीला जर मी मूर्ती परत आणून दिल्या नाहींत तर ही माझी बायकापोरं मी तुमच्याच स्वाधीन करीन, अशी भानुदासानं मला जामीनकी दिली होती. तेव्हां जामीनकी बजावायला त्याची बायको मला ताब्यांत घेतलीच पाहिजे. सांगा कुठें आहे त्याची बायको ती. गांवचा हुकूम मला बजावलाच पाहिजे.

गंड०:—थांबा, मी घेऊन येतें त्याना आंतनं.

[ जाते. ]

पाटी०:—[ आपल्या गड्यास ] जारे, जा, मंगळाजीला घेऊन ये पुढें घालून [ गडी जातो ] कां बुवा कसं काय ? तुमचं वेड खरं कां खोटं ? मघाशीं तुमचं बोलणं मी ऐकलं त्या वरनं हें खरं वेड नसून ढोंग केल्यासारखं दिसत आहे. तुमचं वेड खर असो नाहीतर ढोंग असो, पण हें पहा माझ्या गळ्याला दोरी लागायची गोष्ट फिरून बोललां तर संभाळा. मी पाटील आहें, गांवचा राजा आहें, आधीं मी माझ्या प्रजेला शिक्षा करीन, आणि मला शिक्षा कोण राजा करतो तें मग पाहून घेईन, समजलां ?

दग०:—[ वेडांत ]

मूर्ती गेल्या मूर्ती आल्या देव राहिला घरच्या घरीं
सांभाळा सांभाळा पाटीलबुवा आतां लागते गळ्याला दोरी

[ मंगळाजी येते ]

पाटी०:—या मंगळाजी तुमच्या धंद्याला बरकत आहे. ही घ्या

भानुदासाची बायको आणि हा मुलगा मी तुमच्या हवाली करतो. तुम्हाला जसा त्यांचा उपयोग हवा तसा करा.

मंग०:—पण ही बाई खुषीनं येते कां माझ्या घरीं ? विचारा. खुषीनं आली आणि खुषीनं वागली तर तिचं आणि माझं कल्याण होईल. नाहीतर रडली भेकली धूम फूस केलीन तर नकोग बाई हा रोग माझ्या घरीं.

गुण०:—परमेश्वरा आतां तूंच माझं रक्षण करणार. अहो पाटीलबुवा असाच कां तुम्ही गावचा न्याय करतां ?

पाटी०:—कां बाई ? यांत काय अन्याय झाला ? तुझ्या नवऱ्यानं कबुली देताना विचार करायला पाहिजे होता. कबुली दिल्यावर आतां काय उपयोग ?

गुण०:—त्यांनीं काय कबुली दिली होती ?

पाटी०:—कार्तिकी एकादशीच्या दिवशीं पांडुरंगाच्या मूर्ती पंढरीला परत आणीन, नाहींतर माझ्या बायकापोरांच्या वरचा हक्क सोडीन ! कार्तिकी एकादशीचा दिवस उजाडला, झालं.

गुण०:—दिवस उजाडला खरा पण अजून मावळला तर नाहीं ना ? [ स्वगत ] एवढ्या सबबीवर जर मला संध्याकाळपर्यंत वेळ मिळाला तर चंद्रभागेत उडी घेऊन विटंबना वांचवायला वेळ तरी मिळल.

पाटी०:—तें कांहीं चालायचं नाहीं. मंगळाजी, चला घ्या ही आपली घटीक ताब्यांत.

चक्र०:—कोणरे तूं ? माझ्या आईच्या आंगाला हात लावतो तो ? चल हो मागं ! नाहीं तर सांभाळ.

पाटी०:—अरे वारे मिरनुटल्या [ त्याला हिसडा देऊन गुणवंताबाईचा हात धरतो. ]

गंड०:—मंगळाजी न्याच कसंही करून हिला. हिच्या पायगुणानं आमच्या घरच्यांना वेड लागलं.

दग०:—[ वेडांत नाचतो ]

मज वेड लाविले गोविंदे । पुण्य जडे त्याच्या छंदे ॥

पाटी०.—बस झाला हा चावटपणा. तुम्हां लोकांबरोबर खेळत बसायला इथं कुणा लेकाला वेळ आहे ? [ गुणवंताबाईचा हात धरतो. ]

गुण०:—देवा धांव आतां.

पद ३४

नाथ कोठें तुम्हीं गुंतला । लुप्त झाला ॥ धृ० ॥
वाट आजवरि किती पाहिली । व्यर्थ ती अंति का जाहली ॥
ईश विश्वास ही भंगला ॥ १ ॥

[ इतक्यांत पडद्यांत एकेबाजूस शिंग वाजतें व दुसरे बाजूस वारकऱ्यांची टाळ पडते. ]

पाटी०:— हे आवाज कसले ?

[ ठाणेदार प्र. करून पाटलास कैद करतो. भानुदास येतो त्याला पाहून गुणवंताबाई धांवत जाऊन त्याच्या गळीं पडते. चक्रपाणी बाबा म्हणत धांवत जातो. वारकरी पुंडलीक वरदे म्हणतात. ]

चक्र०:—

पद ३५

अहाहा माझा येत पिता । मुखीं धरुनि हा सुहास्य उज्वल
प्रमुदित करि निज बाल सुता ॥ १ ॥

दुग०:—

[ वेडांत बडबडतो ]

मज वेड लाविले गोविंदे । पुण्य जडे त्याच्या छंदे ॥

१ ला वार०:—भानुदासा, बाबा आलास ? पण मूर्तीची काय वाट ?

२ रा वार०:—नाहींतर हे पहा, आम्ही सर्व असेच चाललों चंद्रभागेवर जवि द्यायला.

भानु०:—नाहीं नाहीं महाराज चिंता करूं नका. पांडुरंगाच्या मूर्ती गांवच्या शिवेपर्यंत मी खांद्यावरून वाहून आणल्या. त्या पालखींत घालून स्वतः कृष्णदेव महाराजच इकडे येत आहेत.

[ राजा शोभिवंत पालखींत घातलेल्या मूर्तींसह प्रवेश करतो. ]

दग०:—अहाहा ! माझं वेड गेलं एवढंच नव्हे तर मला अपूर्व दृष्टी मिळाली.

गंड०:—अगबाई ! काय माझ्या घरच्या मूर्तींचा हा थाट झाला ! आतां मी दुसऱ्या कुणाला त्यांची पूजा करूं द्यायची नाहीं.

दग०:—असं म्हणूं नकोस. देवाच्या मूर्तींवर सत्ता सांगायची बुद्धी आजवर तुला मला झाली ती पुरे. ज्या प्रेमळ वारकरी संतांनी पंढरी-नाथाची खरी भक्ती केली त्यांचीच मालकी मूर्तीवर राहिली पाहिजे.

राजा:—भानुदास महाराज, मूर्ती पंढरपूरला परत आणून आपण आपला सत्यसंकल्पाचा आग्रह पुरा केलात. असली प्रतिज्ञा राजेलोकां-च्याही हातून पार पडणं कठीण. भक्तीचं तेज कांहीं विलक्षण खरं !

भानु०:—( हंसून ) महाराज माझा कसला सत्यसंकल्प ! परमे-श्वराच्या इच्छेला येतं तसंच घडतं.

राजा:—चला आतां. पूर्व संकल्पाप्रमाणं सार्वजनिक नव्या जागेंत मूर्तींची स्थापना करूं.

१ ला वार०:—धन्य भगवत्भक्त भानुदास !

२ रा वार०:—धन्य राजा कृष्णदेवराय !

[ वारकरी आनंदानें नाचून भजन करितात व शेवटीं ' पुंडलीक वरदा हारी विठ्ठल' ह्या गजरांत पडदा पडतो. ]

समाप्त.